# राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांचे स्त्रीउन्नतीविषयक विचार

**डॉ. प्रदीप शामरावजी ढोले**
इतिहास विभाग प्रमुख, स्व. पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय वरुड,
जि. अमरावती, महा
drpradeepdhole@gmail.com

भारतात स्त्रीयांच्याबाबत न्यायाचे मूलभूत विचार मांडणारे समाजसुधारक मोठ्याप्रमाणात होऊन गेलेत.स्त्रियांच्या शिक्षणाचा, समतेचा, सामाजिक न्यायाचा जोरदार पुरस्कारया समाजसुधारकांनी केला.भारतीय समाजात स्त्रीचे स्थान माता, पत्नी व कन्या या त्रिविध स्वरूपाचे असून भारतीय परंपरेनुसार मातेचे स्थान सर्वोच्च आहे, भारतीय परंपरागत स्त्रीजीवनावर पाश्चात्य जीवनाचा परिणाम होऊन स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्या जीवनप्रणालीत हळूहळू कसे परिवर्तन होत गेले. भारतीय स्त्री कशी असावी या विचाराने प्रेरित झालेले अनेक विचारवंतया भूमीत होऊन गेलेत. त्यापैकीच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी भजन, किर्तन आणि साहित्य लेखनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्याचा जो प्रयत्न केला त्यांच्याया प्रयत्नात आपल्याला त्यांच्या स्त्री उन्नतीच्या विचाराचा परिचय होतो. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या विचारातून धर्मनिरपेक्षता, अंधश्रद्धा निर्मूलन, सामाजिक समता, अज्ञान, बुवाबाजी, जखडलेल्या परंपरातून शोषित समाजाला तसेच महिला सक्षमीकरण वस्त्रीला मुक्त करण्याचा प्रयत्न केला. आपल्या विचारातून त्यांनी स्त्री स्वातंत्र्याचा मोठा विचार, विकास संकल्पमांडलेला दिसून येतो.

विसाव्या शतकातील महान कर्मयोगी मानवतेचे पुजारी युगप्रवर्तक या विशेषणांनी ओळखल्याजाणारेराष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे साहित्य हे भारतीयांचे प्रेरणास्त्रोत आहे. त्यांच्या साहित्यापैकी सर्वात प्रसिद्ध व प्रचलित आशा साहित्यसंपदेत ग्रामगीता लोकप्रिय आहे. याच ग्रामगीतेतील विसाव्या अध्यायात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी महिलोन्नतीविषयक विचार प्रस्तुत केले आहेत.महाराष्ट्रीय समाजसुधारणे करीता अत्यंत उत्कटतेने प्रयत्न करणारे समाजसुधारक, विचारकाच्या तुलनेत राष्ट्रसंत तुकडोजीचा स्त्रीविषयक दृष्टिकोण अत्यंत शास्त्रशुद्ध, प्रागतिक व पुरोगामी स्वरूपाचा दिसून येतो. स्त्रीचे समाजातीलस्थान कसे आहे आणि ते कसे असावे याचे सविस्तर विश्लेषण त्यांनी आपल्या ग्रामगीतेच्या विसाव्या अध्यायातून केले आहे. स्त्री हि पुरुषांप्रमाणे समाज जीवनातील एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. तिला पुरुषांप्रमाणे स्वतंत्र अस्तित्व ववेगळे व्यक्तित्वआहे.जन्मापासून मृत्यूपर्यंत पुरुषाच्या नियंत्रणाखाली राहावे आणि चूल व मूल हेच तिचे संकुचित क्षेत्र असावे या परंपरागत स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोनात तुकडोजींनी फार मोठे परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

**स्त्री-पुरुष ही दोन चाके।जरी परस्पर सहाय्यके।**
**तरीच संसार रथ चाले कौतुके।ग्राम होई आदर्श।**

स्त्री पुरुष विषमतेवर प्रहार करून स्त्रीच्या तेजावरच पुरुषाचे मोठेपण अवलंबून आहे. स्त्री ही पुरुषांच्या तुलनेत गुणात्मकदृष्ट्या सरस ठरते. असा क्रांतिकारी विचार राष्ट्रसंतानी मांडला.स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रीविषयक जीवनाकडे पाहिलें असतां जशी जातीव्यवस्थाही समाजात खोलवर भिनली होती. तशी स्त्री पूर्वापार अनेक बंधनात, प्रथेत अडकून पडली होती. बालविवाह, शिक्षण बंदी, विजोड व्यक्तीशी विवाह, अल्पवयात विधवापण, विटाळ, सतीप्रथा, केशवपण, सार्वजनिक कार्यात बंदी, आदि प्रकारचे स्त्रीला स्वातंत्र्य नाकारले गेले होते. विधवापण आल्यास पुनर्विवाह बंदी, रोजगार बंदी, चारभिंती हेच जीवन या सर्व जोखंडातूनस्त्रीलाबाहेरकाढण्यासाठीतुकडोजीमहाराजांनी मुक्ततेचा मार्ग दाखवीला.उच्चशिक्षणाचा मागमूसही जीवनात नसलेल्या तसेच शालेय शिक्षणही जेमतेम असलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाजजीवनाच्या सूक्ष्म अवलोकनातून समाजजीवनाचे अधिष्ठान असणाऱ्या कुटुंबातील महत्त्वपूर्ण घटक ठरणारी स्त्री कशी उपेक्षित राहिली, तिच्या वेदना कोणत्या, तिच्या व्यथा कोणत्या याची यथोचित जाण ठेवून तिच्या जीवनाशी निगडित असलेल्या समस्यांचे निराकरण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य महाराजांनी आपल्या भजन, कीर्तन, भाषण व साहित्याच्या माध्यमातून

केलेले दिसते. त्याअनुषंगानेच स्त्रीचे जीवन केवळ कुटुंबालाच नव्हे तर समाजाला व राष्ट्रालादेखील कसे उपयुक्त ठरू शकते याचेही साधार विवेचन संतानी ग्रामगीतेतून प्रस्तुत केले आहे.ग्रामीण जीवनात स्त्रीया पुरुषांपेक्षा घर, परिवार, आदर्श संतती, शेतीवाडी सांभाळणाऱ्या कशा अग्रेसर आहेतयाची प्रचिती ग्रामगीतेतून मांडली आहे. ज्या राष्ट्रात स्त्री गुलाम व बंधनातठेवली ती राष्ट्र आज मागास, आतंकी बनले आहेत. महिला उन्नती राष्ट्र विकासातील महत्त्वाचा भाग आहे.राष्ट्रसंतांच्या मते,

**म्ह्णतीस्त्रीहीगुलामचिअसते।**
**तिला हक्क नाहीत उदधारायापुरते।**
**हे म्हणणे शोभेनाशहाण्याते। स्वार्थाधतेचे।**

म्हणजेच स्त्री ही गुलामच असते.तीस उद्धार करण्याचा हक्क नाही. असे म्हणणे आंधळया स्वार्थाचे लक्षण असून शहाण्या माणसास शोभत नाही. स्त्री अडथळानसून उन्नतीच्या मार्गातील घटक आहे. भारत युगात स्त्रीला ग्रंथात जरी महत्त्वअसले तरी स्त्री मात्र गुलामगिरीतच होती. प्रथम सती बंदी आली आणि स्त्री एकएक जोखडातून मुक्त होत गेली.केशवपन,शिक्षण, चूल आणि मूल यातून बाहेर पडून स्त्री अंबालाची सबला बनली. तरी पुरुषी वर्चस्व मात्र कायम दिसते.इ.स.1829 मध्ये पास झालेल्या सतीच्या कायद्यापासून तर 1955-56 सालच्या हिंदू कोडबिलापर्यंत जर आपण अवलोकन केले तर असे दिसून येईल की, धर्मबंधनात बांधलेल्या वा धर्मानुसार रूढीने ग्रासलेल्या स्त्रियांची इतकी शोचनीय स्थिती या समाजाने केली की,त्यासाठी त्यांचे मनपरिवर्तन तर करावेच लागले, परंतु कायदेसुद्धा करवून घ्यावे लागले. यासाठीच स्त्रीला गुलामबनविणाऱ्या रुढी व चालीविरूद्ध दंड ठोकून उभे राहिलेल्या सुधारकांना अनेक आपत्तींना तोंड द्यावे लागले.सतीचाल, पडदा पद्धत,बालविवाह, विधवाविवाह निषेध, स्त्रीदास्य यासाऱ्याच अनिष्ट प्रथानी स्त्रियांची होणारी पिळवणूक थांबवावी आणि स्त्रीला केवळ भोगदासीच्या पलिकडे एक महत्त्वपूर्ण स्थान आहे हे समाजाला दाखवून द्यावे यासाठी कायद्यांची तिला मदत व्हावी म्हणून सुधारकांनी प्रयत्न चालविलेयातमहाराजांचेहीमोठेयोगदानदिसून येते.याच सुधारक मंडळीच्या पुण्याईने स्त्रीने आज कर्तुत्व गाजऊन आपले पुरुषाशी साम्य सिद्ध केले आहे. त्यामुळे स्त्री स्वातंत्र्याच्या आणि स्त्री कर्तृत्वाच्या चळवळीला एक नेत्रदीपक चालना समाजजीवनात प्राप्त झालेलीदिसूनयेते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या मते स्त्रीयांनी आपल्या स्वातंत्र्याचा संयमाने उपयोग करून घेतला तर तिच्यात उपजत असलेली शक्ती समाजजीवनाला व राष्ट्रजीवनाला सहाय्यभूत होऊ शकेल. कारण पुरुषांपेक्षा स्त्री कसल्याही बाबतीत तीळमात्रही कमी नाही हे राष्ट्रसंतानी ग्रामगीतेतून स्पष्ट केले आहे.

**निरीक्षोनी जीजी घरे पाहिली।**
**तेथें सरसता अनुभवा आली।**
**चातुर्य लक्षणे अधिकदिसली।महिलांमाजी।**

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय संस्कृतीतून हळूहळू सुटत चाललेली स्त्री हि त्यांनीन्याहाळली. स्वातंत्र्यपूर्व स्त्री व स्वातंत्र्योत्तर स्त्री यांच्या जीवनातून निर्माण झालेल्या विविध समस्यांच्या समन्वयातून त्यांनी आपल्या स्वप्नातील एक आदर्श भारतीय स्त्री आपल्या ग्रामगीतेतून साकार केली आहे.स्त्री हि पुरुषांप्रमाणेच समाजजीवनात एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. किंबहूना जगाचा उद्धार करण्याचे सामर्थ्य तिच्यात ओतप्रोत भरलेले आहे. स्त्रियांचा गौरव करताना महाराज म्हणतात,

**जिच्या हाती पाळण्याची दोरी।**
**तीच जगाते उद्धरी। एसी वर्णिली मातेचीथोरी।**
**श्रेष्ठगुरुहूनही।**
**मातेच्या स्वभावें पुत्राची घडण।त्यासि उज्वले ठेवी तिचे वर्तन।**
**स्त्रीच्या तेजावरिच पुरुषाचे मोठेपण ऐसें आहे।**

राष्ट्रसंत तुकडोजी हे शिक्षणतज्ज्ञही होते. शिक्षणाद्वारे माणसाच्या मनातील न्यूनगंड दूर झाला पाहिजे.पुस्तकी शिक्षणातून समाजाचा विकास होणार नाही म्हणून खेड्यातून उच्च शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्था उभारल्या पाहिजेत. असे ते म्हणत. समाज शिक्षण हा प्रचलित प्रौढ शिक्षणासाठी वापरलेला राष्ट्रसंतांचा शब्द आहे. विज्ञान शिक्षण शेतीसाठी आवश्यक आहे. अशी त्यांची धारणा होती. शिक्षणासोबतच श्रमप्रतिष्ठा महत्त्वाची आहे. स्वच्छता हाच आनंदी जीवनाचा पाया आहे असे ते म्हणत. ग्रामगीतेच्या एकोणीसाव्या अध्यायामध्ये महाराजांनी शिक्षणाचे महत्व विषद केले आहे. पुरुषांप्रमाणेच स्त्री शिक्षणाचेही ते पुरस्कर्ते होते. महिलांच्या शिक्षणाबाबत ते म्हणतात की,

**महिलांचा आंतरिक गुणांचा विकास।करील ऐसे शिक्षण खास।**
**जरी दिले जाईल त्यास।तरीच भावी जग पालटे।**

महाराजनी जगात बदल हवा असेल,प्रगती हवी असेल तर महिलांच्या उच्चशिक्षण, आंतरिक शिक्षण, सद्‌गुणांचा विकास करणारे शिक्षण,महत्त्वाचे आहे असे निक्षूनसांगीतलेआहे.आपल्या भजनाच्या माध्यमातून शिक्षणाची महती पटवून देताना महाराज म्हणतात की,

**शिक्षण घेऊनही करू दिवाळी, अज्ञानाची करुनी होळी.**

दैनंदिन व्यवहारात जीवन मूल्याचे एक निराळे अधिष्ठान आहे. जर जीवनात जीवनमूल्ये व तत्वनिष्ठेचे अधिष्ठान नसले तर सुदृढ समाज जन्मास येऊ शकत नाही.म्हणूनच समाजास जीवन शिक्षणाची आवश्यकता आहे. ग्रामगीतेच्या विसाव्या अध्यायात तुकडोजी महाराज म्हणतात,

**विध्येअंगी व्हावा विनय।विद्या करी स्वतंत्र निर्णय।**
**शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन जय करावया।**

जीवनात साध्य, साधन आणि साधक यांचा संगम झाला पाहिजे.जर हा संगम झाला तर जिवनाचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही. आपले मन बुद्धी व इंद्रिये यांचा विकास याच मार्गाने झाला पाहिजे. म्हणजे जीवनाचा विकास होण्यास वेळ लागणार नाही. हे पटवून देताना महाराज एकविसाव्या अध्यायात म्हणतात,

**यासाठी शिक्षण घेणे। की जीवन जगता यावे सुंदरपणे।**

**दुबळेपण घेतलेआदणे।शिक्षण त्यासी म्हणो नये।**

महाराजांनीभारतीय स्त्रीला पारतंत्र्याच्या बंधनातून मुक्त करण्याचा विचार मांडलेला आहे. तसेच स्त्रीयांनी पुरुषांच्या बरोबरीने जीवनाच्या विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा वाटा उचलावा असे सांगून त्यांच्या उच्चतम शिक्षणाचा आवर्जुन पुरस्कार केलेला आहे. महाराजांच्या मते कोणताही देश वा राष्ट्र स्त्रीजातीला मागे ठेवून स्वतः पुढे जाऊ शकत नाही. ज्या देशात स्त्रियांचा गौरव होतो. त्या देशाचे भवितव्य उज्वल ठरते.स्त्री ही खऱ्या अर्थाने गृह स्वामिनी व्हावायची असेल, तर तिचा स्वाभिमान यत्किंचितही दुखावला जाऊ नये.

**मिळो बहुमानमाताना, जसा देशात पुरुषांना!**

भारतीय स्त्रीला हिंन दिन लेखणाऱ्या व हजारो वर्ष तिची उपेक्षा व अवहेलना करणाऱ्या तसेच चार भिंतीआड तिचे जीवन बंदिस्त करून ठेवणाऱ्या या भारतीय समाजाला महाराजांनी स्त्री पुरुष समानतेचा संदेश देताना स्पष्ट सांगितले आहे की,

**म्हणोनीरथाची दोन्ही चाके।करावी कातोनि सारखे।**
**तरीच संसारगाडी सुखें। सुखावेल ग्रामजीवनाची।**

यावरून महाराजांचे स्त्रीविषयक विचार किती पुरोगामी स्वरूपाचे होते याचा प्रत्यय येतो.

**निष्कर्ष:**-भारतीय समाजजीवनातस्त्री ही पुरुषांप्रमाणेचएक महत्त्वाचा घटक असून देखील तिला जन्मापासून मृत्यूपर्यंत माता, पत्नी, कन्या या त्रिविध भूमिकांतून वावरताना पुरुषांच्या वर्चस्वाखाली रहावे लागले.प्राचीन काळी चूल आणि मूल हेच तिचे क्षेत्र ठरले.परंतु स्त्रीशिवाय प्रपंचाला पूर्तता नाही. संसाराला सुख नाही आणि गृहस्थाश्रमाला अर्थ नाही. स्त्री प्रसंगी पुरुषाला शहाणपण शिकवते. मार्गदर्शन करते आणि संसाररुपी रथ चालविण्यासाठी सुरक्षित, सुरळीतसहकार्यदेते. संसारिक जीवनातच नव्हे तर सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनाच्या विविध क्षेत्रात कार्य करण्याचे तेज स्त्रीच्या अंगी आहे. तिच्यात उपजत असलेले सामर्थ्य समाजजीवनाला व राष्ट्र जीवनाला साहाय्यभूत ठरते. भारतीय संस्कृतीत व वैज्ञानिक युगाचा प्रादूर्भाव या दोन्हीच्या समन्वयातून निर्माण होणारी सुशिक्षित, सुरक्षित, संरक्षित, सुसंस्कृत,सुंदर, संपन्न अशी सर्वांगीण विकसित स्त्री ही राष्ट्रसंत तुकडोजीच्या विचारातून प्रस्तुत झालेलीदिसूनयेते.

**संदर्भ ग्रंथ:**


1)लांजेवार, डॉ. ज्योती.- भारतीय समाज आणि स्त्री,प्रकाशक, सुगावा प्रकाशन, पुणे, 2005

2)मून, मिनाक्षी.-फुलेआंबेडकरी स्त्रीचळवळ,प्रकाशक,समता प्रकाशन, नागपुर,2002

3)दाहट,धनराज.- फुले आंबेडकरी चळवळ,प्रकाशक,संकेत प्रकाशन, नागपुर,2001

4)सत्यनारायण, नीला. (संपादक)- लोकराज्य,नोव्हेंबर-2000,प्रकाशक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन.

5)www.wikipidiya.org

6)https://www.swrajyasavandnews.com

# लघु उद्योगात काम करणाऱ्या बालकामगारांच्या आर्थिक परिस्थितीचे अध्ययन

**अंकोश रामराव लवटे, प्रा.डॉ.संजय के. कटाईत**
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

## गोषवारा

*उत्पादन प्रक्रियेत बालमजुरीचा वापर केला जातो अशा वस्तूंच्या आयातीवर बंदी घालण्याची काही पाश्चात्य राष्ट्रांनी धमकी दिल्यानंतर काम करणाऱ्या मुलांच्या प्रश्नाने अलीकडेच एक नवीन वेग पकडला आहे. दुर्दैवाने, भारत देखील अशा देशांपैकी एक आहे, जेथे विविध उत्पादक क्रियाकलापांमध्ये मोठ्या प्रमाणात बालमजुरी केली जाते आणि तेही दयनीय कामाच्या परिस्थितीत. भारतीय राज्यांमधील भौगोलिक वितरणानुसार, जम्मू आणि काश्मीरमध्ये बालमजुरीचे प्रमाण सर्वाधिक आहे, जेथे ते एकूण बालसंख्येच्या 10.3 टक्के आहे. केरळमध्ये बालकामगारांची लोकसंख्या सर्वात कमी आहे कारण 5 ते 14 वर्षे वयोगटातील 81 टक्के शाळांमध्ये नावनोंदणी सर्वात जास्त आहे. 9 ते 11 वयोगटातील बहुतांश बालकामगार कामगार बाजारात येतात. बहुतेक मुले निश्चित पेमेंटच्या आधारावर काम करतात आणि ते देखील एजंटद्वारे. या कामगारांच्या कामाच्या परिस्थितीचा विचार केल्यास, मुले अत्यंत दयनीय परिस्थितीत काम करतात.*

### प्रस्तावना

भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून उदयास आला आहे. भारतातीलमजबूत लोकतंत्र आणि युवाशक्ती यांच्यामुळे पुढील काही काळात भारत ही जगातीलतीन प्रमुख आर्थिक शक्तींपैकी एक होण्याची अपेक्षा आहे.भारत आज विविधक्षेत्रांत दिवसें दिवस चांगली प्रगती करीत आहे. नवीन तंत्रज्ञान, बाजारपेठेचा जागतीकविस्तार यामध्ये सातत्याने वृध्दीहोत आहे. आशिया खंडात चीनला आव्हाहन देणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताकडे बघितले जाते. भारताची लोकसंख्या जगाच्या एकूण लोकसंख्येच्या 17.7% इतकी आहे. भारताची अर्थव्यवस्था हीमिश्रित स्वरुपातआहे, कारण खाजगी क्षेत्र सार्वजनिक क्षेत्रासोबत एकत्र आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला प्रमुख आव्हाहन आहे ते वाढती लोकसंख्या, बेरोजगारी, दारिद्र्य, आर्थिक विषमता, कुपोषण, स्त्री भ्रूणहत्या, बलात्कार, शेतकरी आत्महत्या, वाढती महागाई व बालकामगार इत्यादीचा समावेश होतो. स्वातंत्र्याच्या 75 वर्षांनंतरही भारतातील या सामाजिक व आर्थिक समस्या दूर झाल्या नाहीत. आज ही या समस्या देशाच्या विकासाला बाधा ठरत आहे.

बालमजुरी ही अनेक दशकांपासूनची गंभीर समस्या आहे आणि अनेक विकसनशील देशांसाठी हेएकआव्हान आहे. हे केवळ विकसनशील देशांच्या गरीब भागातच नव्हे तर विकसित देशांमध्येसुध्दाशतकानुशतके अस्तित्वात आहे. अनेक देशांनी विविध कायदे अमंलात आणून बालमजुरी या गंभीर समस्याचे निर्मूलन करण्यासाठी पुढाकार घेतला आहे, तरीही ही समस्या जगभरात व्यापक स्वरुपातआहे. भारतातील बालमजुरीच्या घटनांची कारणे गुंतागुंतीची आणि समाजात खोलवर रुजलेली आहेत. गरिबी हे मुख्य कारण असल्याचे दिसते. शहरी आणि ग्रामीण भागात बालकामगार आढळतात. दारिद्र्य अधिक प्रमाणात असल्याने बहुतांश बालमजुरी ग्रामीण भागात होतात. अनेक गरीब कुटुंबे शहरी भागात चांगल्या जीवनासाठी संघर्ष करीत असलेतरी कुटुंबांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि जगण्याची खात्री करण्यासाठी कुटुंबांना त्यांच्या मुलांना काम करण्यास भाग पाडले जाते.

विविध कामांमध्ये मुलांना कामावर ठेवण्याचा मुद्दा हा समाजशास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, नोकरशहा आणि राजकारण्यांच्या मुख्य चिंतेपैकी एक आहे. किमान कल्याणकारी राज्याच्या स्थापनेपासून ते प्रदीर्घ काळापासून बालमजुरी दूर करण्याचे मार्ग आणि मार्ग शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. आजकाल आधुनिक जगात मुलाचा रोजगार हा कोणत्याही राष्ट्रासाठी कलंक मानला जातो.

उत्पादन प्रक्रियेत बालमजुरीचा वापर केला जातो अशा वस्तूंच्या आयातीवर बंदी घालण्याची काही पाश्चात्य राष्ट्रांनी धमकी दिल्यानंतर काम करणाऱ्या मुलांच्या प्रश्नाने अलीकडेच एक नवीन वेग पकडला आहे. या धमकीमुळे या विषयावर एक नवीन प्रबोधन झाले आहे. जगभरात या धोक्याची व्यापक

प्रतिक्रिया होती, विशेषत: विकसनशील देशांमध्ये, जिथे मुले त्यांच्या कार्यशक्तीचा एक मोठा भाग बनवतात आणि देशात निर्यात आणि मोठ्या प्रमाणात वापरासाठी अनेक महत्त्वाच्या वस्तू तयार करतात.

दुर्दैवाने, भारत देखील अशा देशांपैकी एक आहे, जेथे विविध उत्पादक क्रियाकलापांमध्ये मोठ्या प्रमाणात बालमजुरी केली जाते आणि तेही दयनीय कामाच्या परिस्थितीत. यातील अनेक क्रियाकलाप इतके घातक आहेत की हजारो मुले प्रौढ होण्याआधीच आपला जीव गमावतात किंवा त्यांचे आयुष्य खूपच कमी होते. तसे न झाल्यास त्यांचे बालपण पूर्णपणे हरवून जाते. त्यांना इतके कठोर परिश्रम आणि इतके मोठे काम केले जाते की त्यांना चांगल्या आयुष्यासाठी बालपण किंवा पौगंडावस्थेतील स्वप्ने पाहण्यापासून वंचित ठेवले जाते.

भौगोलिक वितरणानुसार आतापर्यंत भारतीय राज्यांचा संबंध आहे, जम्मू आणि काश्मीरमध्ये बालमजुरीचे प्रमाण सर्वाधिक आहे, जिथे ते एकूण बालसंख्येच्या 10.3 टक्के आहे. जम्मू आणि काश्मीर पाठोपाठ मध्य प्रदेशचा क्रमांक लागतो जिथे हेच प्रमाण 7.9 टक्के आहे. त्यापाठोपाठ सिक्कीम (6.8), हिमाचल प्रदेश (5.8), राजस्थान (5.6), बिहार (3.7), मणिपूर आणि त्रिपुरा (3.0), पश्चिम बंगाल (3.8), मेघालय (7.9), कर्नाटक (7.6), महाराष्ट्र (7.6) यांचा क्रमांक लागतो. 6.4, नागालँड (5.6), गुजरात (4.7), पंजाब (3.6), हरियाणा (3.6), उत्तर प्रदेश (3.0) आणि केरळ (1.0) टक्के. यावरून असे दिसून येते की शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या राज्यांमध्ये शैक्षणिकदृष्ट्या प्रगत राज्यांपेक्षा बालमजुरीचे प्रमाण जास्त आहे. केरळमध्ये बालकामगारांची लोकसंख्या सर्वात कमी आहे कारण 5 ते 14 वर्षे वयोगटातील 81 टक्के मुलांची शाळांमध्ये नोंदणी सर्वाधिक आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधन पश्चिम विदर्भातील लघु उद्योगात काम करण्याऱ्या बालकामगारांच्या समस्या व त्यांच्या आर्थिक परिस्थितीचे चिकित्सक अध्ययन कालखंड 2011 ते 2020 विषयाचे अध्ययन करीत असताना पश्चिम विदर्भातील लघुउद्योगाचे स्वरूप कशाप्रकारे आहे. तसेच पश्चिम विदर्भातील लघुउद्योगात काम करण्याऱ्या बालकांच्या समस्या कोणकोणत्या आहेत. बालकामगार समस्या निर्मूलन करण्यासाठी कोणकोणती शासकीय धोरणे आहे. या संदर्भातील संशोधन अध्ययनाचा उद्देश आहे. लघुउद्योग बालकामगारांच्या आर्थिक जीवनाच्या निगडित असलेल्या स्थितीचे अध्ययन करणे संशोधनाची उद्दिष्टे खालिलप्रमाणे आहेत.

1) पश्चिम विदर्भातील लघुउद्योगाचे स्वरूप अभ्यासणे.

2) पश्चिम विदर्भातील लघुउद्योगात काम करण्याऱ्या बालकामगाराला योग्य वेतन आणि एकाच
उद्योगात वर्षभर काम मिळते की नाही याचा अभ्यास करणे.

3) लघुउद्योगात काम करण्याऱ्या बालकामगारांच्या आर्थिक, सामाजिक आणि आरोग्यविषयक परिस्थितीचा अभ्यास करणे.

## संशोधन कार्यप्रणाली

पहिल्या टप्प्यात पश्चिम विदर्भातील अमरावती विभागाच्या निवड उद्देशाने करण्यात आली. पश्चिम विदर्भातील शहरातील संपूर्ण बालकामगारांना सर्वोत्तम प्रतिनिधित्व मिळावे यासाठी, सध्याच्या अभ्यासात स्तरीकृत यादृच्छिक क्लस्टर सॅम्पलिंग पद्धत पुनर्संचयित करण्यात आली आणि विविध व्यवसायातील 300मुलांचा नमुना काढण्यात आला.

## संशोधन कार्यपद्धती

कोणतेही संशोधन समस्यांचे अध्ययन पूर्ण होण्यासाठी संशोधन पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक असते. संशोधन समस्येचे शास्त्रीय विश्लेषण करण्यासाठी तसेच संशोधन समस्येतील समस्या शोधून काढणे व त्यांची चिकित्सा करण्यासाठी संशोधन पद्धतीची आवश्यकता असते. संशोधन हे वैज्ञानिक पद्धतीनुसार, ऐतिहासिक पद्धतीनुसार, शब्द अध्ययन पद्धतीनुसार विश्लेषणात्मक अध्ययन पद्धतीनुसार करण्यात येत असते. प्रस्तुत संशोधनामध्ये विश्लेषणात्मक पद्धती अनुसार समस्यांचे अध्ययन करण्यात आले. विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीच्या आराखड्यामध्ये संशोधन समस्येचे विश्लेषणात्मक मांडणी करण्यात आले. संशोधन विषय अध्ययन पद्धती व व्याप्ती निश्चित करून संशोधनाचे विश्लेषण करण्यात आलेआहे. या पद्धतीमध्ये मुख्य उद्देश एखाद्या समस्येशी संबंधित असलेल्या वास्तविक तथ्यांच्या आधारे विश्लेषण करणे आहे. संशोधनात संशोधन विषयाच्या बाबतीत पूर्ण माहिती प्राप्त करून घेणे आवश्यक असते हे संशोधन

शास्त्रीय पद्धतीने करण्यासाठी या पद्धतीचा वापर करण्यात येते. संशोधनाच्या कार्यपद्धतीमध्ये पुढील बाबींचा समावेश केला आहे.

## तथ्येवसंकलन

### तक्ताक्र. 1बालमजुरांचीवयोमानानुसारटक्केवारी

| उद्योग | वयोमानानुसार टक्केवारी | | | | | | एकुण | सरासरी | S.D. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 8-10 | 10-11 | 11-12 | 12-13 | 13-14 | 14-16 | | | |
| 1. ऑटो गॅरेज | 8 | 11 | 13 | 8 | 12 | 24 | 76 | 12.67 | |
| 2. गालीचा | 3 | 8 | 5 | 6 | 4 | 10 | 36 | 6.00 | 1.28 |
| 3. हॉटेल | 6 | 9 | 17 | 21 | 10 | 21 | 86 | 14.00 | 2.26 |
| 4. मार्बल | 9 | 5 | 4 | 9 | 16 | 12 | 55 | 9.17 | 1.26 |
| 5. चांभार काम | 5 | 7 | 8 | 6 | 9 | 14 | 47 | 8.17 | 1.21 |
| एकुण | 31 | 40 | 47 | 50 | 51 | 81 | 300 | 50.00 | 8.02 |
| टक्केवारी | **10.33** | **13.33** | **15.67** | **16.67** | **17.00** | **27.00** | **100.00** | - | - |

### तक्ता क्र. 2. कोणाला मजुरी दिली जाते ते दर्शवित आहे

| उद्योग | मुले | | पालक | | मध्यस्थी | | एकुण पगार | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑटो गॅरेज | 36 | 47.37 | 14 | 18.42 | 3 | 3.95 | 23 | 30.26 | 76 |
| कापड उद्योग | 17 | 47.22 | 3 | 8.33 | 5 | 13.89 | 11 | 30.56 | 36 |
| हॉटेल | 44 | 51.16 | 13 | 15.12 | 6 | 6.98 | 23 | 26.74 | 86 |
| मार्बल | 37 | 67.27 | 6 | 10.91 | 3 | 5.45 | 9 | 16.36 | 55 |
| चांभार काम | 22 | 46.81 | 9 | 19.15 | 5 | 10.64 | 11 | 23.40 | 47 |
| **Total** | 156 | 52.00 | 45 | 15.00 | 22 | 7.33 | 77 | 25.67 | 300 |

### तक्ता क्र. 3. मिळणाऱ्या वेतनाचे स्वरुप नगदी स्वरुपात मिळते किंवा नाही

| उद्योग | नगदी | |
|---|---|---|
| | होय | नाही |
| ऑटो गॅरेज | 76 | 00 |
| कापड उद्योग | 36 | 00 |
| हॉटेल | 86 | 00 |
| मार्बल | 55 | 00 |
| चांभार काम | 47 | 00 |
| एकुण | 300 | 00 |

### तक्ता क्र. 4. विविध उद्योगांमध्ये कार्यरत स्थितीकामाची परिस्थिती समाधान सामान्य

| कामाची स्थिती | समाधानकारक | | सामान्य | | असमाधानकारक | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण | टक्केवारी | एकुण | टक्केवारी | एकुण | टक्केवारी |
| हलकेस्वरुपाचे काम | 63 | 21.00 | 64 | 21.33 | 173 | 57.67 |
| अवघडकाम | 123 | 41.00 | 25 | 8.33 | 152 | 50.67 |
| धूळ आणि धूर | 123 | 41.00 | 68 | 22.67 | 109 | 36.33 |
| तापमान | 125 | 41.67 | 69 | 23.00 | 106 | 35.33 |
| आर्द्रता | 98 | 32.67 | 141 | 47.00 | 61 | 20.33 |
| सुरक्षितता | 86 | 28.67 | 111 | 37.00 | 103 | 34.33 |
| प्रथमोपचार | 68 | 22.67 | 124 | 41.33 | 108 | 36.00 |
| पिण्याचे पाणी | 125 | 41.67 | 123 | 41.00 | 52 | 17.33 |
| सभोवतालची स्वच्छता | 127 | 42.33 | 124 | 41.33 | 49 | 16.33 |
| आत स्वच्छता | 68 | 22.67 | 125 | 41.67 | 107 | 35.67 |
| अन्न सुविधा | 135 | 45.00 | 125 | 59.20 | 40 | 13.33 |

बहुतेक बालमजूर 9-11 वयोगटातील कामगार बाजारात येतात. याचा अर्थ जेव्हा ते प्राथमिक वर्गात असले पाहिजेत तेव्हा ते येतात आणि श्रमिक बाजारात सामील होतात. हे सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या व्यवस्थेचे अपयश दर्शवते.

एजंटांमार्फत बालकामगारांची मागणी करून त्यांची मजुरी या एजंटांमार्फत दिली जाते, हेही एक महत्त्वाचे वैशिष्ट्य दिसून आले. बहुतेक मुले निश्चित पेमेंट आधारावर काम करतात. मजुरी बहुतेक साप्ताहिक आधारावर रोख स्वरूपात दिली जाते.

कामकाजाच्या परिस्थितीचा विचार केल्यास, मुले अत्यंत दयनीय परिस्थितीत काम करतात. त्यापैकी बहुतांश असंघटित क्षेत्रात काम करत असल्याने कामकाजाच्या परिस्थितीबाबत कोणतेही नियम व नियम पाळले जात नाहीत. ज्या युनिटमध्ये बालकामगार काम करतात तेथे आर्द्रता आणि तापमानाची उच्च पातळी असते, योग्य प्रकाशाचा अभाव, स्वच्छता, पुरेशा वायुवीजनाची व्यवस्था नाही, प्रथमोपचार किंवा वैद्यकीय सुविधा नाहीत. या कार्यरत युनिट्समध्ये पिण्याचे शुद्ध पाणी, करमणुकीच्या सुविधा आणि शौचालयाची व्यवस्था यांचाही अभाव आहे.

## निष्कर्ष

वरील सर्व वस्तुस्थितीवरून असे दिसून येते की, श्रमिक बाजारातून बालमजुरी दूर करण्यासाठी काही विशेष कार्यक्रमांची आवश्यकता आहे आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारला दक्ष राहावे लागेल. तरीही, बालमजुरीची समस्या ही थेट गरिबी आणि मागासलेपणाचा परिणाम आहे आणि अशाप्रकारे जेव्हा आपण गरिबी आणि मागासलेपणातून बाहेर पडू तेव्हाच ही समस्या पूर्णपणे आणि कायमस्वरूपी दूर होऊ शकते हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. सरकार प्रौढ शिक्षणावर एवढा भर देत असताना, सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या विश्वासू अंमलबजावणीसाठी अधिक काळजी घ्यावी, असे सुचवले जाते. प्राथमिक शाळांमधील उपस्थितीच्या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. अलीकडेच सरकारने शाळांमध्ये माध्यान्ह भोजन कार्यक्रम सुरू केला आहे, जो एकीकडे प्राथमिक शिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आणि दुसरीकडे बालमजुरी कमी करण्यासाठी खूप मोठा पल्ला गाठू शकेल.

एखाद्याने हे कधीही विसरता कामा नये की आधुनिक युगाच्या जवळच्या अर्थव्यवस्थेत, संपूर्ण अर्थव्यवस्था जर मागासलेली आणि उदासीन असेल तर समाजातील कोणताही एक घटक फार काळ समस्यामुक्त राहू शकत नाही. जेव्हा विकास प्रक्रिया गतिमान होते, तेव्हा गरजेनुसार समाजातील विविध घटकांच्या कल्याणासाठी काही विशिष्ट कार्यक्रम राबवायचे असतील.

असा निष्कर्ष काढा की सरकार, नियोक्ते, संघटना, नागरी समाज संस्था आणि अगदी व्यक्तींनी - उठून 'बालमजुरीविरुद्ध कारवाई' करण्याचे वचन 2025 हे बाल कामगार निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून आंतरराष्ट्रीयसमुदायानेआपल्याघोषणेचा भाग म्हणून घेतले पाहिजे.त्यामुळेचआपली आजची कृती उद्याचे मुलांचे भविष्य ठरवेल.

## संदर्भग्रंथसूची


1. के.सागर,के, असा हा महाराष्ट्र, सागर पब्लिकेशन, पुणे - 2014.
2. लोकराज्य,,माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई- 4
3. काळे या. मा. वऱ्हाडचा इतिहास 1997, पृ.क्र.107
4. महाराष्ट्रराज्य, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
5. शिर्के, पी. ए. (2012). बालकामगार प्रथा निर्मूलन. मुंबई : लोकवाङ्मय प्रकाशन. पृ.क्र. ३.
6. चौधरी गोकुळ, (2013) बालमजुरी पुनर्वसन प्रक्रियेत शिक्षण एक मार्ग, शिक्षण आणि समाज इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, कोथरूड, पुणे.
7. धडफळे, मोहन (2014). यशमंथन बालकामगार विशेषांक. योजना. मुंबई माहिती व प्रसारण मंत्रालय विभाग. पृ.क्र. 5.
8. समाजसेवा बालमजूर विशेषांक, मार्च 2021, कित्ता, पृ.क्र. 5.
9. बालमजुरी विरोधी अभियान. (2019). भारतातील बालमजुरी. नवी दिल्ली :प्रकाशन युनायटेड नेशन चिल्ड्रन्स फंड. पृ.क्र. 2.
10. देशमुख प्राची, फडणवीस मृणालिनी (2000), श्रम अर्थशास्त्र, पिंपळापुरे प्रकाशन, नागपुर,. कित्ता, पृ.क्र. 16.

# वृद्धाश्रम आणि भारतीय समाज
# (Home for aged & Indian Society)

**ज्ञानेश्वर नामुर्ते**
सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्याल, अमरावती

**प्रस्तावना :**

प्राचिन कुटूंबामध्ये वृद्धाचे स्थान अत्यंत महत्वाचे होते.कोणताही निर्णय घेत असतांना कुटूंबामध्ये वृद्धांच्या समस्या संयुक्त कुटूंबाचे विघटन होऊन केंद्र कुटूंबे निर्माण होत आहेत.

आज मानवाने साध्य केलेली वैज्ञानिक प्रगती, नवनविन शोध, उपचाराच्या नविन पद्धती, आरोग्य विषयक सेवा-सुविधा, साथीच्या व अन्य रोगांवर मिळविलेले नियंत्रण, प्रगत तंत्रज्ञान, शिक्षणाचा प्रसार व प्रचार, उंचावलेले राहणीमान, ३० अनेक घटकांच्या प्रभावामुळे घटत चाललेला जन्मदर व मृत्युदर आणि वाढते आयुर्मान या लोकसंख्यात्मक घटकातील बदलामुळे जगाची एकूण लोकसंख्या सतत वाढत आहे. जगाच्या एकूण लोकसंख्येत वृद्धांचे ६० प्रमाण देखील वाढत चालले आहे. १९९५ मध्ये जगाच्या एकूण लोकसंख्येत वृद्धांची संख्या ५४.२ कोटी होती ती आज ५८ कोटीपेक्षा जास्त असून इ.स. २०५० पर्यंत जगातील वृद्धांची संख्या ही १.९ अब्ज होईल असा अंदाज आहे.[१] (United Nations १९९८)

जगातील सर्व राष्ट्रांनी जागतिक पातळीवर वृद्धांच्या समस्येवर सविस्तर चर्चा करुन निश्चित धोरण आखण्याचा प्रयत्न हा संयुक्त राष्ट्र संघाद्वारे (UNO) इ.स. १९८२ मध्ये व्हिएन्ना येथे आयोजित केलेल्या जागतिक परिषदेत झाला. विकसीत राष्ट्रांनी या परिषदेतील सुचनांप्रमाणे व संयुक्त राष्ट्रसंघाच्या (UNO) वृद्धांविषयक मार्गदर्शक तत्वाप्रमाणे आपल्या देशाच्या वृद्धांच्या प्रश्नाविषयीचे धोरण आखण्यास सुरुवात केली.

शासकीय पातळीवर इ.स. १९८२ नंतर वृद्धांच्या समस्येबाबत प्रयत्नांना वेग आलेला दिसून येतो.कल्याणकारी राज्य म्हणून भारताच्या राज्य घटनेतील कलम ४१ नूसार वृद्धांना सेवासुविधा उपलब्ध करुन देणे व सहाय्यता करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. त्यामुळे पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून सामाजिक सुरक्षे संबंधीचे उपाय म्हणून प्रयत्न केलेले आहेत. वृद्धापकाळ, निवृत्ती वेतन योजना (Nataional old age pension Scheme १९९५) इत्यादी योजना इ.सन १९९० नंतर राबविल्या गेल्या. १५ ऑगष्ट १९९९ पासून भारत सरकारने वृद्धांच्या कल्याणासाठी राष्ट्रीय धोरण स्विकारण्यात आले हे धोरण The National Policy On order Persons (NPOP) या नावाने ओळखले जाते.

प्रा. योगेंद्रसिंग (१९९४) यांनी आपल्या संशोधनातुन हे स्पष्ट केले आहे की, भारतीय समाजातील कुटुंबा, भावकी, जाती, नाते संबंध व्यवस्था या वृद्धांसाठीच्या प्रमुख आधार व्यवस्था होत असलेल्या परिवर्तनामुळे वृद्धांचे प्रश्न निर्माण झाले आहेत. भारतीय समाजाच्या विकास प्रकियेतील औद्योगिकरण, नागरीकरण, तरुण पिढीतील वाढते स्थलांतर, भौतिक वादाचा वाढता प्रभाव, स्त्रियांचे शिक्षण व बदलत्या भूमिका, व्यक्ती वादी विचार सरणी इ. कारणामुळे पूर्वापार चालत आलेल्या भारतीय संस्कृतीला धक्का बसला आहे.[२] वृद्ध माता- पित्याविषयी मुलांना वाटणारा आदर व कृतज्ञतेची भावना, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी ही पारंपारिक कुटूंब पद्धतीची गुणवैशिष्टे दिवसेंदिवस कमकुवत बनत चालली आहेत.[३] (Bose : १९९९, Jammyna : १९८७, १९९८, sing १९९९, Nayar : १९९९, Ram Murti : et.al १९९२, १९९२b) या विकासात्मक बदलांचा परिणाम म्हणून कुटुंबाकडून वृद्धांची काळजी घेणे व त्याचा सांभाळ करणे ही एक गंभिर समस्या बनली आहे.[४] (Jammuna : १९८७, १९९०, १९५७, १९९८) त्यामुळे अनेक कुटुंबासाठी वृद्ध व्यक्ती हा भार वाटत आहेत.

पारंपारिक भारतीय कुटूंब पद्धतीच्या रचना व कार्यात मुलभूत बदल झालेला असून, विभक्त कुटूंब पद्धतीचे प्रचलन वाढत चालले आहे.[५] (२००३) यांच्या संशोधनात फक्त १४% कुटूंबे ही संयूक्त कुटूंबे असल्याचे आढळून आले आहेत. संयुक्त कुटुंबाचे वेगाने होणारे विघटन व वाढते प्रचलन या बदलांमुळे समाजात पूर्वीप्रमाणे वृद्धांच्या अधिकारांचे संरक्षण होत नाही. वृद्धांचे राहणीमान व आरोग्यमान अत्यंत वाईट स्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे बहुसंख्या वृद्ध हे ( ९५% ) आपल्या कुटुंबासोबत राहत असले तरी कौटूंबिक जिवनात ते उपेक्षीत, दुर्लक्षीत बनलेले आहेत.[६]

डिसुझा (१९८२-८३) यांनी वृद्धांबाबत मेरठ शहरात केलेल्या संशोधनातुन असे दिसून आले की, बहुतेक कुटूंबात वृद्धांना अन्य समस्याकडून उपेक्षित व दुर्लक्षीत केले जाते आणि वेगळी वागणुक दिली जाते.[७] मार्टिन (१९९०) यांच्या संशोधनातुन देखील असाच निष्कर्ष निघालेला आहे. तेव्हा संयुक्त कुटूंबपद्धतीच्या विघटनातुन व तरुण पिढीच्या बदलत्या जिवनशैलीमुळे भारतीय वृद्धांच्या कौटूंबिक व समाज जिवनात खालावत चाललेला दर्जा, घटलेले उत्पन्न व आर्थिक परावलंबन स्विकारुन लागणाऱ्या दुय्यम भूमिका, परकेपणा, व एकाकीपणाची भावना, आरोग्यविषयक व रिकाम्या वेळेच्या समस्या आणि या समस्यांच्या सोडवणुकीसाठी सेवा -सुविधांची असलेली कमतरता या प्रमुख समस्या निर्माण झाल्या आहेत.[८] (Golpelwar १९६४ Manjula १९६७, Nirmala १९७९, Nayar १९९२) म्हणजे भारतीय समाजात वृद्धांच्या संदर्भात निर्माण झालेल्या समस्या आरोग्य विषयक, आर्थिक, मानसिकव सामाजिक स्वरुपाच्या आहेत.[९]

वर्तमान भारतीय समाजातील वृद्धांची पिढी ही अपेक्षीत व एकाकी जीवन जगण्यास बाध्य होत चालली आहे.परंत समाजाला संघटीत व सुव्यवस्थित रुप देण्यासाठी योगदान करणाऱ्या वृद्ध पिढीच्या योगदानाची व भूमिकेची उपेक्षा करता येणार नाही.म्हणून वृद्धांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वच पातळयांवर प्रयत्न होणे गरजेचे आहे.या धोरणात प्रामुख्याने वृद्धांच्या आरोग्यविषयक, आर्थिक आणि निवारा विषयक प्रश्नांची सोडवणुक करण्यास प्राध्यान्य देण्यात आले आहे.केंद्र शासनाच्या आर्थिक मदतीतून सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने वृद्धाश्रमांची उभारणी करुन ते चालविते हा या धोरणातील महत्वाचा पैलु आहे.

शोध निबंधाचा उद्देश :-

१) वृध्दाश्रम व्यवस्थेचे स्वरूप समजून घेणे.

२) जागतीक पातळीवर वृध्दांच्या समस्येची तिव्रता लक्षात घेणे.

३) वृध्दाश्रमातील वृध्दांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंध तयार करतांना तथ्य संकलीत करण्यासाठी व्दितीय तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे.दुय्यम तथ्य संकलनात उपलब्ध साहित्य, संदर्भ, पुस्तके, संदर्भग्रंथ, इंटरनेट, कार्यालय, अहवाल, वृत्तपत्रे इत्यादींचा वापर करण्यात आलेला आहे.

**भारतीय समाजातील वृद्धाश्रम :-**

'वद्धांचे प्रश्न' ही भारतीय समाजातील अतिशय गुंतागुंतीची अशी आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक समस्या बनली आहे.ज्यावर प्रभावी उपाय शोधणे गरजेचे आहे. निवास व्यवस्था ( Living Arrangement) ही मानवी जीवनावर वृद्धापकाळातील जीवन पद्धतीवर विविध प्रकारे प्रभाव टाकते. भारतीय वृद्ध हे वृद्धापकाळातील कुटूंबाकडून आधाराची अपेक्षा करतात आणि कुटुंबात राहतात. कारण त्यांचे सामाजिकरण इ आलेले असते असे मत भारतीय वृद्धांबाबतच्या अनेक संशोधनातून मांडले गेलेले आहे. त्यामुळे भारतीय वृद्धांचे वृद्धापकाळातील समाधान हे त्यांच्या कुटुंबासोबत एकत्र वास्तव्य करण्याशी निगडीत आहे.[१०] (Cherain २००३, Dave and John २००३) म्हणून आज देखील कुटुंब हिच वृद्धांची मुलभुत आधार व्यवस्था आहे. तरीपण दिनचर्या केंद्रे, दिन सुविधा केंद्रे (Day Care Centers) वृद्धांसाठीची स्वतंत्र इस्पितळे आणि वृद्धाश्रम हे वृद्धांच्या राहण्याच्या

व्यवस्थेबाबत महत्वाची भूमिका बजावत आहेत. (Irudaya Rajan, २०००)

आधुनिक काळात भारतीय समाजातील वृद्धांत वृद्धाश्रमात राहण्याची प्रवृत्ती वाढत आहे.नॅशनल सॅम्पल सर्वे ऑर्गनायझेशनच्या (१९९८) अहवालातुन असे स्पष्ट होते की, भारतातील ७ कोटी वृद्धापैकी ३६.७% वृद्धांनी वृद्धाश्रमात जाण्याची इच्छा व्यक्त केली. कारण ते एकटे जीवन जगण्यास असमर्थ आहेत. (NSSO-१९९८) परंतु हे देखील विसरून चालणार नाही की, आज सुद्धा वृद्धाश्रमांची सुविधा घेणाऱ्या भारतीय वृद्धांचे प्रमाण हे ५% पेक्षा कमी आहे. इ.स. १९९१ च्या जणगणनेनुसार फक्त २.७३% वृद्ध हे वृद्धाश्रमात राहत होते.[११] (SarvekshanaNSSO-१९९१).

सेवाभावी ऐच्छिक स्वरुपाच्या संघटनामार्फत वृद्धाश्रम चालविण्याचा पहिला प्रयत्न १८४० मध्ये बंगलुर शहरात 'Friends in Need Society' या संघटनेद्वारे केला गेला.१९५० पासून पूणे, मुंबई, सुरत, दिल्ली, लखनौ, कोलकत्ता, चेन्नई आणि सिकंदराबाद या शहरात वृद्धाश्रम स्थापन करण्यात आले.संपूर्ण भारतात आज ९९५ वृद्धाश्रम आहेत त्यापैकी ७३९ वृद्धाश्रमांची सविस्तर माहिती उपलब्ध आहे. एकूण वृद्धाश्रमापैकी ३७१ वृद्धाश्रम हे गरीब व आजारी वृद्धांसाठी, तर ११० वृद्धाश्रम हे फक्त स्त्रियांसाठी उपलब्ध आहेत. "मातोश्री वृद्धाश्रम योजना" शासनातर्फे १९९५ मध्ये सुरु करण्यात आली. या योजनेतील वृद्धाश्रमांना चालविण्यासाठी सेवाभावी संघटनांना पाच एकर जमीन आणि पायाभुत सुविधा विकसीत करण्यासाठी आर्थिक अनुदान देण्यात आले. राज्यातील ३० जिल्ह्यांत प्रत्येकी एक वृद्धाश्रम या योजनेअंतर्गत स्थापन करण्यात आला.[१२] (Bali A,P: २००१)

शासनाकडून मिळणारी आर्थिक मदत ही अपुरी असल्यामुळे या संस्थांना देणगी व इर माध्यमातुन निधी उभारावा लागतो.प्रामुख्याने या मोफत वृद्धाश्रमात निराधार वृद्धांना प्रवेश दिला जात असला तरी निराधार असलेल्या वृद्धांना प्रवेश दिला जातो.परंतु त्या वृद्धांना आपत्कालीन प्रसंगात संपर्कासाठी संपर्क व्यक्तीचे नाव व पत्ता वृद्धाश्रमाच्या कार्यालयात नोंदवावा लागतो. बहुतेक वृद्धाश्रम हे प्रवेश देतांना अशाच निराधार वृद्धांना प्रवेशासाठी प्राधान्य देतात की, ज्या वृद्धांची शारीरिक स्थिती चांगली आहे ते फिरु शकतात, स्नान, कपडे धुणे, यासाठी हालचाली करु शकतात. गरजा भागवू शकतात, वृद्ध व्यक्ती आजारी पडली तर मोफत सेवा देण्याच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले जाते व त्यांच्या नातेवाईकांना कळविले जाते.[१३] (Rammurti and Jamuna १९९७)

वृद्धाश्रमाच्या मुल्यमापनासाठी केला गेलेल्या सर्वेक्षणातुन या वृद्धाश्रमात कोणत्या प्रकारचे वृद्ध येतात ?कोणत्या कारणांमुळे त्यांना वृद्धाश्रमात यावे लागते याचे स्पष्टीकरण मिळते.वृद्धाश्रमाच्या मुल्यमापनासाठी प्रा. राममुर्ती व जमुना १९९७ यांनी केलल्या सर्वेक्षणानुसार जे वृद्ध निराधार, अशिक्षीत, मुल नसलेली आणि ज्या वृद्धांना आपल्या मुलांसोबत कुटुंबात राहण्याची इच्छा नाही असे वृद्ध असे वृद्ध मोफत वृद्धाश्रमात (Free House) प्रवेश घेतात, तर कुटुंबाकडून टाकुन दिलेले कुटुंबाचा त्याग केलेले, मुलांकडून वाईट वागणुक दिलेले, कुटुंबियांच्या गैरवर्तनाला व त्रासाला बळी पडलेले, मुल बाळ नसलेले आणि मुलांबाळापासून दूर राहण्यासाठी स्वेच्छेने वृद्धाश्रमात येणारे वृद्ध हे शुल्क आकारणाऱ्या (Pay and Stay Homes) वृद्धाश्रमात प्रवेश घेतात.[१४]

केंद्रशासनाच्या समाजकल्याण खात्याकडून झालेले सर्वेक्षण प्रा. राममुर्ती व जमुना १९९७ आणि हेल्प एज इंडिया या संस्थेकडून आलेल्या अभ्यासातुन (Ara १९९५) ज्या वृद्ध व्यक्ती वृद्धाश्रमांची सुविधा घेतात त्यांचे वर्गीकरण तीन प्रकारात केलेले आहे.

१) **पहिला प्रकार** :- जे एकटे राहतात, विधवा किंवा विधुर आहेत, वृद्ध पती-पत्नी ज्यांना नियमित उत्पन्नाचे साधन आहे, परंतु ज्यांना मुल- बाळ नाही किंवा मुले आहेत परंतु त्यांनी इतरत्र स्थलांतर केलेले आहे आणि ज्यांना एकाकीपणा व उदासिनता वाटते,

ज्यांना इतरांच्या सहवासाची गरज आहे, आरोग्यविषयक प्रश्न आहेत आणि ज्यांना राहत असलेल्या ठिकाणी असुरक्षित वाटते असे वृद्ध या प्रकारात येतात.

२) **दुसरा प्रकार :-** मुळबाळ नसलेले वृद्ध जोडीदार, जे अपुऱ्या उत्पन्नामुळे स्वतंत्र राहु शकत नाही, तशा स्थितीत नसतात असे वृद्ध या प्रकारात येतात.

३) **तिसरा प्रकार:-** मुलांकडून मिळणाऱ्या वाईट वागणुकीमुळे व कुटुंबाकडून होणारा अत्याचार टाळण्यासाठी वृद्धाश्रमात आलेल वृद्ध या प्रकारात येतात.

**सारांश :-**

वरील सर्वेक्षणातुन हे स्पष्ट होते की, भारतीय समाजात वृद्धाश्रमाबाबत नकारात्मक दृष्टिकोन असल्यामुळे केवळ गरजु आणि परिस्थितीच्या दबावामुळेच वृद्ध व्यक्ती वृद्धश्रमाच्या संस्थात्मक आधार व्यवस्थेची सेवा स्विकारतात. आधुनिक भारतीय समाजातील वेगाने बदलती सामाजिक परिस्थिती ही वृद्धांना वृद्धाश्रमासारख्या आधार व्यवस्थांच्या आधारे जगण्यास बाध्य करीत आहेत.

**संदर्भ सूची :-**


1) United Nations (1998) World Population projections to 2150, Department of Economic and Social Affair, population division New York, Author
2) Yogendra Sing (1995) Changing trends in the Indian family and the Adjustment of the Aged, Research and Development Journal (Help age India 1 (1) Oct. 23-30
3) Bose, A (1195) Care of the elderly in the unorganized sector R & D Journal 1 (3) 3-14
4) Jamuna D. (1987) Self and Caregirers perception of need and problems of elderly Women -A case for guidance and counseling. Journal of counseling and community Guidance, 4(3) 25-32
5) Nayar, P.K.B. (1999) Changing role of the family in the Care of the elderly in B.J. pendse, Ageing in India Bombay Somaiya Rubs Pvt. Ltd. 169-178
6) Sing J.P. (2003) "Nuclear action of house hold and family in urban Indian" Sociological Bulletin 52 (1).
7) D Souza, V.S (1982) Changing Social Scene and its implication for the aged in Aging in India, K.G. Desai ed. P.P. 71-79, Bomby Tata Institute of Social Science.
8) Martin L (1990) "The Status of South Asias Growing elderly population : Journal of Cross - Cultural Gerontolon Yo 1.5 No.2 P.P. 93-117.
9) Golpewar, V.M. (1964 Problem of the aged in changing pattern of Society, Bombay. Tata Institute of Social Science.
10) Cherian J. (2003) Adjustment of Elderly in relation to living arrangement. gender and family life satisfaction Indian Journal of Gerontology 17 (1-2) P. 99-108
11) National Sample Survey organization (1991) socio-Economic profile of the aged person NSS42nd round (July 1986- June 1987) Sarvekshana 15 (2) New Delhi, Author.
12) Bali, A.P. (2001) Care of the Elderly in India Changing Configuration, India institute of advance study, Simla.
13) Ramamurti, P.V. & Jamuna D (197) Evaluation of old age Homes, Day care Centers and Mobile Medical units in Andhra Pradesh. Report Submitted to Ministry of Welfare, Govt. of India New Delhi (Primes)
14) Ara, S. (1995) old age Homes: The last resort R & D Journal 2 (1) 3-10.

# 'यवतमाळ जिल्ह्यातील हवामान बदलाचा पीकांच्या लागवडीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास'

**प्रकाश गंगाराम जुमनाके**
संशोधक विद्यार्थी,बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ

**ABSTRACT**

*Agriculture production is dependent on climatic and weather conditions but now-days increasing in temperature, precipitation, and $CO_2$ concentration directly affects crop production. The $CO_2$ concentration is rising at a rate of 1.5 to 1.8 ppm per year. Decline in rainfall of 0.7 percent and 3.0 percent in 2050, of 5.0 percent and 7.6 percent in year 2100 and 3-4 degrees Celsius temperatures are increased by the end of the $21^{st}$ century should be observed in India. Increasing in 10C in temperature reduces wheat production by 4 to 5 percent. After harvesting the crop, crop residue is burned in the field that should also help in increasing the level of $CO_2$ and kill the micro-organisms of that field. Climate change also affects an ecosystem directly or indirectly. Change in climate will affect the groundwater recharge, water cycle, soil moisture, livestoc and aquatic species. Change in climate increase the incidence of pests and diseases, which causes a huge loss in crop production. Due to climate change deterioration in soil fertility, promote salinity, defiance many pesticides, herbicides and deterioration of irrigation water quality should be found.*

**प्रस्तावना :**

शेती हा मानवाचा मुलभूत, अत्यंत महत्त्वाचा आणि सर्वत्र केला जाणारा व्यवसाय आहे.सद्या जगातील जास्तीत जास्त लोकसंख्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे शेतीशी निगडीत आहेत.

हवामानाचा शेतीवर होणारा परिणाम अतिशय महत्त्वाचा आहे.शेतीवर परिणाम करणाऱ्या घटकांत हवामान हा सर्वात प्रभावी घटक आहे.हवामान, तापमानात पर्जन्य व इतर गोष्टींचा समावेश होतो.ज्याठिकाणी तापमान आणि पर्जन्यमान या गोष्टींची मुबलकता असते, तेथे शेतीची प्रगती होते.परंतु हवामान बदल ही जागतीक समस्या म्हणून समोर आली आहे.हवामान बदल ही कोणत्याही एका देशाशी किंवा राष्ट्राशी संबंधीत संकल्पना नसून ती एक जागतिक संकल्पना आहे, जी संपूर्ण पृथ्वीसाठी चिंतेचे कारण बनत आहे.तसे पाहिल्यास हवामान बदलामुळे भारतासह संपूर्ण जगात पूर, दुष्काळ, कृषी धोका वाढत आहे.परंतु भारतातील एक मोठा वर्ग सुमारे 60 टक्के लोकसंख्या असूनही शेतीवर अवलंबून आहे.त्यामुळे हवामान बदलाचे शेतीवर होणारेपरिणाम पाहणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

हवामानाचा शेतीच्या विकासावर परिणाम तर होतोच शिवाय पिकांच्या प्रकारावरही परिणाम होतो. निरनिराळया पिकांच्या वाढीकरीता मध्यम पाऊस व जास्त तापमान तर भात, ज्युट आणि चहाच्या वाढीस भरपूर तापमान आणि पर्जन्य, तसेच गव्हाच्या वाढीस मध्यम तापमान व पर्जन्य लागते. हवामानाची परिस्थिती सर्वत्र सारखी नसल्याने सर्वत्र एकाच प्रकारची पिके होत नाहीत. पर्जन्याच्या वितरणानुसार भारतात निरनिराळया भागात निरनिराळी पिके घेतले जातात. तापमान आणि पर्जन्य या घटकाबरोबरच दव, धुके, दहिवर, गारा, वारे, इत्यादी घटकांचा देखील शेतीवर परिणाम झालेला आहे. भारतातील हवामानाचा भारतातील पेरणीचा काळ व हंगाम यावरही परिणाम झालेला आहे.

भारतीय शेती ही मान्सुन आधारीत असून मान्सुनच्या अनिश्चिततेचा परिणाम कृषी क्षेत्रावर होतो.शेतीतील उत्पादनातील वाढ व घट या दोन्ही बाबी मान्सुन पर्जन्यावर अवलंबून आहे.गेले एक दशक महाराष्ट्र दुष्काळ परिस्थितीला सामोरे जात आहे.यामुळे बहुसंख्य शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत व अनेकांनी आत्महत्येचा मार्ग स्विकारलेला आहे.यवतमाळ जिल्हा शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या बाबतीत अग्रेसर असल्याचे दिसून येते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे अनिश्चित स्वरूपाचे हवामान, बदलत्या हवामानामुळे पिकांचे होणारे नुकसान.

त्यामुळे त्याचा फटका मोठ्या प्रमाणात शेतीवर होतांना दिसून येतो.

**उद्दिष्ट्ये :**

1. बदलत्या हवामानानुसार यवतमाळ जिल्ह्यातील पिकसंगतीत झालेला बदल अभ्यासणे.
2. यवतमाळ जिल्ह्यातील पिकांच्या लागवडीवर हवामान बदलाचा परिणाम अभ्यासणे.

**अभ्यास पद्धती व माहिती संकलन :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी असणारी आकडेवारी ही द्वितीयक स्वरूपाची असून ती माहिती यवतमाळ जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन पुस्तीका वर्ष 2006-07 व 2021-22 यामधून संकलीत केलेली आहे. प्राप्त माहितीचे सांख्यिकीय गणण करून ती सारणी व छाया पद्धतीच्या नकाशाद्वारे दर्शविलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने यवतमाळ जिल्ह्यातील हवामान बदलाचा पीकांच्या लागवडीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करत असताना दोन वेगवेगळ्या वर्षातील पीक संगतीतील बदलाचे विवेचन करून विषय रचना मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यास क्षेत्र :**

यवतमाळ जिल्ह्याचे क्षेत्र विस्तृत असून यवतमाळ जिल्ह्याच्या उत्तरेला व दक्षिणेला नैसर्गिक सिमा प्राप्त झाल्या आहेत. यवतमाळ जिल्हा हा वर्धा-पैनगंगा-वैनगंगा खोऱ्याच्या दक्षिण-पश्चिम भागात वसलेला आहे.या जिल्ह्यात वर्धा व पैनगंगा या प्रमुख नद्या आहेत. यवतमाळ जिल्हा हा महाराष्ट्रातील कापूस उत्पादक जिल्हा आहे.बालाघाट डोंगर रांगांपासून तयार झालेला हा जिल्हा डोंगराळ मध्यम पठाराचा जिल्हा म्हणून ओळखला जातो.येथील हवामान उष्ण व कोरडे असून उन्हाळयात तापमान ४६° से.पर्यंत तर हिवाळयात ११° से.पर्यंत असते तर जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ९६५ मि.मी आहे.जिल्ह्याचा सुमारे २१% भाग (२८५० चौ.कि.मी.) हा वनक्षेत्रात मोडतो.

भौगोलिक दृष्ट्या जिल्ह्याचे स्थान $19^0 26'$ उत्तर ते $20^0 42'$ उत्तर अक्षांश मध्ये आणी $77^0 18'$ पूर्व ते $79^0 9'$ पूर्व रेखांश या दरम्यान वसलेला आहे.जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ 13,584 चौ.किमी.असून 16 तालुक्यांमध्ये विभागला आहे.महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी 4.4% इतका भूभाग या जिल्ह्याने व्यापला आहे.

**जल संधारण :**

या जिल्ह्यातील इसापूर येथे पैनगंगा नदीवर सर्वात मोठे धरण आहे.वनराई बंधारे या योजनेखाली २००५ ते २००८ या चार वर्षांत तब्बल २८,५५३ बंधारे बांधण्यात आले.यवतमाळ जिल्ह्यात २००४ साली दुष्काळ होता.सुमारे सव्वाचार लाख हेक्टर क्षेत्रावरील पेरणी वाया गेली होती.नद्या, नाले, विहिरी, विंधनविहिरी कोरड्या झाल्या होत्या.जिल्ह्याची भूजलपातळी सरासरी १.९९ मीटरने खाली गेली.९५ टक्के गावांमध्ये डिसेंबर अखेर पाणीटंचाईची स्थिती निर्माण झाली.

गावभेटी तसेच, ग्रामस्थ अधिकारी यांच्या चर्चेतून एक वास्तव समोर आले.ते म्हणजे जलसंधारणातील लोकसहभागाचा अभाव. त्याचबरोबर नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी केवळ शासनावर अवलंबून राहण्याची मानसिकता.२००५ मध्ये सुदैवाने चांगला पाऊस झाला.या अनुकूल परिस्थितीत जलसंधारण, त्याला लोकसहभागाची जोड, श्रमदान यासाठी विशेष उपक्रम घेणे आवश्यक होते.त्यासाठी सहजसोपे व विनाखर्ची वनराई बंधारे निर्मितीचे माध्यम निवडले गेले.विविध विकासात्मक कामांसाठी बांधकामातील पोती आणि विक्रेता संघ-कंत्राटदार संघटना यांनी दिलेली सिमेंटची रिकामी पोती त्यासाठी वापरण्यात आली.

२००५ सालापासून पर्यावरण विषय शालेय अभ्यासक्रमात आला.त्यामुळे उपक्रमाच्या पहिल्या वर्षी 'एक शाळा-एक वनराई बंधारा' हा उपक्रम राबविण्यात आला.जिल्ह्यातील १८५९ प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी तब्बल २०४७ वनराई बंधारे बांधले.याची दखल घेऊन 'युनिसेफ'ने हा वृत्तान्त आपल्या वेबसाईटवर प्रसिद्ध केला.त्यानंतरही विद्यार्थ्यांचा सहभाग कायम होता.सलग चार वर्षांत विद्यार्थ्यांनी एकूण ८,३३७ बंधारे बांधले.बंधारे बांधताना ते इतरांसाठी उपयुक्त ठरतील, याकडे विशेष लक्ष दिले.काही ठिकाणी विद्यार्थ्यांनी थेट जंगलात जाऊन वन्यजीवांसाठी वनराई बंधाऱ्यांची निर्मिती केली.तर काही ठिकाणी गावठाण परिसरातील

सार्वजनिक विहिरींची पातळी वाढविण्यास साहाय्यक ठरतील, अशा ठिकाणी वनराई बंधारे बांधले गेले.

यवतमाळ जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 20,77,0144 असून राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या 2.63% एवढी लोकसंख्या आहे.जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता 153 व्यक्ती प्रती चौ.किमी.एवढी असून मध्यम लोकवस्ती गटात मोडते.

या जिल्ह्याचे तापमान विषम असून सर्वसाधारणत: उष्ण व कोरडे आहे. हिवाळ्यामध्ये तापमान फारच कमी, तर उन्हाळ्यात जास्त असते.उन्हाळा व हिवाळा हे ऋतु येथे तिव्रतेने जाणवतात. वर्षभरात अनेकदा एकाच दिवशी तापमानात बराच चढ-उतार होत असतो.जिल्ह्यात मान्सुनमुळे जुन ते सप्टेंबर या महिन्यांत पाऊस पडतो.पावसाचे प्रमाण जिल्ह्याचे सर्व भागात दरवर्षी सारख्याच प्रमाणात नसून त्यात बरीच तफावत आढळते.साधारणत: जुलै व ऑगस्ट महिन्यात पावसाचे प्रमाण जास्त असते.

**जिल्ह्यातील व्यवसाय :**

जिल्ह्यात हातविणकाम (हॅंडलूम), विडी, कागद, साखर, जिनिंग-स्पिनिंग व तेल उद्योग असे अनेक छोटे-मोठे उद्योग आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील महत्त्वाची पिके- कापूस, ज्वारी, भुईमूग, तूर डाळ ही आहेत. जिल्ह्याला कापूस, लाकूड, चुनखडी, कोळसा व संत्री या वस्तूंद्वारे महसूल मिळतो. जिल्ह्यात विपुल प्रमाणात वनसंपत्ती आहे. तेथून लाकूड, बांबू, तेंदू, आपटा, हिरडा व मोह या उपयोगी वस्तू मिळतात. यवतमाळ, पुसद, वणी, दिग्रस, घाटंजी, पांढरकवडा, राळेगाव, उमरखेड, दारव्हा व नेर ही महत्त्वाची व्यापार-केंद्रे आहेत. चांदले शिलाई मशीन हे उमरखेड तालुक्यातील शिलाई मशीनचे अधिकृत व्यापार केंद्रे आहेत


**विषय विवेचन :**

'यवतमाळ जिल्ह्यातील हवामान बदलाचा पीकांच्या लागवडीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास' या शोधनिबंधात इ.स. 2006 व इ.स. 2021 च्या आकडेवारीवरून विवेचन केले असता इ.स. 2006 चे पीक उत्पादन व एकूण पीक लागवड पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**यवतमाळ जिल्ह्यातील इ.स. 2006 साली पीक लागवड क्षेत्र व उत्पादन**

| अ.क्र. | पिकाचे नाव | हेक्टरी क्षेत्र | एकूण उत्पादन |
|---|---|---|---|
| 1 | तृणधान्य | 1,63,416 | 2891 मे.टन |
| 2 | कडधान्य | 1,85,314 | 1681 मे.टन |
| 3 | गळीत धान्य | 1,44,061 | 3063 मे.टन |
| 4 | तंतु पीके | 3,68,656 | 4922 मे.टन |

**सारणी क्र. 1**




2005-06 या वर्षात जिल्ह्यातील लागवडीखालील एकूण 8,90,520 हेक्टर क्षेत्रापैकी अन्न-धान्य पिकाखालील 3,48,730 हेक्टर म्हणजेच 39.16% क्षेत्र होते. एकुण सर्व पिकाखालील क्षेत्रापैकी सर्वात जास्त क्षेत्र म्हणजे 41.39% क्षेत्र कापूस या पिकाखाली होते.त्याखाली खरीप ज्वारी या पिकाखाली 15.88%, गहु पिकाखाली 1.90%, तर डाळी वर्गीय पिकाखाली 20.81% क्षेत्र होते.उसाखाली जवळपास 0.63% क्षेत्र, तर गळीताचे पिकाखाली 16.17% क्षेत्र होते.

इ.स.2006-07 मध्ये कडधान्याचे उत्पादन 1,68,100 मे.टन झाले. सन 2006-07 या वर्षात ज्वारीच्या उत्पादनात सन 2005-06 च्या तुलनेत घट झालेली दिसून येते.


यवतमाळ जिल्ह्याचे ज्वारी, गहु, कापुस, हरभरा, तुर, मुग, उडीद, भूईमुंग, तीळ, जवस ही प्रमुख पिके आहेत. सन 2006-07 मध्ये ज्वारीचे दर हेक्टरी उत्पादन 982 कि.ग्रॅ., मुंग 476 कि.ग्रॅ., गहु 1137 कि.ग्रॅ., हरभरा 825 कि.ग्रॅ., उडीद 392

कि.ग्रॅ. व कापसाचे उत्पादन 202 कि.ग्रॅ.दर हेक्टरी झाल्याचे दिसून येते.

**यवतमाळ जिल्ह्यातील 2022 मधील पीक लागवड क्षेत्र व उत्पादन.**

| अ.क्र. | पिकाचे नाव | हेक्टरी क्षेत्र | हेक्टरी उत्पादन |
|---|---|---|---|
| 1 | तृणधान्य | 63,822 | 681.17 मे.टन |
| 2 | कडधान्य | 2,55,139 | 2226.55 मे.टन |
| 3 | गळीत धान्य | 3,14,318 | 3270.21 मे.टन |
| 4 | तंतु पीके | 4,33,240 | 1135.52 मे.टन |

**सारणी क्र. 2**




वरील दोन्ही वर्षातील पिक लागवडीतील होणारे बदल लक्षात घेतले असता दिवसेंदिवस पिक लागवडीमध्ये फरक जाणवतो.याचे मुख्य कारण म्हणजे हवामान. सर्वात मोठा हवामान बदलाचा परिणाम शेतीवर होत असून त्यात सातत्याने यापुढे वाढ होत असल्याचे संकेत मिळत आहे.यापुढे हे परिणाम आणखी गंभीर समस्या निर्माण करतील.

**पिक पद्धतीत बदल :**

कापूस पिकाचे क्षेत्र कमी करून तिथे तुर, सोयाबिन, मका, इ. पिकांचा पीक पद्धती समावेश होताना याठिकाणी दिसून येत आहे.महाराष्ट्रात कापूस पिकाखालील क्षेत्रात सातत्याने वाढ होत आहे.त्यास कारणही तसेच आहे.बी.टी.कपाशीचे बियाणे निर्मीत करून शेतकऱ्यांना उत्पादन वाढेल अशी माहिती दिल्याने क्षेत्रात वाढ होत आहे.प्रत्यक्षात कापूस पिकाचा कालावधी 7 ते 7.5 महिन्यांचा, तर मान्सुनचा कालावधी जुळत नसल्याने कपासीच्या क्षेत्रात होणारी वाढही गंभीर समस्या निर्माण होत आहे.कपासीचे 94% क्षेत्र कोरडवाहू आहे.कपासीच्या वाढीच्या काळात गरजेनुसार पाणी पुरवठा न झाल्याने कपाशीची महाराष्ट्रातील सरासरी उत्पादकता केवळ 2.93 क्विंटर प्रति हेक्टर आहे. त्यामुळे उत्पादनाचा खर्च अधिक आणि उत्पादकता अतिशय कमी असल्यामुळे खर्चापेक्षा उत्पन्न कमी झाल्याने कपासी लागवड करणारे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडत आहेत, तसेच ते कर्जबाजारी होत आहेत. तेंव्हा कपासीखालील क्षेत्र कमी करून तेथे तुर, सोयबीन, मका या पीकांची लागवड होताना दिसून येते.

यवतमाळ जिल्ह्यात हवामान बदलाने जानेवारी-फेब्रुवारी या दोन महिन्यात थंडीचा चांगला कालावधी मिळत आहे.नोव्हेंबर महिन्यात थंडीचा चांगला कालावधी मिळत असल्याने त्यामध्ये गव्हाची लागवड केली जात आहे.परंतु या महिन्यात काही कारणांमुळे हवामानात बदल होऊन थंडी न मिळाल्यास गव्हाची उत्पादकता कमी होते.शिवाय गारपीठीचा मोठा धोका याठिकाणी उद्भवतो.त्यामुळे पिकसंगतीत बदल करत असताना या ठिकाणाच्या सतत बदलत जाणाऱ्या हवामानाचा अंदाज घेणे कठीण होत आहे.

गारपीठीचा मोठा फटका यवतमाळ जिल्ह्यातील पिकसंगतीत होताना दिसून येत आहे. गारपीठ ही उन्हाळी हंगामातील हवामान बदलाचीच नांदी असून मराठवाडा आणि विदर्भात सन 2014 च्या फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल महिन्यात प्रचंड गारपिठीने नुकसान झाले, जनावरांचीही मोठ्या प्रमाणात हानी झाली. एकुणच त्याचा पिकांवर मोठा फटका बसला.यातुन यवतमाळ जिल्ह्यात पिकांच्या उत्पादकतेवर मोठा फटका पडताना दिसून येत आहे.गारपीठ क्षेत्राचा कालावधी वाढत आहे.याचे गंभीर परिणाम शेती क्षेत्रावर होत आहे.

सन 2006 ते 2021 या कालावधीत यवतमाळ जिल्ह्यातील पिकसंगतीत मोठा बदल होताना दिसून येतो.पण उत्पादनात ज्या पद्धतीने वाढ व्हायला हवी, ती वाढ होताना दिसून येत

नाही.याचे मुख्य कारण म्हणजे हवामान बदल व हीच प्रमुख समस्या पिक उत्पादनात वाढ न होण्यास कारणीभूत ठरत आहे.

विदर्भातील सात जिल्हे हवामान बदलाच्या दृष्टिकोणातून हॉटस्पॉट म्हणून तयार होत असल्याचे दोन वर्षांपूर्वी जागतिक बँकेच्या एका अहवालात नमुद करण्यात आले आहे. आकडेवारी लक्षात घेतली असता यवतमाळ, वाशीम आणि भंडारा या जिल्ह्यांची वाटचाल खरोखीच हॉटस्पॉट दिशेने असल्याचे दिसून येते.

यवतमाळ जिल्ह्यात शेतकरी आत्महत्येचे सर्वाधिक प्रमाण आहे.जिल्ह्यात पावसाचे दिवस कमी झाले व अतिवृष्टीचे प्रमाण वाढले, त्यामुळे स्वाभाविकच शेतीचे गणीत बिघडले.

**निष्कर्ष :**

यवतमाळ जिल्ह्यात सन 2006 ते 2022 या कालावधीत शेतीतील पीकसंगतीतमोठा बदल होताना दिसून येतो. सन 2006 ला लागवडीखालील एकुण क्षेत्र 8,90,520 हेक्टर असून सन 2022 ला त्यात वाढ होऊन 10,80,922 हेक्टर झाल्याचे आढळते. सन 2006 ते 2022 या कालावधीत तृणधान्ये पिकामध्ये मोठी घट असल्याचे दिसून येते व कडधान्य पीकांमध्ये वाढ झालेली आहे, ज्यामध्ये सन 2006 साली हरभऱ्याचे 7,415 हेक्टर क्षेत्र असून 2022 मध्ये 1,26,056 हेक्टर इतके असल्याचे दिसते. परंतु तुर पीकामध्ये घट दिसून येते.

गळीत धान्यात मोठी वाढ होताना दिसून येत आहे.ज्यामध्ये सोयाबीन पिकाचे क्षेत्र वाढताना दिसून येत आहे. यवतमाळ जिल्हा ज्या पिकांनी ओळखला जात होता, ते पिक म्हणजे कापूस, पांढरे सोने म्हणून कापसाला समजल्या जात होते, परंतु दिवसेंदिवस कापुस उत्पादनात बदल होताना दिसून येत ओह. सन 2006 ते 2022 मधील फरक लक्षात घेतला असता कापसाच्या लागवडीखालील क्षेत्रात काही प्रमाणात वाढ झाली आहे.

एकंदरीत यवतमाळ जिल्ह्यात बहुपीक शेतीपीकाचे प्रमाण वाढत असताना, ज्या प्रकारे बहुपीक पद्धत विकसित व्हायला पाहिजे त्या प्रकारे होताना दिसून येत नाही.याचे प्रमुख कारण म्हणजे हवामान बदल.हवामानात होणारा सतत बदल हा पिकसंगतीत होताना दिसून येतो.अनिश्चित स्वरूपाचा पाऊस व त्यामुळे पीकांच्या उत्पादकतेवर मोठा फरक पडतो.अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात पीकांचे नुकसान होताना दिसून येत आहे.

**उपाययोजना :**

1) यवतमाळ जिल्ह्यातील पिकसंगतीत होणारा बदल हा हवामानात होणारा सतत बदल हा महत्त्वाचा कारणीभूत घटक असला तरी पीकांचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीकोणातून उत्पादन वाढविण्यासाठी कृषी प्रदर्शन, फिरती शिबीरे, शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मेळाव्यांचे आयोजन, इ. उपक्रमांद्वारे शेतकऱ्यांना माहिती देवून प्रोत्साहित केले पाहिजे.
2) यवतमाळ जिल्ह्यात शेतकऱ्यांची आत्महत्या मोठ्या प्रमाणात होताना दिसून येते. याचे मुख्य कारण म्हणजे शेतीतील नुकसान व त्यामुळे येणारा कर्जबाजारीपणा.त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देवून विविध सहकारी पतसंस्था स्थापन करून त्यांना आर्थिक सहाय्य देण्यात यावे.
3) शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामासाठी त्वरीत कर्जपुरवठा देण्यातय यावा.
4) नैसर्गीक आपत्तीमुळे नुकसानग्रस्तांना त्वरीत भरपाई व पूर्ण मोबदला मिळावा.

**संदर्भ :**


1) विठ्ठल घारपुरे – कृषी भूगोल, पिंपळापुरे कंपनी एण्ड पब्लिशर्स, नागपूर.
2) यवतमाळ जिल्हा सामाजिक समालोचन, 2005-06 व 2021-22.
3) सुरेश फुले – कृषी भूगोल, विद्याभारती प्रकाशन, लातुर.
4) सुर्यवंशी डी. एस.- कृषी भूगोल, निराली प्रकाशन, पुणे, 2006.

# अस्वस्थ तांडा :- व्यथा - वेदनेचा परिघ

**प्रा. निवृत्ती नामदेवराव वरखेडे**
मराठी विभागप्रमुख, जय बजरंग कला महाविद्यालय चान्नी.ता. पातुर, जि. अकोला

डॉ.विजय जाधव हे मराठी साहित्यातील एक उगवते साहित्यिक म्हणून सर्व परिचित आहेत.त्यांचे " अस्वस्थ तांडा " आणि " गोरवेना " हे दोन कथासंग्रह प्रकाशित आहेत.यासोबतच " बंजारा परंपरा आणि भोगवटा " हा वैचारिक ग्रंथ सुद्धा प्रकाशित आहे. सोबतच लवकरच एक कवितासंग्रह सुद्धा प्रकाशनाच्या वाटेवर आहे. त्यांच्या " अस्वस्थ तांडा " या कथासंग्रहाला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान तर्फे ग. ल.ठोकळ शासकीय राज्य वाङ:मय पुरस्कार प्राप्त झाला आहे." लेखक बंजारा समाजाच्या एकूणच सर्व समस्यांबद्दल खूपच संवेदनशील मनाने लिहिताना दिसतात. बंजारा समाजातील समस्या पाहून त्यांचे मन अतिशय दुःखी होते असे ते म्हणतात. बंजारा समाज हा भारताचे सांस्कृतिक वैभव आहे.बंजारा समाजाला फार प्राचीन इतिहास आहे.प्राचीन काळापासून आदिम परंपरेतील जाती जमातींपैकी बंजारा समाज स्वतःचे वेगळे वैभवशाली अस्तित्व टिकवून ठेवण्यात आजपर्यंत यशस्वी ठरला आहे.आपली बोली आणि वेशभूषा यातून आपले वेगळेपण आणि प्राचीन संस्कृती टिकवून ठेवण्यात सफल ठरला आहे. " बंजारा " या शब्दासंबंधी " वनात राहणारा एक समूह." अशीही एक व्याख्या केली जाते.वनात किंवा जंगलात राहणाऱ्या अनेक जाती जमातींपैकी बंजारा समाजाची संस्कृती, त्यांचे आचार विचार,कला, बोलीभाषा, कथा, गोष्टी,राहणीमान ह्या सर्व बाबी खूपच भिन्न आणी पवित्र स्वरूपाच्या असल्याचे दिसून येते.ब्रिटिश काळापासून समाजाची वाताहत झाली आणि स्वसंरक्षणासाठी हा समाज बऱ्याच प्रमाणात एकमेकांपासून विभक्त झाला. स्वतःचे सत्व,स्वत्व आणि अस्तित्व टिकवण्यासाठी वेगवेगळ्या नियमांचा वापर केला.पण काळानुरूप त्याच रुढी-परंपरांच्या विळख्यात सापडला.आधुनिक काळातही तो त्याच परंपरांना धरून राहिल्यामुळे वर्तमान काळात त्या परंपरा खूपच विघातक आहेत हे डॉ. विजय जाधव यांच्या लक्षात आले.यामध्ये बदल व्हावा, आर्थिक, सामाजिक, राजकीय,धार्मिक, शैक्षणिक,सांस्कृतिक अशा सर्वच दृष्टिकोनातून बंजारा समाजाला जुन्या काळातील पूर्ण वैभव पुन्हा प्राप्त व्हावे अशी ते अपेक्षा करतात. व त्याच भावपूर्ण दृष्टिकोनातून लेखन करताना दिसतात. त्यांचा " अस्वस्थ तांडा " हा पहिला कथासंग्रह आहे. या कथा द्रोपदीला न्याय मिळावा यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणाऱ्या, तिचे रक्षण करण्यासाठी वस्त्र पाठवणाऱ्या श्रीकृष्णाच्या प्रामाणिक प्रयत्नांसारख्या दिसतात. " अस्वस्थ तांडा " या कथासंग्रहातील सर्व कथा ह्या बंजारा समाजाचे रक्षण व्हावे यासाठी श्रीकृष्णाने वेगवेगळ्या प्रकारची पुरवलेली वस्त्रेच होत असे म्हणावेसे वाटते.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संत ज्ञानेश्वरांपासून तर संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराजांपर्यंत ही परंपरा मराठी मातीला लाभली आहे. म्हणूनच संतांप्रमाणेच महाराष्ट्र ही साहित्यिकांचीही भूमी आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. मराठी मातीने जागतिक दर्जाच्या साहित्यिकांनाही जन्म दिला आहे. म्हणूनच तिचे गोडवे गाईले जातात. मराठी मातीने काळपरत्वे प्रसंगांनुरूप श्रेष्ठ दर्जाच्या वंदनीय संतांना, समाज सुधारकांना तसेच साहित्यिकांना प्रसवले आहे. काळवेळेची गरज पाहून ही मराठी माती त्यासाठी नेहमीच तत्पर राहिलेली आहे. मराठी साहित्याचा विचार करता हे आपल्याला सतत दिसून आले आहे,की काळानुसार समाजाच्या अत्यंत निकडीच्या असलेल्या गरजांसोबतच समाजामध्ये असलेली दरी बुजवून टाकण्याचे व उणीवा भरून काढण्याचे काम या मातीने नेहमीच केले आहे.

मराठी साहित्याचा भूतकाळ पाहता तो खूपच जाज्वल्य आणि दैदीप्यमान असल्याचे दिसून येते. त्या तुलनेत वर्तमान काळ हा भूतकाळातील श्रेष्ठ दर्जाच्या साहित्यिकांप्रमाणे दिसून येत नाही ही खेदाची बाब वाटते. काही नामवंत साहित्य लिखाण करताना दिसून येतात; परंतु ती श्रेष्ठ दर्जाची साहित्यिक प्रगल्भता मराठी साहित्यामध्ये कुठेतरी कमी पडत असल्याचे वाटते. वर्तमान काळात समाजासमोर स्त्री-समस्या, दारू, अफीम,,गांजा, अंधश्रद्धा-बुवाबाजी, स्त्री हीच स्त्रीची झालेली वैरीन, हुंडापद्धती, गरिबांना न मिळणारे शिक्षण, शिक्षणपद्धतीत, अभ्यासक्रमात वारंवार होणारे

बदल,प्राथमिक गरजांची असुविधा, एड्स,शहरांचा होणारा विकास परंतु गावाकडे असलेले दुर्लक्ष, गरीब व श्रीमंत याप्रमाणेच शहर व ग्रामीणता याकडे असलेले कमालीचे अंतर, विकृत-भ्रष्ट बुद्धीचे अधिकारी, त्यांच्याकडून होत असलेले शोषण,लोकप्रतिनिधींचे सामाजिक समस्यांकडे जाणूनबुजून असलेले दुर्लक्ष असे म्हणण्यापेक्षा त्यांच्यात ती कुवतच नसल्याचे स्पष्टपणे दिसणे, तरीसुद्धा खुर्चीचा असलेला त्यांचा राक्षसी प्रवृत्तीचा मोह, प्रामाणिक लोकांची ,आवाज उठवणाऱ्यांची राजरोसपणे होणारी मुस्कटदाबी....इत्यादी या सगळया समस्या आज मानवाचे संपूर्ण जीवनच भेसुर करून टाकत आहे. या सर्व समस्या वर्तमान काळातील लेखकांना दिसत नाहीत का? हा मोठा प्रश्न आहे.दिसत असतील तर प्रामाणिकपणे सत्य स्वरूप मांडण्याची हिंमत दाखवण्याचे काम ही ही मंडळी करतात का? करत नसतील तर तशी हिम्मत दाखवण्याची आज गरज आहे. परंतु ती कुवत नसताना स्वतःचा साहित्यिक म्हणून उदो-उदो करणारे स्वयंघोषित साहित्यिकच वर्तमान काळात अति प्रमाणात निर्माण झाले आहेत हे एक लाजिरवाणी बाब आहे. असे करून स्वतःची कुवत नसताना असे स्वतःला पुढेपुढे आणून ते स्वतःचीच फसवणूक करत आहेत असे दुःखमय शब्दात म्हणावे वाटते.परंतु अशाही परिस्थितीत समाजजागृतीसाठी मराठी माती नेहमीच जागरूक राहिलेली आहे. अशा विषन्न परिस्थितीत कोळशाच्या खाणीत हिरा चमकावा त्याप्रमाणेच ही मराठी माती हिऱ्यांचा शोध घेवुन त्यांना जन्म देत असते. डॉ.विजय जाधव हे त्याच कोळशाच्या खाण्यातील मराठी मातीने प्रसवलेले खरे रत्न होय.

वर्तमान काळात मराठी साहित्य हे पाहिजे तेवढे परिपक्व स्वरूपात बाहेर निघताना दिसत नाही. साहित्याकडे पाहण्याची पवित्र दृष्टी,एकूणच साहित्याच्या बाबतीत असलेली उदासीनता, भूतकाळातील साहित्यविश्व, लेखक-वाचकवर्ग यांच्या तुलनेत आजचे साहित्य कुठेतरी कमी पडल्याचे दिसून येत आहे.हीच उणीव भरून काढण्याचे काम डॉ. विजय जाधव आपल्या कथासंग्रहातून करताना दिसतात. मराठी साहित्यामध्ये वर्तमान काळात " सदानंद देशमुख " हे ग्रामीण भागाशी जुळलेले आणि ग्रामीण जीवनाची नाळ घट्ट बांधून असल्यामुळे अतिशय सकस दर्जाचे साहित्य लिखाण करताना दिसतात.इतरही साहित्यिक लिहीत आहेत; परंतु मनाचा ठाव घेणारे साहित्य निर्माण होत आहे असे दिसत नाही त्याचा परिणाम असा,की वाचक वर्गही कमी झाला असे चित्र दिसत आहे. वर्तमान काळात समाज माध्यमांचा प्रभाव जास्त झाल्याचे दिसून येत आहे. म्हणजेच मनोरंजन किंवा वैचारिक ,मानसिक, भावनिक दिलासा या दृष्टिकोनातून मराठी साहित्यापेक्षा मोबाईल-टीव्हीकडे समाज जास्त आकृष्ट झाला आहे.याचाच अर्थ असा, की जे प्रभावी असेल त्याकडे समाज जात वेधला जात असतो.म्हणजेच इतर भाषिक साहित्याच्या तुलनेत मराठी साहित्य हे कोठेतरी कमी पडत आहे किंवा सकस दर्जाचे दिसून येत नाही असे दिसून येते.समाजाला प्रत्येक गोष्टीकडून दर्जा हवा असतो. मगच समाज त्या दर्जेदार वस्तूकडे वेधला जातो.ही वेधकता डॉ.विजय जाधव यांच्या कथा साहित्यातून निश्चितच दिसून येते. त्यांची कथा वर्तमान काळात मराठी कथासाहित्य जीवंत ठेवत असल्याचे दिसून येते. ते या दशकाचे दशकातील कथा साहित्याची दरी बुजवणारे नामवंत कथासाहित्यिक म्हणून परिचित होतील व त्यांचे नाव मराठी साहित्यामध्ये निश्चितच कोरले जाईल असे म्हणावेसे वाटते.

लेखकाने साहित्यनिर्मिती करताना केवळ " स्वान्तः सुखाय " या प्रयोजनाशी संबंधित न राहता सामाजिकबदल ही भावना साहित्यनिर्मिती मागे ठेवावी.डॉ.विजय जाधव हे ज्या मातीत जन्माला आले त्या मातीचे ऋण फेडणारे सच्या दिलाचे साहित्यिक दिसतात.त्यांच्या शब्दांमध्ये ती माया-ममता-करुणा पदोपदी दिसून येते. हीच त्यांच्या लेखणीची खरी ताकद आहे. समाजामध्ये घडणाऱ्या प्रत्येक घटनेशी ते एकरूप, एकसंघ होताना दिसतात. समाजातील समस्या त्यांना त्यांच्या वाटतात व मग त्या समस्या त्यांच्या होऊन जातात.आणि मग त्या समस्या सोडवण्यासाठी ते तन-मन-धनाने स्वतः कार्यप्रवण होऊन समाजालाही कार्यप्रवृत्त करतात हे त्यांच्या लेखणीचे यश आहे. डॉ. विजय जाधव यांचा " अस्वस्थ तांडा " हा पहिला कथासंग्रह आहे. यामध्ये एकूण तेरा कथा असून या कथासंग्रहाचे असे वैशिष्ट्य असे आहे, की एकदा एक कथा हातात घेतल्यावर सर्व कथा संपेपर्यंत वाचक पुस्तक हातातून खाली ठेवत नाही. तद्वतच एकदा वाचून झाल्यानंतर पुन्हा-पुन्हा त्या कथा वाचल्याखेरीज राहवत नाही. एवढी ताकद त्यांची लेखणी व कथाबिजामध्ये आहे. एकेका शब्दाची उचल, म्हणी, वाक्प्रचार, उत्कृष्ट दर्जाचे संवाद, मन

वेधून घेणारी वाक्य... ही त्यांना लाभलेली नैसर्गिक देणगी आहे. संत " तुकाराम महाराज " स्वतःच्या कवित्वाबद्दल बोलताना जे म्हणतात अगदी त्याप्रमाणेच त्यांना ही ईश्वरदत्त देणगी आहे

कराल कवित्व । म्हणाल हे कोणी ॥
नाही वाणी माझी । पदरीची ॥
बोलविता धनी । वेगळाची ॥
मज विश्वंभर । बोलवतो ॥...

याप्रमाणे डॉ. विजय जाधव यांची मनाला वेधून घेणारी लेखणी आहे.कथानक , वातावरण निर्मिती ,संवाद ,शब्दांची निवड,वाक्यरचना यातून एकदमच दृश्य समोर उभे राहून आपण एखादे चलचित्र पाहत आहोत किंवा तो अनुभव आपण स्वतः त्या ठिकाणी उभे राहून प्रत्यक्ष अनुभवत आहोत असे वाटते. आणि असे वाटणे म्हणजे लेखकाच्या प्रतिभाशक्तीने लेखणीची गाठलेली परिसीमा होय. कथा सुरू होताच कधी संपते हे वाचकाला कळत सुद्धा नाही.तो मंत्रमुग्ध होऊन जातो. एखाद्या तहानलेल्याने तहान लागली असता थंडगार पाणी मिळताच एखाद्या अधाशाप्रमाणे जसे ते एकदमच संपवून टाकावे. अगदी तीच ओढ कथा वाचताना लागल्याचे दिसून येते. डॉ. विजय जाधव यांनी समाजात दिसणाऱ्या समस्या अचूकपणे टिपल्या आहेत. या समस्यांमागे स्वतः मनुष्य आहे, सामाजिक रूढी परंपरा सुद्धा आहेत परंतु शासनाची उदासीनता सुद्धा यामागे असल्याचे ते प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे दाखवून देतात. स्त्रियांच्या समस्या तसेच स्वतः स्त्रियांनी निर्माण केलेल्या समस्या हे दाखवताना स्त्रीच्या विनाशास किंवा सामाजिक कलह निर्माण करण्यात स्त्रियासुद्धा पुरुषांइतक्याच जबाबदार आहेत हे " अस्वस्थ तांडा" आणि " हळद " या कथा वाचताना दिसून येते. समाजात माजलेले बुवाबाजीचे स्तोम हे सुद्धा डॉ. विजय जाधव यांनी दाखवून दिले आहे. अशा अनेक समस्या चितारताना त्यांची लेखणी बहरताना दिसते.

डॉ. विजय जाधव यांची " अस्वस्थ तांडा " ही कथा मनाला खूपच अस्वस्थ करून जाते. डॉ. विजय जाधव यांनी साहित्याच्या प्रवाहाविरुद्ध जाऊन "अस्वस्थ तांडा" ही कथा साकार केल्याचे दिसते.एकूणच मराठी साहित्याचा विचार केला असता असे दिसून येते, की स्त्रीप्रधान साहित्याला थोडं बाजूला सारून किंवा स्त्रियांच्या कारुण्यमय जीवन जाणिवांसोबतच तिचे खुप वाईट रूपही असू शकते किंवा आहे.हे दाखवण्याचे काम आजपर्यंत कोणत्याही लेखकाने उघडपणे केल्याचे दिसत नाही. ते धारिष्ट्य डॉ.विजय जाधव यांनी दाखविले आहे. वर्तमान काळात कौटुंबिक जीवनात जो अनाचार होत आहे.त्यामध्ये स्त्रीयाही कमी नाहीत. घरामध्ये होत असलेले अनन्वित अत्याचार यामध्ये वर्तमानकालीन स्त्रियाही कमी नाहीत किंबहुना या छळाला त्याच जबाबदार आहेत हे दाखवण्याचे काम स्त्रीवादी साहित्य करत नाही किंवा परंतु सामाजिक बांधिलकीचे भान असलेल्या डॉ. विजय जाधव या लेखकाने वास्तव जगासमोर मांडले आहे. जोपर्यंत " जीवनवादी साहित्य " निर्माण होत नाही,तोपर्यंत समाज सुधारणा होऊ शकत नाही. याची पूर्णपणे जाणीव लेखकाला दिसते. " अस्वस्थ तांडा " ही कथा वाचल्यानंतर एक चित्र डोळ्यासमोर उभे राहते. वातावरणनिर्मिती, संवाद, कथानक, पात्ररचना आणि या सर्वांच्या माध्यमातून साधल्या गेलेली दृश्यात्मकता या कथेला पूर्ण रूप आणते.बंजारा बोलीचा केलेला वापर व व ती बोली न समजणाऱ्या मराठी भाषिकांसाठी त्या शब्दांचा सांगितलेला अर्थ, हि या लेखकाची वेगळी शैली दिसून येते. सुरुवात पासून शेवटपर्यंत एक चलचित्र डोळ्यासमोर उभे राहते.जणू काही ती कथा आपण स्वतः अनुभवत आहोत आणि त्या घटनेचे स्वतः साक्षीदार आहोत असे वाटत राहते. यात लेखकाची किमया व यश दिसून येते.

" चिरकांडी " या कथेतून डॉ.विजय जाधव यांनी दोन विघातक समस्यांचे चित्र उघड केले आहे. एक म्हणजे मजूर-शेतकरी यांचे प्रश्न आणि भोंदू बाबांचे वाढलेले प्रस्थ.सरकार मजूर आणि शेतकरी वर्गाकडे अजिबात लक्ष देत नाही आणि यातूनच गरीब-श्रीमंती ही दरी खूपच खोल झाल्याचे दिसून येते. दहा एकर शेती असलेला केशव आपल्या प्राथमिक गरजा सुद्धा पूर्ण करू शकत नाही तर रात्रंदिवस साप, विंचू व जंगली जनावरांची भीती न बाळगता कष्ट करणारा मजूर मांगीलाल हा सुद्धा आपली स्वप्न पूर्ण करू शकत नाही. उद्योग व शहरांचा विकास करण्याकडे असलेले लक्ष आणि खेड्यांकडे असलेले दुर्लक्ष हे उघड सत्य सर्वांना कळते परंतु कोणीही ग्रामीण भागातील समस्यांकडे लक्ष देत नाही किंवा त्यांना ते ज्ञानच नाही असे वाटते. सरकारच्या या दुटप्पी धोरणामुळे सामाजिक स्वास्थ्य कसे बिघडते आणि ते कसे विघातक होऊ शकते याचे चित्रण लेखकाने मांडले आहे.मनुष्य हा अनुकरणप्रिय असतो. त्याच्या दृष्टीस जे सुंदर जग त्याला दिसते ते सौंदर्य त्याला हवे असते.

ते प्राप्त करण्यासाठी त्याचा नेहमी प्रयत्न चाललेला असतो. आणि मग प्रामाणिक प्रयत्न करूनही ज्यावेळेस त्याची स्वप्न पूर्ण होत नाहीत,त्यावेळेस चुकून कळत-नकळतपणे त्याच्या हातून अघटीत घटना घडतात.ज्या समाजासाठी खूपच वाईट असतात. केशव आणि मांगीलाल या दोघांची स्वप्न जेव्हा पूर्ण होत नाहीत तेव्हा ते एकाअघोरी बाबांच्या नादाला लागून जमिनीतील धन काढण्यासाठी त्या विकृत बुद्धीच्या अघोरी बाबांची मदत घेऊन एका लहान मुलाचा बळी घेतात. ही वर्तमानकालीन वैज्ञानिककाळात सत्तेत असलेल्या सरकारसाठी शरमेची बाब आहे हे सखोल विचाराअंती दिसून येते. याकडे सुद्धा सरकारचे लक्ष असायला हवे ही गंभीर बाब डॉ. विजय जाधव आपल्या " चिरकांडी " या कथेतून समाजासमोर मांडतात.

श्रेष्ठ साहित्यिक भालचंद्र नेमाडे म्हणतात, की " लेखक हा केवळ लेखकच असावा " तो कुठल्याही धर्म,पंथ किंवा पक्षाशी बांधील नसावा. वर्तमान काळात या त्यांच्या विचाराशी अनुरूप डॉ.विजय जाधव लिखाण करताना दिसतात. त्यांनी बंजारा समाजातील दुःख, दैन्य,दारिद्र्य, उपासमार,अंधश्रद्धा, रूढी-परंपरा,बोलीभाषा...अशा एकूणच बंजारा समाजाच्या संपूर्ण संस्कृतीचे वर्णन " लेखक " या शब्दाला शोभेल अशा रूपात केलेले आहे. बंजारा समाजातील संपूर्ण समस्यांचे वर्णन आतापर्यंत एवढ्या ताकदीने कुणी केलेले दिसत नाही. डॉ.विजय जाधव हे खऱ्या अर्थाने बंजारा समाजाच्या सुखदुःखांचे वर्णन करणारे पहिले उद्गाते ठरावेत. बंजारा समाजाचे संपूर्ण चलचित्र डोळ्यासमोर उभे करण्याची ताकद त्यांच्या लेखणीमध्ये आहे. ज्या समाजामध्ये ते लहानाचे मोठे झाले त्या समाजाचे आपण काही देणे लागतो याची पुरेपूर जाणीव लेखकाला आहे. अश्वत्थाम्याच्या दुःखाविषयी सर्वांना माहिती आहे ; परंतु ते दुःख किती वेदनामय आहे याची जाणीव केवळ स्वतः " अश्वत्थामा " व्यतिरिक्त कुणालाही नसावी. अगदी त्याचप्रमाणे गोरमाटी-बंजारा समाजाच्या अज्ञान आणि रूढी परंपरांचा किंवा त्यांच्या एकूणच सर्व समस्यांची जाणीव हे केवळ ते जीवन जगणाऱ्या व्यक्तीलाच कळू शकते आणि हीच दुःखमय जाणीव लेखकाला असल्याची पदोपदी त्यांच्या लिखाणातून दिसून येते. त्यांची प्रत्येक कथा ते खूपच पोटतिडकीने लिहित असल्याचे दिसून येते. त्यामागे त्यांच्या मनाला झालेल्या वेदना एखाद्या नवजात मेलेल्या शिशुच्या लचके तोडणाऱ्या कुत्र्यांना पाहून आईला होणाऱ्या वेदनेशी समरूप झाल्याचे दिसते. तर कधी चुकीचा विवाह संबंध जोडल्यामुळे आपल्या मुलीलाही एड्स सारख्या भयानक रोगाशी सामना करावा लागला म्हणून तिचा संसार उध्वस्त झाला या बापाच्या दु:खमय वेदणेशी एकरूप होताना दिसते. एका निष्पाप मुलीचा किती निर्घृण पद्धतीने बळी घेतल्या गेला याचे हृदयस्पर्शी वर्णन लेखक करताना दिसतात आणि निश्चितच ते यावेळी रडले असतील याची जाणीव वाचकाला होते. एवढी ताकद त्यांच्या शब्द शिंपल्यांमध्ये ठासून भरल्याची दिसून येते. डॉ.विजय जाधव यांच्या कथा लेखनाचे एक वैशिष्ट्य म्हणजे कथा कधी सुरू होते आणि कधी संपते हे समजतही नाही. एखादी वाऱ्याची झुळूक यावी आणि शरीराला एक संवेदना देऊन जावी अगदी त्याचप्रमाणे प्रत्येक कथेतील कथाबीज हे वाचकाच्या मनावर हळुवार परिणाम करून जातं.ही त्यांचे यश आहे. प्रत्येक कथा ही वास्तवावर आधारित असून कोठेही कंटाळवाणी वाटत तर नाहीच, उलटस्पर्शी ती खूपच मनमोहक वाटते.

डॉ.विजय जाधव हे खऱ्या अर्थाने वर्तमान काळात मराठी साहित्याला दिशा देणारे किंबहुना वर्तमान काळातील मराठी कथासाहित्याला एका विशिष्ट वळणावरचे मैलाचा दगड ठरावेत एवढी त्यांच्या कथा प्रतिभेची उंची निश्चितच आहे. वर्तमान काळात निर्माण झालेल्या खूपच विघातक अमानवीय वृत्ती-प्रवृत्तींना बळ मिळालेले आहे. या प्रवृत्तींना उघडपणे मांडून त्यावर विचारप्रवण करण्याची ताकद लेखकाच्या लेखनशैलीमध्ये दिसून येते. त्यांची प्रत्येक कथा ही समाजाला येणाऱ्या संकटांचे दिशादर्शन करत असतानाच त्यावर उपायही सुचवत असल्याचे दिसून येते. ही लेखकाची जीवनवादी दृष्टी खऱ्या अर्थाने त्यांना एका " श्रेष्ठ साहित्यिक " या पदवीकडे नेताना दिसून येते.

डॉ.विजय जाधव यांच्या " अस्वस्थ तांडा " या कथासंग्रहातील सर्वच कथा ह्या प्रामाणिक लेखनाचा उत्कृष्ट नमुना आहेत. घटनावस्तूंकडे ते खूपच भावनिक दृष्टिकोनातून पाहतात. त्यांचा समाजात घडणाऱ्या गोष्टीकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा खूपच नितळ स्वरूपाचा आहे. त्यांचा दृष्टिक्षेप हा आकाशात उडणाऱ्या गरुडाप्रमाणे असून कमालीचा उच्चकोटीचा आहे. मनुष्य हा आपल्या जीवनामध्ये सतत आनंदी राहण्यासाठी धडपडत असतो आणि या धडपडीच्या जीवनामध्ये त्याच्या जीवनात क्षणार्धात क्षणासाठी काही वादळे येतात आणि त्याचं संपूर्ण

जीवनच उध्वस्त करून टाकतात.आणि मग अत्युच्च भावनिक पातळीवरील लोकांसाठी ह्या घटना खूपच वेदनादायी असतात.आणि मग हृदयामध्ये रुतलेला हा काटा त्यांना जन्मभर रुतत राहतो. डॉ.विजय जाधव यांच्या या कथासंग्रहातील सर्वच कथा ह्या माणसाला त्या कथेतील मुख्य पात्राला जशा रुततात तशाच त्या वाचकाच्या मनावरही घाव घालतात. मग ती चिरकांडी ही कथा असो की दणका असो."
आतला दंश." ही कथा तर खूपच विषारी कथा आहे. हा दंश केवळ पुष्पाच्या मनावर होत नसून, तो वाचकाच्या मनावरही निश्चितच होतो. आणि मग स्वतः वाचक अशा अनेक वाईट प्रवृत्तीच्या लोकांविरुद्ध सक्रिय होऊ पाहतो.सरकार सामान्य जनतेसाठी विविध योजना राबवत असते. परंतु या योजनांचा फायदा सामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याआधी अनेक प्रकारच्या टेबलावरील पगारी अधिकारी स्वतःसाठी करून घेतात. मग तो फायदा कधी आर्थिक किंवा शारीरिक कष्ट अशा स्वरूपात असतो. तर कधी-कधी विकृत बुद्धीचे पदस्थ अधिकारी स्त्री-देहाचीही मागणी पूर्ण करून घेतात. उघडपणे होत असलेले हे पाप सामान्य जनतेला समजत असूनही त्या विरुद्ध कुणी आवाजही उठवत नाही,त्यापेक्षा कोणी तशी हिंमतही करू शकत नाही. हा खऱ्या अर्थाने भारतीय लोकशाहीचा खून म्हटलं तरी चालेल. कर्जमाफीसाठी बँकेत गेलेले पुष्पा आणि अरुण हे जोडपे आणि मग पुष्पाच्या सौंदर्यावर पडलेली बँक मॅनेजरची वाईट नजर.आणि मग अत्यंत कावेबाजीने त्याने केलेले तिचे शोषण आणि वरून दिलेली धमकी... ही अत्युच्च कोटीची राक्षसीप्रवृत्ती आहे. या प्रवृत्तीच्या लोकांच्या मनातही असला विचार येता कामा नये अशी कोणतेही यंत्रणा भारतात दिसत नाही. राज्यघटनेमध्ये या संबंधित प्रावधान असले तरी कोठेही न्याय मिळत असल्याचे दिसत नाही. दोघांच्या सुखी व आनंदी संसारात बँक मॅनेजर नावाच्या विषारी सापाने घेतलेला चावा हा केवळ त्यांच्या संसाराला घेतलेला चावा नसून समस्त भारतीय समाजाला घेतलेला हा चावा आहे. मग पुढील जीवन निष्पाप, निर्मळ, पवित्र म्हणता येईल का? आणि या जाणीवेतून पुढील निष्कलंकित जीवन आपल्याला जगता येईल का? हा लेखकाने पुष्पाच्या माध्यमातून वाचकांवर सोडलेला प्रश्न खरे पाहता वाचकालाच दंश केल्याचे दिसून येते.हे किमया डॉ.विजय जाधव यांनी फार उत्तमरीत्या साधली असल्याचे दिसते.

श्रेष्ठ साहित्यिक " सदानंद देशमुख "वर्तमानकालीन लेखकांबद्दल बोलताना अलीकडच्या काळात खऱ्या लेखकांची उणीव भासत आहे अशी खंत व्यक्त करतात.ते म्हणतात की लेखकांनी समाजात जावे व सामाजिक समस्यांचा शोध लावावा व नेमक्या त्या समस्या टिपून त्यासंबंधी बदल घडवण्याच्या उद्देशाने लेखन करावे. डॉ. विजय जाधव नेमके त्याच पद्धतीने समाजाचा अभ्यास करताना दिसतात. समाजात वावरताना समाजाशी ते एकरूप होताना दिसतात. आणि या एकरूपतेतूनच एकेका समस्यांचा शोध लावून त्या समस्यांचा उलगडा करताना दिसतात. ते अशा काही समस्या आपल्या लेखनातून मांडतात की ज्या समस्यांचा उहापोह मराठी साहित्यात बहुतेक झालेला दिसून येत नाही. असे नवीन कथाबीज ते आपल्या कथांमधून पेरताना दिसतात. " दप्तर खुंटीला लटकलेले " ही कथा केवळ त्या एका लहान मुलाची नसून अशा अनेक समस्या प्रधान मुलांची आहे, की त्यांच्या मनात तीव्र ओढ असूनही ते आजही शिक्षण घेऊ शकत नाहीत.असे भयावह चित्र आजही समाजात दिसून येते ही एक शोकांतिकाच आहे.

" गोधडी " ही कथा भविष्य कवेत घेऊ पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरावी अशी आहे. तांड्यातल्या गलिच्छ अशा वातावरणात राहून, केवळ आपल्या आईचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ध्येयवेड्या सिद्धार्थची ही कथा खूपच भावनिक पातळीवरून जाऊन मनाला स्पर्शून जाते. ही जशी सिद्धार्थची कथा आहे अगदी त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी काहीतरी करू पाहणाऱ्या एका प्राध्यापकाचीही कहाणी आहे.आपण शिक्षणाची ओढ असणाऱ्या परंतु परिस्थितीने खचून जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी करायला पाहिजेत किंवा मुख्यत्वे ती आपली जबाबदारीच आहे ही जाणीव ठेवून विद्यार्थ्यांसाठी तन-मन-धनाने काम करू पाहणाऱ्या एका ध्येयवेड्या प्राध्यापकाची सुद्धा ही कहाणी आहे. अलीकडे पगारी अधिकारी वर्ग स्वतःच्या जीवनापुरताच विचार करताना दिसतात;परंतु या स्वार्थी कारागृहापलीकडेही जाऊन आयुष्य किती सुंदर आहे किंवा बनवता येऊ शकते याचा परिपाठ करून देणारे प्राध्यापक " गोधडी " या कथेतून दिसून येतात.कदाचित डॉ.विजय जाधव हे याच पठडीतील प्राध्यापक आहेत. याबाबत खचितच कुठलीही शंका नाही.लेखक मानवतावादी विचारसरणीचे असून " वसुधैव सकुटुंबकम " या विचाराच्या प्रेरणेने

भारावलेले आहेत. त्यांच्या वैयक्तिक जीवनातही डॉ.विजय जाधव खूपच सामाजिक बांधिलकी राखून असल्याचे दिसून येतात. त्यांची मानवतावादी विचारसरणी खूपच प्रेरणादायी आहे.

" गर्भपात " या कथेत डॉ.विजय जाधव यांनी स्त्रीवाहकांच्या समस्या अधोरेखित केल्या आहेत. गरोदर असताना स्त्रियांना आरामाची गरज असते. अशा अवस्थेत त्यांना कमीत कमी त्यांच्या सरासरी पगारावर पुढील चार ते पाच महिने तरी सरकारी सुट्टी मिळायला हवी. परंतु याबाबतीत स्त्री वाहकांसंबंधी कुठलीही योजना नाही. बसमध्ये काम करत असताना पुरुषांकडून होणारा शारीरिक छळ याकडेही गांभीर्याने पाहिले जात नाही. गरोदरकाळात खड्ड्यांच्या रस्त्यात काम केल्याने अनेक स्त्रीवाहकांचे गर्भपात झाल्याचे सुतोवाच करून या संदर्भात शासनाने विशेष लक्ष द्यावे,अशी भूमिका डॉ. विजय जाधव ठामपणे घेतात.

मनुष्याच्या जीवनात कधी कोणते संकट येईल हे सांगता येत नाही.अचानक नियतीचा फेरा घुमत येतो आणि मनुष्याचे संपूर्ण जीवन उध्वस्त करून टाकतो.हाच संदेश देणारी " कस्तुरी " ही कथा आहे पुरामध्ये वाहून गेलेल्या तान्ह्या मुलीच्या वियोगातून आत्महत्या करणाऱ्या बापासोबतच मुलगी आणि अतिशय प्रेम करणारा नवरा एकाच वेळेस जीवनातून निघून गेल्यावर पुढ्यात असलेले संपूर्ण अंधकारमय आयुष्य हे एकाच वेळी हजारो विंचू चावल्याची वेदना सहन करत छिन्नविछिन्न अवस्थेत पडलेल्या एका तरुण विधवेची ही कहाणी आहे.

भारतीय संस्कृती ही विविधतेने नटलेली आहे.ही संस्कृती विविध रूढी-परंपरा, आचार-विचार, संस्काराने सुशोभित आहे. परंतु कालानुक्रमे या रूढी परंपरांमध्ये शब्दअपभ्रंश होऊन काही विघातक रूढी परंपरांमध्ये त्यांचे परिवर्तन झाल्याचे दिसून येते.बंजारा समाजामध्ये मुलीला लग्नाची हळद लागल्यावर कोणत्याही कारणास्तव जर नवरा मुलगा पळून गेला असेल किंवा अप्राप्त असेल, तर अशा प्रसंगी हळद लागलेल्या मुलीला त्या वेळेस इच्छा नसतानाही लग्न करावेच लागते.मग दुसरा मुलगा पसंतीचा असो किंवा नसो.

" हळद " या कथेमधून डॉ.विजय जाधव यांनी याच रूढी-परंपरेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. हळद लागलेल्या शोभाचा होणारा नवरा मुलगा ऐन वेळेवर पळून जातो आणि मग वयाने बापापेक्षा मोठा असलेल्या आणि पहिले लग्न झालेले असताना,त्याला पहिल्या पत्नीपासून मुलगा होत नाही म्हणून दुसरी बायको म्हणून शोभाला तिच्या इच्छेविरुद्ध लग्न करावेच लागते.पुढे चारित्र्य संशयावरून तिचा नवराच तिचा खून करतो.भारतीय परंपरेत अशा अनेक घातक रूढी-परंपरा अजूनही आहेत. त्या आज मोडीत काढण्याची वेळ आली आहे. अशी आर्त हाक डॉ.विजय जाधव " हळद " या कथेद्वारे करतात.

डॉ.विजय जाधव यांची लेखणी समाजातील सर्वच समस्यांना जाऊन भेटते. मग ती अघोरी बाबांची समस्या असो शेतकरी, मजुरांची असो अज्ञानीपणाची असो की हुंडा या समस्येची असो.सर्व काही सुरळीत असताना केवळ हुंड्यापायी मुलीच्या बापाला आत्महत्या करावी लागते. यासारखी वाईट गोष्ट मागे राहिलेल्या कुटुंबाच्या जीवनात कोणती असेल? मनुष्याच्या मृत्यूपर्यंत त्याच्या जीवनातील समस्या ह्या जात नाहीत.क्रमाक्रमाने एकेक समस्या त्याच्या पुढ्यात येऊन बसते. या समस्या खूपच मोठी परीक्षा घेणाऱ्या असतात. या परीक्षेची उत्तरे ज्यांना नीटपणे सोडवता आली तो या संसार रुपी भवसागरातून तरुण जातो. अन्यथा आत्महत्या केल्यानंतर मागे राहिलेल्या अनेक जीवांच्या समस्यांमध्ये आणखी भर पडत राहते. याचे वर्णन " दिवाळी " या कथेत लेखकाने केले आहे. अशा प्रकारे " अस्वस्थ तांडा " या कथासंग्रहात डॉ.विजय जाधव यांनी वेगवेगळया कथांमधून बंजारा समाजाचे चिंतनीय जीवन जगासमोर मांडले आहे. त्यांनी केलेले हे चित्रण आतापर्यंत कोणीही एवढ्या पोट तिडकीने,कनवाळूवृत्तीने मांडलेले दिसत नाही. बंजारा समाजाचे फाटके तांडे, डांबरी रस्ते नसलेल्या वस्त्या, मोहाच्या दारूत झिंगणारी माणसे, पत्ते कुटत बसणारी तरुण पिढी, शिक्षणासाठी झुरणारी लहान लहान मुले, गलिच्छ वस्त्या, गलिच्छ रस्ते, विवाह संस्था व त्यामधील क्रूर नियम, जीवघेण्या परंपरा, स्त्री या दैवतयुक्त अमृतमय शब्दाला न शोभणाऱ्या किळसवाण्या,दुष्ट स्त्रिया, तांड्यातील प्रेममय जीवन, भ्रष्ट अधिकाऱ्यांपासून बंजारा समाजाचे आर्थिक, मानसिक, भावनिक, शारीरिक...अशा सर्वच प्रकारे होणारे शोषण, याला खतपाणी घालणारी भारतीय नेत्यांची कमकुवत बुद्धी.या सर्व गोष्टींचे चित्रण डॉ. विजय जाधव यांनी केले आहे.

या सर्व बाबी पाहता बंजारा संस्कृती ही कमालीची धर्मप्रधान असून धर्मवेडी आहे. रूढी-परंपरा यांचे पालन करणारी तर आहेत; परंतु वाईट चालीरीती, प्रथा- परंपरा यांच्या विळख्यात सुद्धाअडकलेली

आहे. भारतीय संस्कृतीची जोपासना करणाऱ्या या बंजारा समाजाचे दुर्लक्षित जीवन भारतीय लोकशाहीला शोभणारे नाही ही खेदाची बाब आहे. शासनाने केवळ निवडणुकीपुरताच यांचा विचार केला असून अजूनही तांड्यांची परिस्थिती गलिच्छ स्वरूपाचीच दिसून येते. मूलभूत सुविधा सुद्धा यांच्यापर्यंत पोहोचल्या नसून शिक्षणापासूनही वंचित ठेवल्या गेलेले हे तांडे पाहून खरोखरच मन अस्वस्थ होऊन जाते.शहरांच्या विकासासाठी बुलेट ट्रेन, समृद्धी महामार्गासारखे अनेक उपक्रम प्रकल्प योजना सरकार राबवताना दिसते. परंतु महात्मा गांधीजींच्या वचनांचे पालन न करणारी ही लोकशाही भारतीय खऱ्या संस्कृतीचे नैसर्गिक वातावरणात नैसर्गिकपणे सौंदर्य टिकवून ठेवणाऱ्या या वनमय बंजारा संस्कृतीकडे दुर्लक्ष करून आहे ही खरी शोकांतिका म्हणावी लागेल. खरा भारत हा शहरांमध्ये नसून तो खेड्यांमध्ये आणि निसर्गामध्ये लपलेला आहे.या शाश्वत सत्याकडे कुणाचेही लक्ष जात नाही किंवा ते ज्ञान नाही. ही खूपच चिंतनीय बाब आहे. या सर्व गोष्टींमध्ये बदल होऊन बंजारा समाजाला मानाचे स्थान प्राप्त व्हावे. ही डॉ.विजय जाधव यांची आर्त हाक या कथासंग्रहातून दिसून येते.

# वृद्धांच्या सामाजिक समस्यांचे अध्ययन

**प्रा. डॉ. निता पी. राऊत**
गृहअर्थशास्त्र विभाग आबासाहेब पारवेकर महाविद्यालय यवतमाळ

**प्रस्तावना :**

मानवी जीवनाचा शेवटचा टप्पा म्हणजे "वृद्धावस्था" होय. मानव आपल्या अपत्यांना जन्म त्यांचे पालन पोषण, शिक्षण इत्यादी सर्व जीवनावश्यक गरजा पूर्ण करून अपत्यांना फुलांप्रमाणे जपतो. हीच अपत्य मोठी झाल्यानंतर आपल्या वृद्ध आई-वडीलांची सेवा करून त्यांचा सांभाळ करण्याचे नैतिक कर्तव्य पूर्ण करण्याऐवजी घरातून बाहेर काढतात.

संस्कृतीच्या दृष्टीकोनातून भारतीय समाजाला जगात फार महत्वाचे स्थान आहे. या संस्कृतीचे वैशिष्ट्य म्हणजे संयुक्त कुटूंब पद्धती संयुक्त कुटूंब पद्धतीमध्ये वृद्धांना कुटूंबप्रमुख म्हणून मानाचे तर समाजात आदराचे स्थान होते. लग्न प्रसंगी, सार्वजनिक उत्सव, सण, समारंभ तसेच नैसर्गीक आपत्तीवर उल्लघंन करतांना वृद्धांच्या अनुभवानुसार त्यांच्या सल्ल्याप्रमाणे कार्य केली जात होती. वृद्ध व्यक्ती सामाजिक प्रथा, परंपरा आणि कौटुंबिक व्यवसायाचे प्रशिक्षण नवीन पिढीला देत असत. आधुनिक भारतात औद्योगिकरणास सुरुवात झाल्यामुळे शहरीकरण झाले. प्राचीन शेती उद्योग नष्ट होऊन नवीन व्यवसाय उदयास आले व त्यामुळे संयुक्त कुटूंब पद्धतीचा ऱ्हास होऊन विभक्त कुटूंबपद्धती अस्तिवात आली. शहरीकरणामुळे नवीन प्रथा, परंपरा, अस्तित्वात आल्या. आजकाल नोकरी धंद्यांच्या निमित्ताने आई-वडील आणि मुले एकत्र राहणे बरेच कमी झाले आहे.

वृद्धावस्थेत व्यक्तीच्या शरीरसंरचनेत होणाऱ्या बदलाप्रमाणे सामाजिक संरचनेतही बदल होत असतात. वृद्धावस्थेत मानसिक कार्यक्षमतेचा ऱ्हास होतो. विधायक विचार शक्ती कमी होते. न्युनगंडाची भावना वाढीस लागते. आत्मविश्वासाचा अभाव दिसून येतो. समाजाला आपला कोणताच उपयोग नाही अशी भावना जोपासली जाते. मुलांचे वय जसजसे वाढत तसतशी पालकांनी मुलांबाबत असलेली अभिवृत्ती बदलणे आवश्यक आहे. मुलांसोबत पालकांचे संबंध मित्रत्वाचे असतील तर बदलत्या परीस्थित समायोजन करणे शक्य होते. परंतु जे पालक मुलांविषयीच्या जुन्याच मतांना चिटकून राहतात. त्या पालकांचा अपत्यांशी असलेल्या संबंधातील दुरावा वाढतच राहतो व वृद्ध आणि कुटूंब यांच्यात तणाव निर्माण होता. अशा वेळी पडती बाजू कोणी घ्यावी ह्या अहंकारापोटी वाद वाढत जातो. त्यातूनच **'वृद्ध कुटूंबात नसावेत'** ही भावना तरुण मनात घर करीत जाते. वृद्धत्वामुळे शरीर दुर्बल झालेले असते. काळजी घेणारे कुटूंबामध्ये कोणी नसतात. आजच्या लहान घरामध्ये वृद्धांच्या समावेश कठिण होतो तसेच वृद्धांना सर्व प्रकारचे संरक्षण प्रदान करावयाच्या हेतूने अश्या विविध कारणांमुळे वृद्ध निराधार होण्याचे प्रमाण वाढतच आहे व निराधार वृद्धांच्या समस्या सोडवणुकीचा पर्याय म्हणून आज वृद्धाश्रमाचा विचार करण्यात येतो. "ज्या ठिकाणी निराधार वृद्धांना आश्रय दिला जातो, त्यांची सेवासुश्रूषा केली जाते अशा स्थानाला वृद्धाश्रम म्हणतात." कौटुंबिक तणावामुळे कुटूंबात होणारा वृद्धांचा होणारा कोंडमारा आणि वृद्धांची एकाकीपणाची भावना समाप्त करण्याच्या दृष्टीने वृद्धाश्रम हा एक चांगला उपाय आहे. दिवसेंदिवस वृद्धाश्रमातील वृद्धांचे प्रमाण वाढत आहे.

**संशोधनाचे उद्देश :**

- वृद्ध सदस्यांच्या वैयक्तिक माहितीचे अध्ययन करणे.
- वृद्ध स्त्री व पुरुषांच्या सामाजिक समस्यांचे अध्ययन करणे.

**संशोधनाचे गृहीतकृत्ये :**

- वृद्ध स्त्रियांना सामाजिक समस्या पुरुषांपेक्षा अधिक प्रमाणात असतात.

**संशोधन पद्धती :**

अध्यनाकरिता समाजातील सर्व स्तरातील वृद्धांचा समावेश केल्या गेला आहे. तथ्य संकलनाकरिता संभाव्यता नमुना प्रकारातील साधा यादृच्छिक नमुना पद्धतीचा वापर करण्यात आला. समजतील १०० वृद्धांची नमुन्याकरीता निवड करण्यात आली.

प्रस्तुत संशोधनाकरीता वर्णनात्मक आराखड्याचा उपयोग करण्यात आला. प्रथम वर्गीकृत सारणी तयार करण्यात आली. सारणीच्या आधारावर विविध प्रकारे द्विमार्गी व एकमार्गी सारणीचा उपयोग करण्यात आला. आलेखीय प्रस्तुतीकरण करण्यात आले. त्या आधारावर **Pie Diagramme o Bar Chart** चा

उपयोग करण्यात आला. केंद्रीय प्रवृत्तीच्या परिणामाचा आणि विचलनाचा उपयोग करून सांख्यिकीय वर्णन करण्यात आले.

**तथ्य संकलन पद्धती व तंत्रे (Method of Tools of Data Collection) :**

वृद्धांच्या सामाजिक समस्येविषयी अध्ययन करण्यासाठी त्याच प्रमाणे त्यांची वैयक्तिक माहिती प्राप्त करण्यासाठी मुलाखतीचे तंत्र, प्रश्नावली व सामाजिक समस्येसंबंधी मत जाणून घेण्यासाठी मतावली तयार करण्यात आली.


मतावली तयार करण्यासठी (Three Points Scale) चा उपयोग करण्यात आला तर त्या स्केल मध्ये विशिष्ट पर्यायाला विशिष्ट गुणांक देऊन मुख्यत: तीन पर्यायाचा उपयोग आला. पूर्णत: सहमत - ३ गुण, अशंत: सहमत - २ गुण, असहमत – १ गुण असे गुण देण्यात आले.

प्रस्तुत संशोधनामध्ये वर्णनात्मक सांख्यिकी तसेच अनुमानात्मक सांख्यिकीचा उपयोग करून अंतिम निष्कर्ष काढण्यात आले.


**निष्कर्ष :**

एकूण १०० उत्तरदत्यांपैकी २४% उत्तरदाते हे पुरुष तर ७६% उत्तरदाते या स्त्रिया आहे. वृद्ध पुरुषांच्या प्रमाणापेक्षा स्त्रियांचे प्रमाण हे जास्त आढळून आले.

**उत्तरदात्यांचे लिंग दर्शविणारा वर्तुळालेख**




**उत्तरदात्यांचे लिंग दर्शविणारा वर्तुळालेख**




वयाच्या बाबतीत असे दिसून आले की, वयाची ८० वर्ष पूर्ण केलेल्या वृद्ध पुरुषांची संख्या सर्वाधिक आहे. तर सर्वाधिक स्त्रीया ६५ ते ८० या वायोगातील आढळून आल्या.

**वृद्धांचा शैक्षणिक स्तर:**

| अनु. क्र. | शैक्षणिक स्तर | पुरुष | % | स्त्री | % |
|---|---|---|---|---|---|
| १ | निरक्षर | ३ | १२.५ | १३ | १७.१० |
| २ | प्राथमिक | १० | ४१.६६ | २४ | ३१.५७ |
| ३ | माध्यमिक | ० | ० | ३५ | ४६.०५ |
| ४ | उच्च माध्यमिक | ४ | १६.६ | २ | २.६३ |
| ५ | पदवीधर | ४ | १६.६६ | १ | १.३१ |
| ६ | पदवीत्तर | ३ | १२.५ | १ | १.३१ |
| एकूण | | २४ | | ७६ | |
| | | १०० | | | |

शैक्षणिकबाबतीत असे दिसून आले की, वृद्धाश्रमातील सर्वाधिक वृद्ध पुरुष हे प्राथमिक शिक्षण घेतलेल तर स्त्रीयांनी माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे. पदवीधर व पदव्युत्तर वृद्धांचे प्रमाण कमी आहे.

वृद्धांच्या वैवाहीक दर्जाच्या बाबतीत असे दिसून येते की, सर्वाधिक वृद्ध पुरुष विधूर आहे. आणि अधिकांश वृद्ध स्त्रिया विधवा आहेत.

**वृद्ध स्त्री व पुरुषांच्या सामाजिक समस्या:**

**वृद्ध स्त्री व पुरुषांचे सामाजिक समस्यांबद्दल मत**

| अनु. क्र. | सामाजिक समस्या | स्त्री N=76 | | | पुरुष N=24 | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पूर्ण सहमत | अंशत: सहमत | असहमत | पूर्ण सहमत | अंशत: सहमत | असहमत | |
| १ | आजारांची भीती वाटते | ३५ | २० | २१ | १ | १३ | १० | १०० |
| | | (४६.०५%) | (२६.३१%) | (२७.६३%) | (४.१६%) | (५४.१६%) | (४१.६६%) | |
| २ | मुलांकडून आर्थिक साहाय्य न मिळणे | ३३ | ३२ | ११ | ३ | १६ | ५ | १०० |
| | | (४३.४२%) | (४२.१०%) | (१४.४७%) | (१२.५%) | (६६.६६%) | (२० ८३%) | |
| ३ | अनावश्यक चिंता वाटते | ४७ | १६ | १३ | १३ | ८ | ३ | १०० |
| | | (६१.८४%) | (२१.०५%) | (१७.१०%) | (५४.१६%) | (३३.३३%) | (१२.५%) | |
| ४ | चिडचिडेपणा जाणवतो | ३७ | २६ | १३ | १३ | ८ | ३ | १०० |
| | | (६१.८४%) | (२१.०५%) | (१७.१०%) | (५४.१६%) | (३३.३३%) | (१२.५%) | |
| ५ | न्यूनगंडाची भावना वाढीस लागली | ४१ | १० | २५ | २ | १४ | ८ | १०० |
| | | (५३.९४%) | (१३.१५%) | (३२.८९%) | (८.३३%) | (५८.३३%) | (३३.३३%) | |
| ६ | अनिद्रा रोग जाणवतो | ३४ | २७ | १५ | ५ | १० | ९ | १०० |
| | | (४४.७३%) | (३५.५२%) | (१९.७३%) | (२०.८३%) | (४१.६६%) | (३७.५%) | |
| ७ | नैराश्य जाणवते | ३४ | ३० | १२ | ७ | ५ | १२ | १०० |
| | | (४४.७३%) | (३९.४७%) | (१५.७८%) | (२९.१६%) | (२०.८३%) | (५०.००%) | |
| ८ | एकत्रीपणा जाणवतो | ३३ | ३२ | ११ | १२ | ५ | ७ | १०० |
| | | (४३.४२%) | (४२.१०%) | (१४.४७%) | (५०.००%) | (२०.८३%) | (२९.१६%) | |

वृद्ध स्त्री आणि पुरुषांच्या सामाजिक समस्या जाणून घेतांना असे दिसून येते की, ४६.०५% स्त्रियांना आजारी होण्याची खूप भिती वाटते याबाबत त्यांनी पूर्णत: सहमती दर्शवली तर आजारी होण्याच्या

भितीबाबत ५४.१६% पुरुषांनी अंशत: सहमती दर्शवली.
मुलांकडून आर्थिक सहाय्यत मिळण्याच्या बाबतीत ४३.४२% स्त्रियांनी पूर्णत: सहमती दर्शवली तर ६६.६६% पुरुषांनी अंशत: सहमती दर्शवली.
अनावश्यक चिंता वाटते या मताशी ६१.८४% स्त्रिया तसेच ५४.१६% पुरुष पूर्णत: सहमत होते.
चिडचिडपणा जाणवण्याच्या बाबतीमध्ये ४८.६८% स्त्रियांनी पूर्णत: सहमती तर ४५.८३% पुरुषांनी अंशत: सहमत दर्शवली.
न्युनगंडाची भावना वाढीस लागली या मताशी ५३.९४% स्त्रियांनी पूर्णत: सहमती दर्शवली तर ५८.३३% पुरुषांनी अंशत: सहमत दर्शविली.
अनिद्रा रोग जाणवण्याच्या बाबतीमध्ये ४४.७३% स्त्रियांनी पूर्णत: सहमती दर्शवली तर ४१.६६% पुरुषांनी अंशत: सहमत दर्शवली.
नैराश्य जाणवण्याच्या बाबतींमध्ये ४४.७३% स्त्रियांनी पूर्णत: सहमती दर्शवली तर ५०.००% पुरुषांनी असहमती दर्शवली.
एकाकीपणा जाणवतो या मताशी ४३.४२% स्त्रिया आणि ५०.००% पुरुषांनी सहमती दर्शवली आहे.

**वृद्धाश्रमातील स्त्री आणि पुरुषांच्या सामाजिक समस्येबाबतची सांख्यिकीय सार्थकता**

| अनु.क्र. | लिंग | संख्या | मध्यमान (Mean) | प्रमाण विचलन S.D. | 't' मुल्य | स्वाधिनता मात्रा (df) | P मुल्य (0.05) | P मुल्य (0.0१) | P फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्त्री | ७६ | १८.२७ | २.१० | ६.५८** | ९८ | १.९६ | २.५८ | P<६.५८ |
| २ | पुरुष | २४ | १५.६२ | १.९२ | | | | | |

** Significant

**गृहीतक H१ :** वृद्ध स्त्रीयांना सामाजिक समस्या पुरुषापेक्षा अधिक प्रमाणात दिसून येतात.
**शुन्य गृहीतक H०** :वृद्ध स्त्री व पुरुषांच्या सामाजिक समस्येबाबत अंतर आढळून येत नाही.
वृद्ध स्त्री आणि पुरुषांच्या सामाजिक समस्याच्या अंतराबाबतील प्राप्त 't' मुल्य ६.५८ हे ०.०५ व ०.०१ या दोन्ही स्तरावर लक्षणीय आहे. म्हणजेच दोन्ही मध्यामानातील फरक हा लक्षणीय आहे. त्यामुळे शुन्य गृहीतक हे अस्विकारणीय आहे आणि संशोधनासाठी घेतलेले गृहीतक हे स्विकारणीय आहे.
यावरून असे स्पष्ट होते की, वृद्ध स्त्री आणि पुरुषांच्या सामाजिक समस्यामध्ये अंतर आढळून येते. स्त्रियांना सामाजिक समस्या अधिक प्रमाणात दिसून येते.
आई-वडील आपल्या मुलांवर नेहमीच प्रेम करतात. वृद्ध व्यक्तींना आपले मुले, नातवंड अडीचा सहवासातच राहायला आवडते. परंतु कुठल्याही कारणास्तव वृद्धांना वृद्धांना वृद्धाश्रमात यावे लागले तरीही त्यांना पुरेशा प्रमाणात आर्थिक मदत प्राप्त होणे आवश्यक आहे. वृद्धांना एक दुसऱ्यासोबत एकजुटीने आपले जीवन घालविण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची:**

१) बोधनकर एस (१८८३) - "सामाजिक संशोधन पद्धती" श्री साई प्रकाशन, धरमपेठ, नागपूर.
२) भांडारकर एल.पी., शेख शब्बीर (१९८६) - "भारतीय सामाजिक समस्या" "वृद्धावस्था आणि परावलंबन". एस.चन्द ॲन्ड कंपनी प्रा.लि., रामनगर, नई दिल्ली.
३) भागवत वि.गो. (२००५) - "जेष्ठ नागरिकांचा सुख सोबती" प्रकाशिका - सौ. सुचेता राळे, सदाशिवपेठ, पुणे.
४) फरकाडे त्रि. (१९९९) - "विवाह आणि कौटुंबीक संबंध" विद्या प्रकाशन, रुईकर रोड नागपूर.
५) गोडबोले अरविंद स. (१९६७) – "वृद्ध आणि त्यांचे प्रश्न" पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि. ताडदेव रोड, मुंबई.
६) घाडोळे रा.ना. (१८८३) - "भारतीय समाज व्यवस्था" श्री. मंगेश प्रकाशन, रामदासपेठ, नागपूर.

# मानवी मूल्ये संवर्धनाच्या दृष्टीने ताटीच्या अभंगांची उपयुक्तता

**गीता भाऊराव गावंडे**
संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती
geetagawnde1997@gmail.com

---

**प्रस्तावना :**

मराठी साहित्याच्या इतिहासात संतांनी केलेली साहित्यिक क्रांती ही उल्लेखनीय आहे. मराठी भाषेला अधिक समृद्ध व प्रगल्भ बनविण्याचे महत्वपूर्ण कार्य संतवाणीने केले आहे. संतानी साहित्य क्षेत्राला नक्कीच नवीन आयाम दिला परंतुआपली विद्वत्ता मिरवून पांडित्य प्रदर्शन कधीही केले नाही. आपल्याला त्यांच्या साहित्यातून त्यांना जन सामान्यांविषयी वाटणारा कळवळा वेळोवेळी दिसून येतो. “बुडते हे जण न देखवे डोळा । म्हणुनी कळवळा येत असे ॥”[१]साहित्यिक योगदाना बरोबरच सामाजिक व अध्यात्मिक प्रगतीसाठी केलेले संताचे काव्य व कर्तुत्व हे अवर्णनीय आहे. त्यांनी घेतलेला मानवी कल्याणाचा वसा हा तिथेच संपला नाही तर आज त्यांच्या साहित्यातून त्याची पूर्तता होत आहे. बाराव्या शतकामध्ये अनेक संतांची मांदियाळी उदयास आलेली आपणास दिसून येते. त्यातही वारकरी संप्रदायाने पंढरपूरच्या वाळवंटात निर्माण केलेली आध्यात्मिक लोकशाही ही सर्व सामाजिक प्रथा, परंपरा व रूढींना छेद देणारी होती. स्त्री, शुद्र सर्वांना भक्तिमार्ग खुला करण्यात आला. स्वतः ज्ञानदेवांनी मराठी भाषेमध्ये सर्वांना साहित्य सोनियाची खान उघडी करून दिली. साहित्य सोनियाची खाणी । उघडवी देशियेचिया क्षोणी । विवेकवल्लीची लावणी । हो देई सैंघ ॥[२]त्यांनतर अठरा पगड जातींमधून अनेक धर्मांमधून अनेक संत भक्तिमार्गात सहभागी झाले व रसपूर्ण साहित्याची रचना करण्यात आली. त्याचवेळी स्त्रीशाक्तीलाही आपली विद्वत्ता सिद्ध करण्याची संधी प्राप्त झाली.प्रा. इंदुमती शेवडे म्हणतात – “ संतांनी धार्मिक समानतेचा पुरस्कार केल्यामुळे पुरुषांबरोबर स्त्रियांनाही आपला अध्यात्मिक उन्नती करून घेण्याची संधी मिळाली. घराबाहेरचे एक क्षेत्र कार्यक्षेत्र तिला खुले झाले. यादृष्टीने संतांचीही चळवळ एका अंगाने स्त्री मुक्तीची चळवळ ठरली. महाराष्ट्रातील ही पहिली स्त्रीमुक्ती चळवळ म्हणता येईल.”[३]या संधीचे सोने करताना स्त्रियांनी कुठलाही आडपडदा न ठेवता कुठल्याही सामाजिक विरोधाला न जुमानता आपले कार्य अविरत सुरु ठेवले. या अनुषंगाने संत कवयित्रींच्या माध्यमातून स्त्रीकडे असणारी प्रतिभाशक्ती, प्रगल्भता, वैचारिक उंची, अध्यात्मिक सामर्थ्यव मानवी कल्याणासाठी जगाला उपदेश करण्याचा अधिकार प्रत्ययास आला. त्यांचे कार्य इतके बहुमोलाचे होते की, त्यांनी दिलेला संदेश आजही मानवी समाजाला विश्वशांतिकडे घेऊन जाणारा आहे.

**संत मुक्ताबाई :**

बाराव्या शतकामध्ये चिमुकल्या मुक्ताबाईने केलेला उपदेश आजही अध्यात्मिक प्रगतीकडे प्रवृत्त असणाऱ्या योगी अथवा साधू पुरुषाला मार्गदर्शक ठरतात. “मुक्ताईची अभंगसृष्टी मर्यादित आहे, पण तिच्यातील गुणघनता मात्र महाराष्ट्र सारस्वतकार म्हणतात त्याप्रमाणे खरोखरच वाचकांच्या मनास थक्क करून सोडणारी आहे.”[४] मुक्ताबाईचा गौरवपूर्ण उल्लेख तत्कालीन अनेक संतांनी त्याच्या साहित्यमध्ये केलेला दिसून येते. संत निवृत्तीनाथ हे त्यांचे थोरले बंधू व गुरु होते. निवृत्तीनाथांनी मुक्तीचा अधिकार जाणला होता. मुक्ताबाई सर्व भावंडांमध्ये धाकटी बहिण होती. परंतु आई वडिलांच्या मृत्युनंतर ती त्यांची जणू आईच बनली. वेळप्रसंगी आपल्या भावंडाना तिने मार्गदर्शन केले त्यामधून तिचे अध्यात्मिक अनुभव सहजपणे प्रकट झाले. वेळप्रसंगी ती सर्वांची गुरुही बनली. निवृत्तीनाथांनी तिचा अधिकार जाणला होता ते म्हणतात –“तेथे कवणासी नमावे । जननी जनक ते थोर म्हणावे । की जीवे भावे शरण जावे सद्‌गुरूला ॥”[५] ज्ञानदेवांनी एका अभंगवजा आरतीतून मुक्ताईची थोरवी गाताना म्हटले – “अहो मुक्ताबाई तू ब्रह्मीचे अंजन। तुझिया प्रसादे सद्‌गुरू निधान । तुज आणि निवृत्ती नाही भिन्नता तेची तू निवृत्ती सारजा माता ॥”[६] यावरून असे लक्षात येते की ज्ञानेश्वर मुक्ताबाईला गुरुतुल्य मानत.तसेच मुक्तगंगा निर्विकार, मुक्तीच्या मौन्य मुद्रा, मुक्त वैराग्य लखलखीत, मुक्त अंजन देखणी,मुक्ती ज्ञान समाधी कौतुक, मुक्तप्रभावळ, निवृत्ती सार जवळ हे मुक्ताईबद्दल सोपानदेवांनी काढलेले उद्गार आहे. या तीन भावंडाव्यतिरिक्त मुक्ताबाईने तत्कालीन संत नामदेव, विसोबा खेचर, चांगदेव यांना उपदेश केला आहे हे आपणास अभ्यासावयास मिळते. संत मंडळीतील तिचे स्थान

एका आरतीमधून प्रत्ययास येते. "नामदेव चांगदेव तट्टीचे तीर। पूर्ण ओघ वाहे अमृतनीर ।मध्यभागी शोभे देव वटेश्वर । धन्य ओ मुक्ताबाई तुझा अवतार ॥"७ मुक्ताबाईच्या रूपाने अमृताचा ओघच जणू नामदेव व चांगदेव या दोन तीरांना समृद्ध करीत आहे. तत्कालीन संत मंडळीमध्ये मुक्ताबाईचे स्थान हे महत्वपूर्ण असून त्यांनी अनेक संतांना उपदेश केला तसेच अध्यात्मिक प्रगतीदृष्टीने मार्गदर्शन केले. अशाप्रकारे मुक्ताबाईचा अध्यात्मिक अधिकार हा श्रेष्ठ असून सर्वमान्य केला होता.

**ताटीच्या अभंगाची पार्श्वभूमी :**

मुक्ताबाईने इतरांना उपदेश केला असेल तो निराळा परंतु योगियाच्या माउलीला, आपल्या थोरल्या भावाला, गुरुबंधूला तसेच साक्षात ज्ञानाच्या सागराला उपदेश करावा या एकाच गोष्टीवरून मुक्ताबाईची वैचारिक, अध्यात्मिक उंची व लोककल्याणाची तळमळ प्रत्ययास येते. मुक्ताबाईने ज्ञानदेवांना जो उपदेश केला तो ताटीचे अभंग म्हणून ओळखला जातो. त्या अभंगामध्ये ती वारंवार ज्ञानदेवांना ताटी उघडण्याची विनंती करते. आईने मुलाला समजावून सांगावे त्या शैलीने ती ज्ञानदेवाची समजूत काढते. या ज्ञानियाच्या राजाला ताटी बंद करून बसण्याचे कारण तरी काय असावे हा प्रश्न पडतो. त्यासाठी असे सांगितले जाते की संन्याशाची मुले म्हणून वाळीत टाकलेल्या या मुलांना समाजकंटक त्रास देतात. वारंवार त्यांना अपमानित करतात. भिक्षा वाढत नाही. असेच एके दिवशी संत ज्ञानेश्वर माधुकरी मागायला गेले असता त्यांना भिक्षा न वाढता अत्यंत अपमानित केले गेले त्यामुळे ज्ञानदेवांना त्याचा संताप आला व ते आपल्या झोपडीचे दार बंद करून आत बसले. खर तर ज्ञानेश्वरांच साहित्य व व्यक्तित्व बघता या योग्याला दैनंदिन घडणाऱ्या घटनेवर विशिष्ट एखाद्या दिवशीच संताप यावा व ते अगदी विन्मुख व्हावे हे सुसंगत वाटत नाही. ज्ञानेश्वरांना हा संताप कोणी भिक्षा न वाढल्यामुळे किंवा अपमान केल्यामुळे आलेला नव्हता कारण संत स्वतःच्या वैयक्तिक अपमानाने रागावणे संभवत नाही परंतु त्यांना संतापच येत नाही असे नाही संतांच्या संतापाचे स्वरूप मात्र भिन्न असते. स्वतःच्या स्वार्थी बुद्धीतून आलेला तो संताप नसतो. तर "संतांचे मन हे विश्वमनाशी तादात्म्य पावलेले असल्याने ज्यावेळी विश्वमनावरच काही तरी आघात होण्यासारखी परिस्थिती निर्माण होते तेव्हा ते संतापतात."८ खऱ्या शुद्ध ज्ञानावर शब्दपांडित्याची कुरघोडी ही समाजमनावर आघात करणारीच परिस्थिती होती. त्यामुळे ज्ञानदेवांना संताप येणे हे साहजिकच आहे. सर्वत्र दिसून येणारे शब्दपांडित्य बघून संतप्त झालेले ज्ञानेश्वर ज्ञानाची कवाडे लावून बसले आहे याला पुष्टी देणारा मुक्ताबाईचा ताटीचा पहिलाच अभंग आहे. "शब्दशास्त्रे झाले क्लेश । संती मानवा उपदेश ।" यावरून असे लक्षात येते की शब्दशास्त्रामुळे क्लेश होणारी परिस्थिती त्यावेळी निर्माण झाली असावी. यावेळी संत मुक्ताबाई ज्ञानदेवांना आपला संताप दूर करण्याची विनवणी करते. खऱ्या योग्याचे, संताचे लक्षण ती आपल्या अभंगातून प्रकट करते. ज्ञानेश्वराला आपल्या अधिकार वाणीने त्यांच्या संतपणाची जाणीव करून देताना संपूर्ण जागाचं कल्याण त्यांनी कराव अशी अपेक्षा व्यक्त करते.

**ताटीचे अभंग :**

संत ज्ञानेश्वराला तुम्ही योगी आहात सामान्य मनुष्यासारख वर्तन हे योग्याच असू शकत नाही ही जाणीव करून देतेना त्या योग्याची लक्षणे सांगतात –

"योगी पावन मनाचा । साही अपराध जनाचा ॥ विश्व
रागे झाले वन्ही । संत सुखे व्हावे पाणी ॥
शब्द शास्त्रे झाले क्लेश । संती मानावा उपदेश ॥ विश्व
पट ब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥"९

योग्याचे मन हे पावन असते तो सामान्य जनावर रुसत नाही उलट तो या जगाचा अपराध सहन करीत असतो. संतांची लक्षणे सांगताना त्या म्हणतात की, हे जग दाहक असेल तर संतांकडे शीतलता आहे. हे विश्व जर रागाने वन्ही, आग झाले तर ती आग क्षमवण्याच सामर्थ्य असणार पाणी स्वतः व्हा. असे ती ज्ञानेश्वराला आवाहन करते.विश्व हा पट म्हणजे वस्त्र असून त्याचा आधार ब्रह्म आहे हे अन्वयव्यातिरेकाचे तात्विक ब्रह्मज्ञानाचे सूत्र ती विश्वपट ब्रह्म दोरा एवढ्या अल्पाक्षरात व्यक्त करते. ज्याचं हृदय विश्वव्यापक झालं आहे, ज्यांनी सुखाचा आत्मानंदाचा अनुभव घेतला आहे त्यांनी इतरांना उच नीच मानू नये तो आनंद इतरांना देण्याचा प्रयत्न करावा. गर्व अभिमानाने इथे कोणीही टिकून राहिलेले नाही. त्यामुळे मनातील भेद, द्वैत दूर करा व मनाची आणि ज्ञानाची कवाडे उघडा अशी विनवणी मुक्ताबाई करते.

"सुख सागरी वास झाला। उच नीच काय त्याला ॥
आपण जैसे व्हावे । देवे तैसेची करावे ॥
एके उंचपण केले । घर अभिमाने गेले ॥ द्वैत टाकून
शांती धरा ।ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥"१०

साधू किंवा योगी अथवा संत यांची लक्षणे सांगतांनाच मुक्ताबाई कोणाला साधू किंवा संत म्हणू

नये हेसुद्धा स्पष्ट करतात ते म्हणतात की शरीरावर भगवा पोशाख धारण केला परंतु जो आपल्या स्वतःच्या मनावर ताबा ठेवण्यास असमर्थ आहे. त्याला साधू म्हणता येणार नाही. ती एक विटंबना होईल साधू हा विवेकी असतो. अन्याय, अपमान व दुःखाचे विष तो पचवतो. आपण स्वतःच विवेकबुद्धीने आपला शोध घेतला पाहिजे. त्यामुळ आशा आणि दंभ दूर करून मन व्यापक बनविण्याचे ज्ञानेश्वरांना मुक्ताबाई सांगत आहे.

"वरी झाला भगवा जाण। अंतरी वश नाही मन।
त्याला म्हणू नये साधू। जगी विटंबना बाधू॥
आप आपणा शोधूनी घ्यावे। जगी तैसे विरक्त व्हावे।
विष ग्रासोग्रासी प्यावे। विवेक नांदे त्याच्या सवे॥"११

"संत तोची जाणा जगी। दया क्षमा ज्याचे अंगी। लोभ
अहंता न ये मना। जगी विरक्त तोची जाणा।
इह परलोकी सुखी। शुद्ध ज्ञान ज्याचे मुखी। मिथ्या
कल्पना मागे सारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥"१२

संत कोणालाही म्हणू नये तर संत त्यांनाच म्हणावे ज्यांच्या ठिकाणी इतरांविषयी दयाभाव आहे क्षमाशीलता आहे. आपल्याशी कोणी प्रतिकूल वागले तर त्याला त्याची शिक्षा न देता क्षमा करत असेल तर त्या व्यक्तीच्या ठिकाणी संतांची लक्षणे आहेत किंवा अशाच व्यक्तीला संत समजले पाहिजे म्हणून संत मुक्ताबाई ज्ञानेश्वराला ज्या गोष्टींमुळे, ज्या लोकांमुळे संताप आला आहे त्यांना उदार अंतकरणाने क्षमा करायला सांगत आहेत. समोर त्या म्हणतात की, या जगात तोच विरक्त आहे ज्यांच्या मनात लोभ अथवा अहंकार हे विकार वास करीत नाही. ज्यांच्या मुखात शुद्ध ज्ञान आहे तोच सदैव सुखी असू शकतो म्हणून तुम्ही ही खोटी समजूत सोडून द्या. कारण तुम्ही संत आहात. तुम्ही जगाविषयी दयाशील असले पाहिजे.

"ब्रह्म जैसे तैशापरी। आम्हा वेढिले भूते सारी। हात
आपला आपणा लागे। त्याचा करू नये राग॥
जीभे दातांनी चावली। कोणे बत्तीशी तोडिली। थोडे
दुखावले मन। पुढे उदंड शहाणे॥"१३

दैनंदिन व्यवहारातील उदाहरण देतेना मुक्ताबाई ज्ञानराजाला म्हणतात जिभेला दातांनी चावल तर कोणी आपले दात पडलेले कधी बघितले आहे का कारण दात आणि जीभ हे दोन्हीही आपलेच असते त्यामुळे जे आपलेच आहे जे स्वरुपगतच आहे त्याला आपण शिक्षा देत नाही तसेच संपूर्ण जन सुद्धा आपलेच आहे सगळीकडे एकच परमात्मा ब्रह्मतत्व वास करते मग त्यांनी आपल मन दुखावले म्हणून आपण त्यांच्यावर राग करणे हे कितपत योग्य होईल.

"सुख सागर आपण व्हावे।जग बोधे नीववावे। बोधा
करू नये अंतर। साधुस नाही आपपर॥
जीव जीवासी पै द्यावा। मागे करू नये हेवा।
तरणोपाय चित्ती धरा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥"१४

या जागाच, मानवच कल्याण होईल हा एकच हेतू धरून समाजाला ज्ञान दिल पाहिजे. अज्ञान हे दुःखाच कारण आहे. समाजाला सुख मिळण्यासाठी आपण स्वतः शुद्ध ज्ञान देऊन त्याचं अज्ञान दूर कराव हे ज्ञान देताना आप पर असा भाव ठेवू नये कारण साधू हे निष्काम व स्थितप्रज्ञ असतात.

"गिरी गव्हर कशासाठी। रागे पुरविली पाठी॥ असा
नसावा संन्याशी।परमार्थाचा जो का द्वेषी॥
घर बांधिले डोंगरी। विषय हिंडे दारोदारी॥ काय
केला योगधर्म। नाही अंतरी निष्काम॥
गंगाजळ हृदय करा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥"१५

मुक्ताबाई ज्ञानदेवांना आपले अंतकरण गंगाजलाप्रमाणे शुद्ध करायला सांगतात त्याचवेळी त्या सांगतात की काम क्रोध हे परमार्थामधील अडथळे आहे. जो या विकारांच्या अधीन असतो तो संन्याशी होऊ शकत नाही उलट परमार्थाचा द्वेषी असतो. जर मन निष्काम नसेल तर कितीही योग याग केले तरी ते निरुपयोगी ठरतात.

"क्रोध यावा कोठे। अवघे आपण निघोटे। ऐसे कळले
ज्याला पूर्ण।जनी तोची जनार्दन॥
ब्रीद बांधिले चरणी। नीच दाविला करणी। वेग
क्रोधाचा उगवला। अवघा योग फोल झाला॥
ऐसी दूर दृष्टी करा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥"१६

ज्यांना कळले आहे की सर्व एकच आहे इथे मुक्ताबाई अद्वैत तत्वज्ञान उलगडून दाखवत आहे. खर तर तोच जनातील जनार्दन म्हणजेच ईश्वर आहे. एखाद्याच नाव मोठ आहे परंतु कार्य कर्तुत्व हे त्यापेक्षा भिन्न व नीच दर्जाच आहे. ज्याला स्वतःच्या रागावर नियंत्रण ठेवता येत नाही त्याने कितीही योग केला असेल तो व्यर्थ जाणारा आहे त्यामुळे दूरदृष्टी आत्मसात करून तुमच्या मनाची कवाडे उघडा असे आवाहन मुक्ताबाई करताना दिसतात.

"शुद्ध ज्याचा भाव झाला। दुरी नाही देव त्याला।
अवघे साधन हातवटी। मोले मिळत नाही हाटी॥
कोणी कोणा शिकवावे। सार साधुनिया घ्यावे
।लडिवाळ मुक्ताबाई। जीव मुदल ठायीचे ठायी॥
तुम्ही तरुनि विश्व तारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥"१७

ज्याचा भाव शुद्ध आहे देव हा त्याच्याच जवळ आहे. ईश्वराची प्राप्ती भाव शुद्ध असल्याशिवाय होत नाही. 'कोणी कोणा शिकवावे ?' या तिच्या प्रश्नातच

उत्तरही दडलेलं आहे. ज्ञानदेव हे वयाने – ज्ञानाने, अनुभवाने वडील असून सांत्वन मात्र धाकटीला करावे लागत आहे. केवढी सूचकता या विधानात आहे ! तुम्ही तरुन विश्व तारा या तिच्या शब्दातून आत्मोद्धार आणि जगतोध्दाराचा संदेश ती देत आहे.

ज्ञानेश्वराच्या जीवितकार्याची जाणीव एकप्रकारे मुक्ताबाई त्यांना करून देत आहे. स्वतःला आत्मसुखामध्ये लीन करून घेणे, ज्ञानाची कवाडे अशाप्रकारे बंद करणे ही गोष्ट उच्च अध्यात्मिक पातळीवरून पाहता संकुचितपणाची आहे हे मुक्ताबाई ज्ञानेश्वरांना समजावून सांगतात. व्यापक व उदार अंतकरणाने या समाजाला माफ करून त्यांच्या कल्याणासाठी मनाची व ज्ञानाची कवाडे उघडे करण्याची विनवणी करतात.

**ताटीच्या अभंगाचे महत्व :**

- ताटीच्या अभंगाचे सामर्थ्य एवढे आहे की, समाजविन्मुख झालेले ज्ञानेश्वर विश्व तारण्यासाठी पुन्हा एकदा कटिबद्ध झाले आहे. शुध्द ज्ञानापासून वंचित झालेल्या जनसामान्यांमध्ये ब्रह्मविद्येचा सुकाळ करण्याची प्रतिज्ञा करून ज्ञानप्रदानाला उद्युक्त झाले आहे. यातूनच प्रेरित होऊन पुढे भावार्थ दिपिकेची ( ज्ञानेश्वरीची ) निर्मिती झाली असावी. म्हणजेच ताटीच्या अभंगाला भावार्थ दीपिकेचे प्रेरणास्त्रोत म्हणावयास हरकत नाही.
- सद्य स्थितीमध्ये आपल्याला ताटीच्या अभंगाची उपयुक्तता बघायची म्हटले तर आजच्या काळात बदलत असलेली परमार्थाची व्याख्या व परिस्थिती अनुभवत असतना समाजाला मुक्ताबाईचे विचार प्रेरक ठरतात कारण त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, योगी कोण, संन्याशी कोण अथवा संत कोणास म्हणावे त्यांनी सांगितलेले गुण अथवा लक्षण ज्यांच्यामध्ये नसेल त्याला आपण साधू अथवा मानन्याची काहीही गरज नाही.
- मुक्ताबाईने ज्ञानाबरोबरच आचरणावर भर दिला. अद्वैत तत्वज्ञानाची संकल्पना मांडली. ताटीच्या अभंगाद्वारे दयाभाव, क्षमाशीलता, निरपेक्षवृत्ती, विश्वबंधुत्व, विश्वशांती ही मानवी मूल्ये प्रतिपादित करून अंधश्रद्धा, थोतांडपणा व ईश्वप्राप्तीचा खरा व शुद्ध मार्ग यातील फरक उलगडून दाखवला.
- काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर अहंकार या विकारांच्या अतिरेकामुळे मानवीसमाजाचा नेहमी घातच होत आला आहे. त्यामुळे यावर मर्यादा घालून मन शांत, स्वच्छ व शुद्ध बनविणे अत्यंत गरजेचे आहे. मानवी मन सुखी, समाधानी, निस्वार्थी असेल तर संपूर्ण जग सुंदर व्हायला वेळ लागणार नाही.
- सद्यस्थितीमध्ये मानवी मूल्यांची होत जाणारी पायमल्ली व दिवसेंदिवस वाढत जाणारा स्वार्थीपणा, लोभीवृत्ती व यामुळे होणारी समाजाची अवनती वाचविण्यासाठी मुक्ताबाईनी ज्ञानदेवासाठी निर्मिलेले ताटीचे अभंग आजच्या समाजाला व मानवी मनाला प्रेरक व मार्गदर्शक असे आहे.

**संदर्भ :**


१) संत तुकाराम महाराज, तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, संपादक : नथुसिंग डोंगरसिंग राजपूत, वारकरी शिक्षण संस्था आळंदी (देवाची), पृष्ठ क्र. २८८

२) संत ज्ञानेश्वर, श्री ज्ञानेश्वरी, गीताप्रेस गोरखपूर

३) इंदुमती शेवडे, संत कवयित्री, पृष्ठ क्र. १९८

४) अ. ना. देशपांडे, प्राचीन मराठी वांड:मयाचा इतिहास, भाग १ उत्तरार्ध पृष्ठ क्र. ३७९

५) मुमुक्षू, मे-जून १९२७, अभंग ३३ तेथे पुत्रपणाची पवित्रता..

६) मुमुक्षू, संपादक : श्री. ल. रा पांगारकर,मे-जून १९२७, आरती ३ अहो मुक्ताबाई...

७) मुमुक्षू, मे-जून १९२७ अभंग ५ तप्ती तप्तेश्वरी...

८) केतकी मोडक, कडकडोनि वीज निमाली ठायीचे ठायी ( संत मुक्ताबाई व्यक्ती आणि वांड मय ) पुणे, पृष्ठ क्र. १४७

९) तत्रैव, पृष्ठ क्र. २११

१०) तत्रैव, पृष्ठ क्र. २१२

११) तत्रैव, पृष्ठ क्र. २१३

# भारतीय अर्थव्यवस्थेचा नमुना—सिंदखेडराजाची दुर्गवास्तू

**प्रा.डॉ.आर.पी.झनके**
इतिहास विभागप्रमुख, स्व.बी.एस.कला.प्रा.एन.जी.विज्ञान व ए.जी.वाणिज्य
महा. सा.खेर्डा ता.सि.राजा जि.बुलडाणा

**प्रस्तावना**

सिंदखेड राजा म्हणजे शिवशक्तीचे आदिपीठ मानले जाते. शिवपुर्वकाळातील अनेक महत्वपुर्ण घडामोडींचे सिंदखेडराजा हे प्रसिध्द केंद्र होते. येथे जन्मलेल्या माता जिजाउंच्या जिवनप्रवाहाने पुर्ण महाराष्ट्र जवळपास ४०० वर्षापासून एका भावनिक सुत्रात बांधला गेला. जाधव राजांच्या बखरीनुसार सिंदखेडचे पूर्वी आलापूर हे नाव होते. येथे सिंदुराजा नावाच्या एका गवळी राजाने वस्ती निर्माण केली. म्हणुन सिंदखेड हे नाव पडले असावे.[१] परंतु श्री. चितळे यांच्या मतानुसार सिंदखेडराजाला पूर्वी सिध्दपुर किंवा आलापूर असे म्हणत असून या परिसरात सिंदी वनस्पतीची प्रचंड झाडे असल्याने या गावास सिंदखेड म्हणत असावेत. इ. स. च्या १२ व्या शतकापासुन सिंदखेड हे अतिशय महत्वाचे स्थळ असले पाहिजे. तर पारंपारीक माहितीनुसार प्रभू रामचंद्रांनी लंकेला जातांना रामेश्वराचे लिंग स्थापन केले अशीही माहिती मिळते. तर निळकंठेश्वराच्या मंदिराचा जिर्णोध्दार इ. स. १५८७ साली राघोजी लखुजी जाधव यांनी केल्याचा उल्लेख एक शिलालेखावरून कळतो.

सिंदखेड हा परगणा लखुजी जाधवांच्या पूर्वी इ. स. १४५० मध्ये काझी या परिवाराला जहागीरी म्हणुन मिळाला होता. त्यांच्याकडे जवळपास १०० वर्षे असावा. इ.स. च्या १६ व्या शतकात सिंदखेडची देशमुखी मुळे घराण्याकडे आली.[२] त्यांचा वतनदार रविराव ढोणे याने मुळे घराण्याची कत्तल केली. या प्रकारातुन मुळे घराण्यातील यमुनाबाई नावाची एक गरोदर स्त्री वाचली. ती पळून पैठण परगण्यात गेली. तिथे लखुजी जाधव पाचहजारी मनसबदार होते. यमुनाबाईच्या तक्रारीनुसार लखुजीराव यांनी रविरावच्या गढीवर हल्ला करून त्याला ठार केले. त्यानंतर यमुनाबाईने आपली वतनदारी लखुजींकडे सोपविली. इ. स. १५७६ पासुन लखुजीराजे सिंदखेडचे देशमुख म्हणुन स्थायिक झाले. त्यानंतर पुढे लखुजींना मुर्तजा निजामशहाकडूनही दहा हजारी मनसबदारी, २८ महाल व ५२ चावडयांचे वतन प्राप्त झाले.[३] त्यामुळे त्यांचे वैभव वाढले. पर्यायाने सिंदखेडचेही वैभव वाढविण्यास प्रारंभ झाला. व सिंदखेड चे सिंदखेडराजा हे नाव याच काळात झाले.

लखुजीराव जाधवांनी आपल्या निवासासाठी एक मोठी गढी सिंदखेडराजाला बांधली. सिंदखेड गावाचा निजामशाही व आदिलशाही या राजकीय क्षेत्रात मोठा रूतबा होता. लखुजींचा वाडा आज भग्न अवस्थेत असला तरी त्यातील बहुतेक अवशेष अस्तित्वात असल्याने गतवैभवाची आठवण करून देतात. याच राजवाडयात राजमाता जिजाउंचा जन्म झाला. राजवाडयातील कारंजी, तटाक, ओटे, स्तंभ, हंडया—झुंबरे, कलावस्तु हे एकेकाळी झगमगत असुन वाडयातील इमारतींना मोठा नावलौकिक होता.[४] लखुजी राजांच्या मृत्यूनंतर त्यांचे धाकटे बंधु जगदेवराव यांनी राज्यकारभार सांभाळून लखुजींचे भव्य स्मारक उभारण्याचे कार्य सुरू केले. मात्र जगदेवराजांच्या मृत्यूनंतर जाधव साम्राज्याच्या चार शाखा झाल्या. लखुजीच्या चार पुत्रांनी या ठिकाणी आपली राजवट सुरू केली. त्यानुसार दत्ताजी आडगाव येथे, अचलोजी मेहुणाराजा येथे, बहादुरजी किनगाव राजा येथे व राघोजी सिंदखेडराजा येथे स्थायिक होवुन राज्यकारभार करू लागले. जगदेवरावांनी सिंदखेड राजाची प्रचंड भरभराट केली. त्यांनी अनेक इमारती उभारून अप्रतिम बागबगीचे फुलविले. तसेच देउळगांव राजा येथे श्री. व्यंकटेशाची ही स्थापना केली.[५]

**लखुजीराजांचा राजवाडा :—** सिंदखेड राजामध्ये लखुजी जाधवांचा महाल आहे. त्याची निर्मीती इ. स. १५७६ मध्ये झाली. राजवाडयाचे प्रवेशद्वार दगडांनी बनविले असुन उत्तरमुखी आहे. साधारणतः ११.६५ मीटर उंचीच्या प्रवेशद्वाराच्या कमानीची उंची ४.५ मीटर व रूंदी २.८० मीटर आहे. प्रवेशद्वारात उपद्वार आहे. राजमहाल देवळया, नगारखाना व तटबंदीयुक्त असुन त्याची लांबी १०२.२० मीटर व रूंदी ९० मीटर आहे. राजमहालाचा परकोट ७ मीटर उंचीचा आहे. महालाचे

दोन भागात विभाजन असुन पूर्वेकडे दरबार व पश्चिमेकडील राणीमहालाचा भाग आहे. राणीमहाल तीन मजली आहे. याच महालाच्या नैऋत्य दिशेला म्हाळसाबाईचा महाल आहे. याच महालात जिजाबाई चा जन्म झाला. तेथे दगडांत जिजाबाई व बालशिवबा यांची प्रतिमा कोरलेली आहे. राजमहालाच्या पश्चिमेला नृत्यशला होती. व त्यामागे सावकार वाडा होता.

**प्रवेशद्वार :–** सिंदखेडराजा येथे ऐतिहासिक वास्तुंमध्ये लखुजीचा राजमहाल ही महत्वपुर्ण वास्तु असुन तिचे बांधकाम सुमारे इ. स. १५७६ मध्ये झाले असावे. सध्या गावाच्या पूर्वेस असलेला राजवाडा उत्तरमुखी प्रवेशद्वाराचा असुन या भव्य प्रवेशद्वाराचे तिन मजले आहेत.[६] या प्रवेशद्वारात खाली देवडया, त्यावर नगारखाना व त्यावर संरक्षक भिंत उभारलेला सज्जा असे दरवाजाचे स्वरूप आहे. प्रवेशद्वाराची चौकट दगडी असुन मजबुत आहे. त्यावर कोरीव कामामध्ये कमळाची तबके शिल्कांकित आहेत. याशिवाय चौकटीलाच दगडी नारळाचे तोरण शिल्पीत असुन त्यात एकुण १४ नारळ दर्शविले आहेत. सध्या त्याची डागडुजी झालेली दिसुन येते. सध्या प्रवेशद्वाराचे मुळ दरवाजे नष्ट झालेले आहेत. संरक्षक भिंतीपासुन प्रवेशद्वाराची उंची ११.६५ मी. असून ४.०५ मी. उंच व २.८० मी. रूंद कमान आहे. या मुख्य द्वारातुन आत प्रवेश केल्यानंतर पूर्वेकडे दोन व पश्चिमेस एक देवडी दिसुन येते. पूर्वेकडील दोन देवडयांपासून पुढे गेल्यानंतर राजवाडयाकडे जाणारे उपद्वार लागते. व पूर्वेच्या देवडीवरूनच नगारखान्याकडे जाण्यासाठी सोपानमार्ग आहे.

**नगारखाना :–** लखुजी राजांच्या राजवाडयात एक भव्य नगारखाना असुन त्याची लांबी ११.४० मी व रूंदी १०.८५ मी. तर उंची छतापासुन ३.५० मी एवढी आहे. नगारखान्याला २४ कमानी होत्या. कमानीची उंची २.६५ मी. होती. नगारखान्यात पश्चिमेकडे एक स्नानगृह (न्हाणीघर) दिसते. जाधवकाळात या नगारखान्यावरून चौघडा वाजत असे.[७] नगारखान्यावरून वर जाण्यासाठी सोपानमार्ग आहे. ही गच्ची १२.१५ मी. लांब, ११.५ मी. रूंद असून तीच्या चारही बाजुंनी १.९५ मी उंचीची संरक्षक भिंत बांधली असुन या भिंतीला जागोजागी छिद्रांसोबतच मारा करण्यासाठीच्या जंग्या आहेत.

**राणीमहल :–** राजवाडयाच्या पूर्व भागात दरबाराची जागा व पश्चिमेकडे राणी–महाल असावेत. पूर्वेकडील बहुतेक वास्तुंचे अवशेष आज नष्ट झालेले असुन केवळ जोते दिसुन येतात. त्यावरून अंदाज लावता येतो. पश्चिमेकडील जोत्यांची लांबी व रूंदी सारखीच आहे. हे निवासस्थान तीन मजली असावे. खालीची दोन तळघरे व वरचा मजला निवासस्थानाचा असावा. या वास्तुच्या उत्तरेकडून सलग भिंत बांधली असुन वाडयात शिरण्यासाठी पूर्वेकडे प्रवेशद्वार होते. वरच्या मजल्यावर मधोमध चौक व त्याच्या चारही बाजूनी खोल्या बांधल्या होत्या. त्यांचे बांधकाम दगडात असून लाकडी खांबांचाही उपयोग केला आहे. यात काही न्हाणीघरे व कपाटाची नमुनेही दिसुन येतात. राजवाडयाच्या नैऋत्य बाजूला म्हाळसाबाईचा महाल होता. याच महालात जिजामातेचा जन्म झाला. तिथे जिजामाता व बालशिवबाचा पुतळा बसविलेला आहे.

**तळघरे :–** राजवाडयाच्या पश्चिमेकडील राणीमहालांच्या खालीच तळघरे आहेत. राणी निवास स्थानांच्या खाली असलेली ही तळघरे राजवाडयाच्या जोत्याच्या पूर्व व पश्चिम अंगाला आहेत. पूर्वेकडील तळघरे पूर्व व दक्षिण बांधली असुन त्यामध्ये प्रवेश करण्यासाठी चार दरवाजे आहेत. तळघरात प्रकाशासाठी व हवेसाठी झरोखे आहेत. या तळघराची एकुण सात दालने आहेत. वेगवेगळया आकारमानाची हि दालने असुन पाचव्या दालनानंतर वर जाण्यासाठी जीना आहे. याप्रमाणेच पश्चिमेकडेही पाच दालनंचे तळघर आहे. याची रचना मात्र अंधारकोठडीसारखी आहे. या तळघरात उतरण्यासाठी पश्चिमेकडून दरवाजा असुन ती बहुधा जाधवांच्या खजिन्याची जागा असावी. तळघराच्या भिंती दणकट व रूंद आहेत. दुसऱ्या दालनात भिंतीत चौकोणी आकाराचा कोनाडा आहे. त्याच्या डाव्या बाजुस भिंतीत कमळ कोरलेले असुन उजव्या बाजुस बाणाची खुण आहे.[८] हा कोनाडा वजा खिडकी ओलांडून भिंतीच्या पोकळीत शिरल्यानंतर डाव्या बाजुला हौद असुन ही बहुधा गुप्तधन ठेवण्याची जागा असावी.

**सारांश:–** आजच्या स्थितीत राजवाडयातील या बारा दालनांची तळघरे तेवढी अवशेष रूपात आहेत. त्याखालील तळघरांचे उत्खनन होणे बाकी आहे. तरीही तळघरांचे बांधकाम पाहिले असता. एका भव्य वास्तुची कल्पना मनात येते. राजवाडयाच्या पश्चिमेस लागूनच

नृत्यमहाल आहे. यालाच कंचनीचा महाल असेही म्हणतात. आजच्या स्थितीत या वास्तुत पोलीस स्टेशन आहे. महालाच्या पाठीमागे पूर्वीचा सावकारवाडा दिसतो. ही वास्तु लखुजीरावांच्या काळात बांधली असावी. त्याकाळी वासुदेवसा, मुरारसा, नवलसा इत्यादी प्रसिध्द व धनाढय सावकार होते. त्यांच्या वास्तुसुध्दा विशाल होत्या. सावकार वाडयांच्या तटबंदी खालील अर्धा भाग चिरेबंदीयुक्त व अर्ध्या भागाचे बांधकाम विटांनी केलेले असुन वाडयाच्या प्रवेशद्वारावरील नक्षीकाम देखणे होते.

**संदर्भ ग्रंथ :–**


१) देशमुख विजय, सिंदखेडराजा, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ.

२) तत्रैव, पृ. २

३) तत्रैव, पृ. ३

४) चितळे श्रीपाद केशव, विदर्भातील किल्ले, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर,पृ. ६४

५) देशमुख विजय, सिंदखेडराजा, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. ६

६) नखाते दिनेश, मेरा विदर्भ, अमोल प्रकाशन, गोंदिया, पृ. १३९

७) देशमुख विजय, सिंदखेडराजा, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. ११

८) तत्रैव, पृ. १४

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि जलव्यवस्थापन

डॉ. सचिन एस जयस्वाल
बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय,यवतमाळ

"जो विकास चालू पिढीच्या गरजा पुढील पिढीच्या गरजा धोक्यात न आणता पूर्ण करतो अश्या विकासाला शाश्वत विकास म्हणतात."
गेल्या काही वर्षांपासून आपण नद्याजोड प्रकल्पाची चर्चा करीत आहोत, ही चांगली गोष्ट आहे. पण याबाबत अनेक विधायक कल्पना शंभर वर्षांपूर्वी बाबासाहेबांनी मांडल्या होत्या. बाबासाहेबांचा उदात्त हेतू, त्यांचा दूरदृष्टीपणा, सर्वसामान्यांसमोर आलेला नाही.आपल्याकडच्या मोठ्या नद्या दरवर्षी १,११,०१३ दशलक्ष घनमीटर पाणी समुद्रात सोडतात. या पाण्याचा वापर (वीज, वाहतूक, सिंचन) केल्यास विकास होऊ शकतो. यावर बाबासाहेबांचा विश्वास होता.

आज जगभर जलकलह सुरू आहे, नव्हे, तो अधिकाधिक तीव्र होत आहे. त्याचबरोबर प्रकल्प, संघर्ष यातून निर्माण होणारे प्रादेशिक वाद दिवसेंदिवस पुढे येताना दिसत आहेत.

अगदी अलीकडेच पाण्याच्या प्रश्नावरून कर्नाटक विरुद्ध तामिळनाडू असा एक संघर्ष अल्पकाळासाठी का होईना पण आपण पाहिला आहे. कोयना धरणाला आज 50 वर्षे झाली तरी त्या परिसरातील सुमारे दोन-तीन हजार प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न पूर्णपणे मिटलेला नाही. आज संपूर्ण जग या जलकलहाने भेडसावले आहे. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नीती काय होती, हे समजून घेणे आणि या नीतीचा प्रसार करणे आज काळाची गरज आहे. खरे तर या महत्त्वाच्या विषयात बाबासाहेबांनी केलेल्या भरीव योगदानाविषयी फार व्यापक चर्चा झालेली नाही. याबाबत बरीचशी अनभिज्ञता दिसून येते.

सन १९४२ ते १९४६ या कालावधीत व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मजूर खात्याचे मंत्री होते. या खात्याबरोबरच जलसिंचन आणि ऊर्जाविभागसुद्धा या मंत्रालयाला जोडले गेले होते. या तिन्ही महत्त्वांच्या विभागाच्या नियोजनाचा पाया डॉ. आंबेडकर यांच्या कार्यकाळात घातला गेला. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन समितीचे अध्यक्ष म्हणूनही बाबासाहेबांनी काम पाहिले. भारताची श्रम, जल, वीज बहुउद्देशीय धरण प्रकल्पाची संकल्पना प्रथम बाबासाहेबांनी मांडली. केंद्रीय जल आयोग व केंद्रीय विद्युत आयोग यांची स्थापना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मंत्री असताना झाली. हिराकुंड, दामोदर व सोन नद्यांवरील नदी खोरे प्रकल्पांची सुरुवात त्यांच्याच काळात झाली. १९४२ ते १९४६ या चार वर्षांच्या कालावधीत अखिल भारतीय जल धोरणाची पायाभरणी झाल्यामुळे जलसिंचन आणि विद्युत ऊर्जेची नेत्रदीपक प्रगती झाल्याचे दिसून येते. ओरिसातील कटक येथे जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत व डॉ. ए.एन. खोसला यांच्या अध्यक्षतेखाली एक समारंभ झाला. त्यावेळेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर मंत्री नव्हते. या धरणाबाबत बोलताना, ही धरणे भारताची आधुनिक मंदिरे आहेत, असे पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हे प्रकल्प सुरू करण्यात मोठा वाटा व सहभाग होता, असे डॉ. खोसला म्हणाले. ज्यांना नेहरू भारताची आधुनिक मंदिरे म्हणतात त्यांच्या पायाभरणीचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सन १९४२ ते ४६ या काळात केले.

सन १९४५-४७ या काळात दामोदर नदी खोरे आणि महानदी खोरे यांच्या बहुउद्देशीय विकासासाठी योजना तयार करून राज्यातून वाहणाऱ्या नद्यांचे प्रकल्प व त्यांचे व्यवस्थापन हे नदीखोरे प्राधिकरण किंवा महामंडळ स्थापना करून त्यांच्या ताब्यात दिले. याचे सारे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जाते. यामध्ये केंद्र आणि राज्य सरकार या दोन्हींचा सहभाग होता. दामोदर नदी बिहार आणि बंगाल प्रांतातून वाहते. तिचे नियंत्रण, व्यवस्थापन आणि जलविकास यासाठी दामोदर नदीखोरे महामंडळ स्थापन केले. हे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समन्वयात्मक दृष्टिकोनाचे फलित होते. संपूर्ण नदीखोरे हा विकासाचा आधार मानून त्याकरिता बहुउद्देशीय विकास प्रकल्प स्थापन करण्याची संकल्पनादेखील त्यांचीच आहे.

जलसंपत्तीचा वापर फक्त एका उपयोगासाठी न करता सिंचन, नौकानयन, औद्योगिक आणि घरगुती वापरासाठी जलऊर्जा विकसित करणे, एखाद्या विशिष्ट

राज्यापुरता किंवा लहान प्रदेशापुरता विचार न करता संपूर्ण नदीखोऱ्यांचा विकास करणे, बहुउद्देशीय प्रकल्प आणि त्याची सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरण विकासाच्या उद्दिष्टांशी सांगड घालणे अशा प्रकारची सांधेजोड केल्यामुळे समग्र विकासाचे उद्दिष्ट साध्य होणार होते. भारतातील एकूण उपलब्ध जलसंपदेपैकी २/३ जलसंपदा ही गंगा, ब्रह्मपुत्रा, मेघना या नद्यांच्या खोऱ्यातून तसेच भारताच्या भौगोलिक क्षेत्रांपैकी १/३ क्षेत्र व्यापणाऱ्या क्षेत्रातून उपलब्ध होते. ही व्यस्त प्रमाणातील स्थिती दोन प्रकारे देशातील जनतेस वेठीस धरते. नेहमी पूर व त्यापासून उद्भवणाऱ्या समस्यांना जनतेस सामोरे जावे लागते. त्यावेळी जलदुर्भिक्ष्यांच्या क्षेत्रातील जनतेस दुष्काळी परिस्थिती व त्याच्याशी निगडित समस्यांशी मुकाबला करावा लागतो. या गंभीर बाबींकडे डॉ. बाबासाहेबांनी लक्ष्य केंद्रित करून नदीजोड प्रकल्पाची प्रथम मांडणी केली. नदीजोड प्रकल्पामुळे सिंचन, नौकानयन, औद्योगिक आणि घरगुती वापरासाठी जलऊर्जा विकसित करणे अर्थात भारताच्या आर्थिक विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सतत प्रयत्नशील होते.

बहुउद्देशीय प्रकल्प म्हणजे एखाद्या खोऱ्यातील उपलब्ध संसाधनाचा आंतरसंबंध लक्षात घेऊन त्या खोऱ्याचा सर्व दृष्टींनी विकास करणे ही कल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली. पाण्याची उपलब्धता आणि विविध क्षेत्रातील तिच्या वापराची शक्यता ही दोहोत संबंध प्रस्थापित करण्यासाठी एकत्रित नदीखोरे विकासाची आवश्यकता लक्षात घेऊन भारतात प्रथमत: १९४५-४७ या काळात दामोदर नदी खोरे आणि महानदी खोरे यांच्या बहुद्देशीय विकासाची योजना पुढे आली. याचे संपूर्ण श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जाते. बिहार प्रांत आणि पश्चिम बंगालमध्ये दामोदर खोरे प्राधिकरण स्थापन करण्यासाठी १९४८ मध्ये भारतीय संसदीय लोकसभेने दामोदर नदी आणि तिच्या उपनदीवर खोरे यांचा समावेश असणारा दामोदर व्हॅली या नावाने कायदा केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३ जानेवारी १९४४ रोजी कलकत्ता येथील अधिवेशनात स्पष्ट केले की, दामोदर प्रकल्पाचा हेतू केवळ महापूर थांबविणे एवढाच नसून त्याद्वारे विद्युतशक्तीची निर्मिती, सिंचनासाठी पाण्याचा पुरवठा, जलवाहतूक आणि औद्योगिक वापरासाठी या प्रकल्पाचा हेतू साध्य होतो, इत्यादी बाबी स्पष्ट केल्या. बहुउद्देशीय विकास धोरणात जलमार्गाबरोबरच पाणी वापराच्या सर्व शक्यतांचा समावेश, बहुउद्देशीय नदी व्यवस्थापन योजनेत केवळ त्या क्षेत्रासाठी बारमाही जलशक्ती आणि कालव्याच्या माध्यमातून सिंचनाच्या क्षमतेचाच नव्हे तर कुपनलिकेच्या साहाय्याने उपसा करून सिंचन उपयोगिता वाढविता येऊ शकते. दलदलीच्या भागातील पाणी काढून घेऊन त्या ठिकाणची उत्पादनक्षमता वाढविण्याबाबत कामांचा समावेश, औद्योगिक विकासासाठी स्वस्त विद्युत शक्तीच्या तरतुदीबरोबर गंगेत जलवाहतुकीसाठी पाणीपुरवठ्यात सुधारणा आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणी पुरनियंत्रणात सुधारणा तसेच उपसिंचन, औद्योगिक, शहरी व ग्रामीण विकासाच्या आवश्यकतेप्रमाणे जल आणि शक्ती या सर्व बाबींचा समावेश बहुउद्देशीय प्रकल्पात करण्यात आला. अशा प्रकारे श्रम विभागाने केवळ जलसंपत्तीच्या बहुउद्देशीय विकासाबाबत शिफारशी केल्या नसून प्रांतीय, राज्य सरकार आणि स्थानिक मंडळामध्ये बहुउद्देशीय विकासाची योजना आणि त्याचा वापर करण्यासाठी त्यांच्यात पूर्ण समन्वयाची आवश्यकता वर्तविली. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रयत्न केलेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्टीकरण दिले की, जनतेच्या भल्यासाठी जर पाण्याचे जतन व संवर्धन करणे अत्यावश्यक असेल तर नदीकिनारे बंदिस्त करण्याचा विचार गैर ठरतो. या संदर्भात विकसित देशांनी अंगिकारलेला मार्गच योग्य आहे आणि तो म्हणजे विविध ठिकाणी पाण्याचे जतन करणे आणि त्याचा बहुउउद्देशीय वापर करणे, धरणे बांधून, जलसिंचनाशिवाय नद्यांचा जलसाठा करणे, त्याचा सिंचनासाठी उपयोग करणे, इत्यादी बाबी साध्य करता येतात.

नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर अत्याधुनिक ज्ञान वापरून करायला हवा. बहुउद्देशीय हा त्यांनी वापरलेला शब्द अधिक महत्त्वाचा आहे. रेल्वेला पर्याय देऊ शकेल अशी जलवाहतूक असायला हवी आणि तशी करता येऊ शकते, असे बाबासाहेबांना वाटत होते. शेती आणि तिच्या विकासासाठी म्हणून बाबासाहेबांनी जलआयोगाची स्थापना केली.

बाबासाहेबांशिवाय जल व्यवस्थापनाच्या बाबतीत कुणी सखोल विचार केला नाही व दूरदृष्टीपणा

दाखविलेला नाही आणि म्हणून बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने या देशाचे हितचिंतक ठरतात. त्यांच्या दूरदृष्टीपणावरून ते सर्वश्रेष्ठ ठरतात हे नाकारून चालणार नाही

**संदर्भ**

1 भालचंद्र फडके,डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्रीविद्या प्रकाशन पुणे,2001

2 भोळे भास्कर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुभव आणि आठवणी, साकेत प्रकाशन औरंगाबाद,2000

3 हरधान हर्ष, डॉ. भीमराव आंबेडकर जीवन और दर्शन पंचशील प्रकाशन,जयपूर,2001

4 खरात माधवी, पत्रांच्या अंतरंगातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर,श्री समर्थ प्रकाशन,पुणे,2001

5 सुधीर रामटेके,इंडिया वॉटर पोर्टल 5 फरवरी 2017

# ग्रामीण उद्योजगतेतील आव्हाने आणि संधी

**प्रा.डॉ. के. व्ही.ढवळे**
मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा

**सारांश**

*उद्योजकता हे एक क्षेत्र आहे. आजच्या युगात उद्योजकतेलामहत्त्व प्राप्त झाले आहे. उद्योजकता ही एक गुरुकिल्ली आहे. शाश्वत, स्मार्ट आणि सर्वसमावेशक वाढीसाठी भारताच्या 2022 धोरणाचा घटक 64 टक्केखेड्यापाड्यात राहणारी लोकसंख्या अजूनही शेती आणि संलग्न कामांमध्ये गुंतलेली आहे. एकटे सरकारगावकऱ्यांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करू शकत नाहीत. ग्रामीण भागाच्या विकासात उद्योजकता महत्त्वाची भूमिका बजावते. ग्रामीण भागातील उद्योजकीय अभिमुखता स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देण्यावर आणि घरगुती कंपन्यांच्या सलग वाढीवर आधारित आहे. ग्रामीण भागाचा विकास आणि वाढ यामुळे स्वयंरोजगार निर्माण होण्यास मदत होते, परिणामी औद्योगिक आणि आर्थिक क्रियाकलापांचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होतो आणि स्थानिक मजुरांचा तसेच स्थानिक पातळीवर उपलब्ध कच्च्या मालाचा जास्तीत जास्त वापर होतो. ग्रामीण किंवा निमशहरी भागातून शहरी भागात स्थलांतरित झालेल्या लोकांसाठी आजकाल ग्रामीण उद्योजकता ही मोठी संधी बनली आहे. हा अभ्यास ग्रामीण भागातील प्रमुख आव्हाने आणि संधी समजून घेण्यासाठी करण्यात आला आहे ज्यांना उद्योजक तोंड देऊ शकतात. उत्पादनांचे विपणन, अर्थसंकल्पीय सुविधा आणि इतर आवश्यक लक्झरी यांसारख्या क्षेत्रांमध्ये ग्रामीण उद्योजकांना भेडसावणा-या प्रमुख समस्यांवरही या पेपरमध्ये भर देण्यात आला आहे.*

**कीवर्ड :** उद्योजक, ग्रामीण विकास, ग्रामीण उद्योजकता, अडचणी, आव्हाने, संधी

**प्रस्तावना :**

भारत हा खेड्यांचा देश म्हणून प्रसिद्ध आहे. भारतीय लोकसंख्येपैकी 64 टक्के लोक खेड्यात राहतात. तर ग्रामीण भागात, त्यापैकी 60 टक्के लोकसंख्या शेती आणि संबंधित व्यवसायात गुंतलेली आहे. उपक्रम जमीन मर्यादीत आहे,त्यामुळे ती शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर कामगारांना सामावून घेण्यास असमर्थ आहे.लघु आणि कुटीर उद्योग आणि औद्योगिक घटकांची संख्या खूपच कमी आहे. एवढेच नाही तर ग्रामीणगरीब पायाभूत सुविधा, बेरोजगारी यासारख्या आव्हानांनी क्षेत्र ग्रासले आहे.

**ग्रामीण उद्योजकांचे वर्गीकरण**

ग्रामीण उद्योजक व्यापक परिवर्तनशीलतेसह एक जटिल विषम सामाजिक संरचनेचे प्रतिनिधित्व करतात. उद्योग, व्यवसाय, किरकोळ, वित्त, शेती, फलोत्पादन, कारागीर यांमध्ये स्थान घेतले जाईल. परंतुढोबळपणे त्यांचे 4 प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाऊ शकते जसे की शेती, कारागीर, व्यापारीआणिआदिवासी उद्योजक.

**अ)कृषी उद्योजक:** कृषी कार्यात गुंतलेल्या व्यक्तींनाकृषी उद्योजक म्हणतात.सोप्या शब्दात सांगायचे तर, कृषी मधील उद्योजकांचा मुख्य व्यवसायशेती हा असतो.

**ब)कारागीर उद्योजक:** ग्रामीण भागात/खेड्यात काम करणा-या कुशल व्यक्तींना कारागीर म्हणतात. उद्योजक हा समुदाय शिक्षण आणि औपचारिक प्रशिक्षणाद्वारे कौशल्ये आत्मसात करतो. सुतार,विणकर,लोहार,कुंभार हे कारागिरांचे सामान्य उदाहरण आहे.

**क)व्यापारी आणि व्यापारी गट:** उद्योजकांचा हा वर्ग औद्योगिक, व्यवसाय किंवाव्यावसायिक क्रियाकलाप. ते किराणा, मायक्रो आणि स्मॉल युनिट्स, कमिशन अशी छोटी दुकाने चालवतात

व्यवसाय, खेड्यांमधून कच्चा माल मिळवून शहरी बाजारपेठेत चांगल्या फरकाने विकणे

**क)आदिवासी उद्योजक:** आदिवासी उद्योजक हे पदवीधर आहेत, आदिवासी समाजातील आहेत.

ते स्वतःच्या गरजांसाठी आणि इतरांच्या गरजा भागवण्यासाठी वनोपज आणि संसाधने वापरतात

आदिवासी समाजाचे सदस्य अर्ध-व्यावसायिक किंवा व्यावसायिक आधारावर कार्यरत आहेत.

**अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टे:**

1. ग्रामीण भागातील भूमिकांचे विश्लेषण करणे
2. ग्रामीण भागातील प्रमुख फायदे जाणून घेणे
3. ग्रामीण भागातील समस्यांचा अभ्यास करणे
4. यावर काही उपाय सुचवणे
5. ग्रामीण भागातील समस्या सोडवणे
6. समोर येणा-या प्रमुख आव्हानांचा अभ्यास करणे

**भारतातील ग्रामीण उद्योजकतेचे महत्त्व**

ग्रामीण उद्योजकतेचे इतर महत्त्वाचे मुद्देखाली चर्चा केली आहे:

- ग्रामीण भागात आर्थिक पुरवठा सुधारतो
- शहरी आणि ग्रामीण भागातील वेतनातील विसंगती कमी करते
- ग्रामीण आणि आदिवासी समाजाचे जीवनमान उंचावेल
- लघु व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन
- अमुल्य भारताची जुनी कलाकुसर जतन करा
- पाडाव न करता ग्रामीण गावांची तत्पर प्रगती
- शहरी स्थलांतर कमी करण्यात मदत
- शेजारच्या भागातून उद्भवलेल्या मागणीची पूर्तता
- वस्तू आणि सेवांची निर्मिती जेथे विशिष्ट स्वरूपाची कौशल्ये आवश्यक आहेत

**भारतात ग्रामीण उद्योजकतेच्या संधी**

विकासात ग्रामीण उद्योजकता महत्त्वाची भूमिका बजावते. भरपूरग्रामीण उद्योजकतेमध्ये विविध संधी आहेत:

**प्रेरणा आणि टिकाऊपणा:** ग्रामीण उद्योजकांना प्रेरणा देतात आणि टिकाऊपणा प्रदान करतात.
ग्रामीण जनता मध्ये ग्रामीण उद्योजकतेच्या विकासाला स्थानिक लोक पाठिंबा देतात आणि प्रोत्साहन देतात.

**मजुरांची उपलब्धता:** भारतातील ७० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात/खेड्यात राहते. बहुसंख्य लोक या लोकसंख्येपैकी शेती आणि संबंधित कामांमध्ये कार्यरत आहे. कृषी आणि संलग्न
अर्धकुशल आणि अक्षम कामगारांची उपलब्धता ही त्यापैकी एक आहे.

**कच्च्या मालाची उपलब्धता:** शेतीवर आधारित वस्तू जसे की कच्चा माल ग्रामीण भागात सहज उपलब्ध आहे.उद्योजक नगण्य/कमी वाहतूक आणि वाढीव खर्च ग्रामीण उद्योजकांना प्रेरित करतात.

**कमी पायाभूत खर्च:** व्यावसायिक उपक्रमाची पायाभूत किंमत ग्रामीण खेड्यांमध्ये खूपच कमी आहे. बांधकाम किंवा विकासाची कोणतीही सक्ती नाही.
**उत्पादन खर्च:** जेव्हा ग्रामीण भागात उत्पादनाच्या घटकांची किंमत तुलनेने कमी असते
मेट्रो आणि मिनी-मेट्रो शहरांशी विरोधाभास. ग्रामीण उद्योजकांचा सहजतेत वरचष्मा आहे
उत्पादन घटकांची खरेदी. प्रयत्नहीन सुलभता उत्पादन खर्च कमी करते,ज्याचे फायदे शेवटी ग्राहकाला दिले जातात.
**प्रचारात्मक क्रियाकलापांची किंमत:** भारतात ग्रामीण औद्योगिकीकरण हळूहळू वेग घेत आहे. फक्त मूठभर औद्योगिक युनिट्स ग्रामीण गावात आणि शहरांमध्ये कार्यरत आहेत. दुस-या शब्दांत, स्पर्धा हि ग्रामीण भागात कमी आहे त्यामुळे ग्रामीण उद्योजकांसाठी कोणताही मोठा खर्च होणार नाही.
**सबसिडी आणि धोरणे:** भारत सरकारने यासाठी अनेक सबसिडी आणि धोरणे आणली होती
ग्रामीण उद्योजकतेची उत्तम स्थापना आणि व्यवस्थापन. सरकारने जाहीर केले आहे.
ग्रामीण भागात औद्योगिकीकरणाच्या वाढीला चालना देणारी अनुदाने. एवढेच नाही तर सरकार
अतिशय नाविन्यपूर्ण, लवचिक आणि सतत प्रदान करणारी प्रमोशनल पॉलिसी लॉंच केली आहे.
**भाव्य ग्राहकांची प्रचंड संख्या:** भारतातील गावे दाट लोकवस्तीची आहेत.गेल्या काही वर्षांत गावक-याची ताकद वाढली आहे. ही प्रचंड लोकसंख्या संभाव्य ग्राहक आहे

**भारतातील ग्रामीण उद्योजकतेसमोरील आव्हाने**

भारतातील ग्रामीण उद्योजकतेमध्ये मोठ्या संधी असल्या तरी अनेक आव्हाने आहेत
ग्रामीण उद्योजकांना सामोरे जावे लागत आहे:
**कौटुंबिक आव्हाने:** खेड्यातील लोकांची नोकरीपेक्षा नोकरीबाबत सकारात्मक मानसिकता असते. ते ग्रामीण लोकांसाठी मोठी चिंतेची बाब आहे की ते स्वत:च्या मालकीतून नफा मिळवू शकतील की नाही. जेव्हा त्यांची मुले निवड करतात तेव्हा पालक उत्साह दाखवत नाहीत.एखादा उपक्रम सुरू करताना, नकारात्मक टिप्पण्या (कुटुंबातील सदस्यांकडून) त्याला त्याचा पाठपुरावा करू देत नाहीत.
**आर्थिक आव्हाने:** ग्रामीण भागात व्यवसायासाठी वित्तपुरवठा करणे हे इच्छुकांसाठी मोठे आव्हान आहे.उद्योजक जर दूरदर्शी धावण्यास उत्सुक असतील तर आव्हान बहुगुणित होते

ग्रामीण भागात ऑनलाइन व्यवसाय. लघु आणि मध्यमांसाठी उपक्रम निधी फारसा सुलभ नाही
ग्रामीण उद्योजक आणि त्यांच्याकडून प्रारंभिक व्यवसाय निधी मिळवणे हे एक कठीण काम होते.

**सामाजिक अडचणी:** सामाजिक आव्हाने नवीन उद्योजकांवर प्रचंड दबाव आणतात.
ही आव्हाने, काही वेळा, इच्छुक उद्योजकांना उंच उडू देत नाहीत. सह तुलना
यशस्वी मित्र, भावंडे, सहकारी, नातेवाईक त्यांच्या उत्पन्नाच्या आणि सामाजिक स्थितीच्या आधारावरनवीन आणि लहान उद्योजकांवर प्रचंड दबाव निर्माण करतो आणि इथेच सामाजिक
आव्हान सुरू होते.

**धोरणातील आव्हाने:** व्यवसायाच्या वातावरणात बरेच बदल होत आहेत (त्यामुळेसरकारी धोरणांमध्ये बदल). GST (वस्तू आणि सेवा कर) च्या अंमलबजावणीमुळेTRIPS (बौद्धिक संपदा अधिकारांचे व्यापार-संबंधित पैलू), आणि TRIMS (व्यापार संबंधितगुंतवणुकीचे उपाय) ग्रामीण भागातील धोरणांमध्ये अनेक बदल केले जाणार आहेत.आणि म्हणून औद्योगिकीकरण एक आव्हान म्हणून कार्य करते.

**खराब पायाभूत सुविधा आणि वीज अपयश:** ही महत्त्वाकांक्षी आव्हाने आहेत. भारत हे विकसनशील राष्ट्र आहे, विकसित राष्ट्र नाहीपायाभूत सुविधा, वीजपुरवठा, पाणी सुविधा, यामध्ये मोठी गुंतवणूक करावी लागेल.ग्रामीण औद्योगिकीकरणाच्या वाढीला गती देण्यासाठी इमारती, रस्ते, पूल इ. कामे मोठ्या प्रमाणात करावी लागेल.

**संदर्भ :**


1. Banerjee, G. D (2011). RuralEntrepreneurship DevelopmentProgramme in India – An
2. ImpactAssessment. National Bank for https://www.nabard.org/Rural%20Entrepreneurship%20Develop.pdf
3. http://www.jetir.org/papers/JETIR1805348.pdf
4. Bhushan,P. (2018), Prospects & Challenges of Rural Entrepreneurship in India, International Journal of Research and Analytical Reviews, Volume 5, No 4, pp. 1089-1100
5. Chakraborty, D. and Barman R. (2014). A Study on Impact of Motivational Factors on the Growth of Rural Entrepreneurs of Assam. IOSR Journal of Business and Management.
6. Chandrahasa (2016). Challenges, Problems, Opportunities and Skills for Successful Rural Entrepreneurship in India , Vol. 5, No. 6, pp. 405-407
7. Choudhary, K..(2011),Effect of Globalization on Rural Entrepreneurship in India, Half Yearly Global Economic Research Journal, Vol. I, pp. 88-92.
8. Illahi, S. (2018), Rural Entrepreneurship: The Current Scenario in India, International Journalof Science and Research, Vol. 8 No. 11, pp. 1428-1432